योगीराज श्रीमुकुंदराजकृत

# परमामृत

(तात्पर्यार्थासह)

अनिलप्रभू रामराय केळकर

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न।।

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.१०५**

**योगीराज श्रीमुकुंदराजकृत**

# परमामृत

(तात्पर्यार्थासह)

**- अनिलप्रभू रामराय केळकर**

आवृत्ती पहिली | सांगली | सन १९२६

प्रकाशक

**अनिकेत अनिलप्रभू केळकर**

घर नं.८२७, 'श्रीराम निकेतन' श्रीबापूरावजी केळकर वाडा

गावभाग, सांगली ४१६४१६

भ्रमणध्वनी : ९८९०२२४१८६

**प्रथम आवृत्ती : २०२६**

© **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

मुद्रक

**अक्षरसंचय, रामानंदनगर**

**देशमाने ऑफसेट, पलूस**

www.dasram.org या संकेतस्थळावर श्रीदासराममहाराजांची सर्व पुस्तके उपलब्ध

प्रसादमूल्य : **रु.१००/-**

## प्रकाशकाचे मनोगत....

आपण अमृत सेवन करून स्वरूपाकार व्हावे व अजरामर व्हावे असे सर्वच जीवांना वाटते. अमर होण्यासाठी लागणारे श्रेष्ठ अमृत - परमामृत - कसे प्राप्त करायचे हे सांगणारा हा 'परमामृत' ग्रंथ आहे. आद्यकवी योगीराज श्रीमुकुंदराज यांनी तो लिहिला आहे. या ग्रंथामध्ये एकूण १४ प्रकरणे असून सर्व प्रकरणांत मिळून ३२३ ओव्या आहेत. ग्रंथ दिसायला छोटासा पण अत्यंत महत्त्वाचा आहे. या छोट्याशा ग्रंथात परमार्थाचे सारे सारच सामावले आहे.

बाराव्या शतकातील लिखाण असल्याने ग्रंथाची भाषा अती प्राचीन, आत्ताच्या प्रचलित मराठीपेक्षा वेगळी त्यामुळे समजण्यास थोडी कठीण अशीच आहे. माझे वडील श्री.अनिलप्रभू रामराय केळकर यांनी संत वाङ्मयाच्या आधारे, श्रीदासराममहाराजांच्या कीर्तनाच्या त्यांच्या आकलनाप्रमाणे परमामृत या ग्रंथातील ओव्यांचा तात्पर्यार्थ लिहायचा प्रयत्न केला आहे. अर्थात तो तात्पर्यार्थ प्रचलित अर्थापेक्षा वेगळा झाला आहे हे निश्चित. स्वरूपसाक्षात्कार हे प्रमुख उद्दिष्ट मानणाऱ्या संप्रदायीकांना एक वेगळा विचार यातून मिळणार आहे.

या परमामृत (तात्पर्यार्थासह) ग्रंथासाठी माझे जेष्ठ बंधू, गुरुबंधू श्री.सुनिल सूर्यकांत केळकर व श्री.मधुसूदन विलासराव काटकर यांनी मोठी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे त्यामुळे या ग्रंथाचा गौरव वाढला आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. मुद्रिते तपासण्याचे

किचकट काम माझी आई सौ.अपर्णा अनिलप्रभू केळकर हिने केले आहे, तिला शतशः धन्यवाद.

या ग्रंथाचे मुद्रण नेहमीप्रमाणे अत्यंत आपुलकीने व सुबकपणे करण्याचे काम आमच्या कुटुंबातील ‘अक्षरसंचय’चे श्री.विनायकराव साठे व त्यांचे स्नेही देशमाने ऑफसेटचे श्री.संदीप देशमाने व सौ.मनीषा सुतार यांनी केले, त्यांचे खूप खूप आभार.

या ‘परमामृत’ ग्रंथाचे पठणाने माझे व आपल्या सर्वांचे हातून साधन व्हावे व परमामृत आत्म्याची ओळख व्हावी अशी प्रार्थना योगीराज श्रीमुकुंदराज व माझे सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांना करतो व त्यांचेच कृपेने स्फुरलेले, पूर्णत्वास गेलेला ‘परमामृत’ हा ग्रंथ माझे आजोबा ती.प.पू.श्रीदादा व माझी आजी ती.प.पू.सौ.सीतावहिनी यांचे पवित्र चरणी श्रीदासराममहाराज यांच्या २५ व्या पुण्यतिथीचे निमित्ताने स्मरणपूर्वक अर्पण करतो.

*सांगली* *अनिकेत अनिलप्रभू केळकर*
*श्रीहनुमान षष्ठी*
*दि.०८/०१/२०२६*

# ग्रंथासंबंधी....

आपण सर्वांनी परमामृत चाखावे - स्वरूपाकार व्हावे - मोक्ष प्राप्त करावा - या हेतूने योगीराज श्रीमुकुंदराजांनी 'परमामृत' या ग्रंथाची रचना केली. वेदशास्त्रांचे मंथन करून हे सार परमामृत त्यांनी आपल्या हाती दिले आहे. 'मुकुंद' या शब्दाचा अर्थच 'मोक्ष देणारा' असा आहे. हे परमामृत आपल्या हाती देऊन त्यांनी आपले नाव सार्थ केले आहे. माणसापाशी विवेक असेल तरच कर्त्या परमामृत आत्म्याला ओळखता येते व आत्मज्ञानाने मोक्ष. त्यादृष्टीने त्यांनी प्रथम विवेकाचा सागर अशा 'विवेकसिंधू' या ग्रंथाची रचना केली व नंतर सारभूत 'परमामृत' या ग्रंथाची रचना केली. माणसाला जन्माला येऊन नेमके काय मिळवायचे आहे, ती परमाप्राप्ती कशी करायची हे नेमकेपणाने सांगणारा अत्यंत संक्षिप्त पण महत्त्वाचा असा हा ग्रंथ आहे.

'परमामृत' हे संत श्रीमुकुंदराजांचे वाङ्मयातील छोटे शेंडेफळ आहे. अर्थात तो त्यांचा लाडका ग्रंथ आहे हे सांगणे नकोच. हे लिखाण बाराव्या शतकातील असल्याने ग्रंथाची भाषा अती प्राचीन, आत्ताच्या प्रचलित मराठीपेक्षा वेगळी, त्यामुळे समजण्यास कठीण अशीच आहे. नुसता शब्दार्थ केला तर तो कितपत योग्य होईल? त्यामुळे नेमका अर्थ कळेल का? शब्द जर व्यर्थ आहे हे समजले तर अर्थ कळला असे

म्हणता येईल. म्हणून संत वाङ्मयाचा अर्थ संतवाङ्मयाच्या आधारानेच करावा तरच त्या अर्थाला अर्थ प्राप्त होईल.

श्रीसमर्थरामदासस्वामींनी ग्रंथराज श्रीदासबोध लिहिताना श्रीसंतमुकुंदराजांच्या 'विवेकसिंधू', 'परमामृत' या ग्रंथांचा आधार घेतला होता. दासबोध हा ग्रंथ विवेकसिंधूचे विस्तारीत रूप आहे. अर्थात 'परमामृत' या ग्रंथाचा नेमका अर्थ शोधण्यासाठी दासबोधाचा आधार घेणे, ज्ञानेश्वरीचा आधार घेणे मला श्रेयस्कर वाटले. त्याप्रमाणे प्रस्तुतच्या ग्रंथात परमामृताचा तात्पर्यार्थ लिहिण्यासाठी प्रामुख्याने श्रीदासबोध, श्रीज्ञानेश्वरी, श्रीनाथमहाराजांचे भागवत, श्रीदासरामगाथा, श्रीमामामहाराजांची अमृतवाणी आदी ग्रंथांचा आधार घेतला आहे.

आमचे श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात श्रीसंतमुकुंदराजांची अनेक अवतरणे आधारादाखल येत व त्यांचे विवरण कीर्तनातून सहजच होत असे. त्यांची कीर्तने ऐकून श्रीसंतमुकुंदराजांच्या वाङ्मयाचा अर्थ मला जसा समजला तोच आशय या परमामृताचे तात्पर्यार्थाचे रूपाने मांडला आहे. तात्पर्यार्थातील जे काही चांगले आहे, तुम्हाला अनुभवाला येणारे आहे ते सारे ती.प.पू.श्रीदासराममहाराजांचे आहे. लिखाणात एखादा शब्द अधिक उणा झाला असल्यास तो दोष सर्वस्वी माझा आहे. 'तरी न्यून ते पुरते। अधिक ते सरते। करूनी घेयावे तुमते। विनवीत असे।।' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात मी आपणास प्रार्थना करत आहे.

श्रीगुरूंच्या उपदेशाप्रमाणे मंगल आचरण करून त्रिपदशोधाने अन्यमतांचे खंडण झाले असता, चत्वारदेह निरसनाअंती सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन नभाचे शुन्यत्व गिळल्याने - खंडण झाल्याने - निदिध्यासाने

दृश्याचा आभास नाहीसा होतो, अज्ञानाचे ज्ञान होऊन त्याला मोक्ष प्राप्त होतो, मुक्ती प्राप्त होते, शब्दाचा ग्रास होऊन त्याला सदोदीत साक्षात्कार होतो, तो परब्रह्मरूप होतो, त्याला महावाक्याचे विवरण समजते. हे या परमामृताचे सार आहे असे मला वाटते.

श्रीदासराममहाराजांचे २५ वे पुण्यतिथीमहोत्सवाचे निमित्ताने 'परमामृत' या ग्रंथाचे प्रकाशन करून चि.अनिकेत याचे हातून मोठी गुरुसेवा घडली आहे. अशीच चढती वाढती सेवा श्रीमहाराजांनी आम्हा सर्वांकडून पिढ्यान पिढ्या करून घ्यावी अशी प्रार्थना श्रीमहाराजांचे पवित्र चरणी करतो.

या 'परमामृत' (तात्पयार्थासह) या ग्रंथास माझे गुरुबंधू श्री.मधुसूदन विलासराव काटकर व माझा पुतण्या चि.सुनील सूर्यकांत केळकर यांनी मोठ्या प्रेमाने, आत्मीयतेने अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. हे पुस्तक निर्दोष स्वरूपात प्रसिद्ध व्हावे म्हणून माझ्या सुविद्य पत्नी सौ.अपर्णा अनिलप्रभू केळकर यांनी मुद्रिते तपासण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. त्यांनाही मनापासून धन्यवाद. ग्रंथाचे मुद्रण नेहमीप्रमाणेच अत्यंत आपुलकीने, आपले घरचे काम समजून सुबकपणे करण्याचे काम माझे व्याही 'अक्षरसंचय'चे श्री.विनायकराव साठे व देशमाने ऑफसेटचे श्री.संदीप देशमाने यांनी केले आहे. तसेच अक्षरजुळणीचे निर्दोष असे काम सौ.मनिषा सुतार यांनी केले आहे. या सर्वांचेच आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

'परमामृत' या ग्रंथाचे पठणाने, मननाने मला व आपणा सर्वांना कर्त्या परमामृत आत्मस्वरूपाची ओळख व्हावी व आत्मज्ञानाने मोक्ष

प्राप्त व्हावा अशी प्रार्थना योगीराज श्रीमुकुंदराजांना व माझे सद्गुरू श्रीदासराममहाराज यांना करतो व त्यांचेच कृपेने स्फुरलेले, पूर्णत्वाला गेलेले 'परमामृत' हे पुस्तक माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदादा व माझी आई ती.प.पू.सौ.सीतावहिनी यांचे पवित्र चरणी या पुण्यकाळी स्मरणपूर्वक अर्पण करतो.

सांगली - अनिलप्रभू रामराय केळकर

श्री हनुमान षष्ठी

दि.०८/०१/२०२६

**पितृदेव ती.प.पू.रामराय गोविंद केळकर व**
**मातोश्री ती.प.पू.सौ.सीतावहिनी रामराय केळकर**



रूप देखिल्या नयनी। सुख सुखा ये ज्याचेनी।
तो हा श्रीराम सिंहासनी। सीता वामांकी जननी।।

- श्रीमामामहाराज केळकर

# प्रस्तावना

श्रीमुकुंदराज यांना मराठीतील आद्यकवी मानले जाते. यांचा अवतार हा कैवल्यमूर्ती श्रीसद्‌गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्याही साधारणत: शंभर वर्षे आधीचा आहे. त्यांच्या प्रमुख ग्रंथांमध्ये विवेकसिंधु आणि परमामृत यांचा समावेश होतो. विवेकसिंधु या ग्रंथामध्ये जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य यांच्या वेदांतावर भाष्य केले आहे. तर परमामृत या ग्रंथामध्ये परमार्थाचे सार सांगितले. परमामृत हा ग्रंथ आकाराने लहान परंतु मुमूक्षूंना अतिशय नेमका परमार्थ सांगणारा असा मार्गदर्शक ग्रंथ आहे.

ग्रंथाच्या परमामृत या नावामध्ये त्याचे महत्त्व सामावलेले आहे. 'परम' म्हणजे श्रेष्ठ, 'परम' याचा अर्थ कोणत्याही गोष्टीतील सर्वोच्च अवस्था! जसे की 'परमवीर' म्हणजे युद्धामध्ये सर्वोच्च पराक्रम केलेला सैनिक. यादृष्टीने या ग्रंथाचे 'परमामृत' नाव लक्षात घेतले तर आपल्या लक्षात येईल की अमृतामध्येही श्रेष्ठ म्हणजे 'परमामृत' अशा काही बोधवचनांचा समावेश या ग्रंथामध्ये केलेला आहे.

साधारणत: अशी मान्यता आहे की, मनुष्याने आपल्या जन्मामध्ये घबाड पुण्याची प्राप्ती केली की त्याला स्वर्ग प्राप्त होतो. स्वर्गामध्ये त्याला खायला पक्वान्ने तर प्यायला अमृत असते. पण गंमत अशी आहे की, स्वर्गामध्येही जर पुण्यप्रत कर्म केले नाही तर पुण्य हे क्षणागणिक क्षीण होत जाते. आणि पुण्य संपले की पुन्हा मृत्युलोकी जन्म घ्यावा लागतो. 'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं। क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।।' असा बोध भगवान गीतेद्वारे करतात. यावरून स्पष्ट आहे की, स्वर्गामध्ये मिळालेलं अमृत हे मोक्षप्राप्ती करून देत नाही, जन्ममरणाची परंपरा खंडित करीत नाही. जन्ममरणाची परंपरा खंडित करणारे - अखंड सुख प्राप्त करून देणारे - मोक्ष प्राप्त करून देणारे अमृत प्राप्त झाले तर त्याला

'परमामृत' म्हणतात.

असे परमामृत मात्र स्वर्गात मिळत नाही. ते आपणास मृत्युलोकातच - नरदेहातच प्राप्त करावे लागते. संत महात्म्यांनी ते कसे मिळवावे, याचा बोध अनेक प्रकारे केलेला दिसतो. हे अमृत कोणते? तर हे नामामृत आहे. श्रीनिवृत्तीनाथमहाराज आपल्या हरिपाठात म्हणतात, 'ज्याचे मुखीं नाम अमृतसरिता। तोचि एक पुरता घटु जाणा।।'. साधकाने सतत नाम घेतले असता तो परमार्थामध्ये पुरा होतो, त्याला प्राप्त करण्यासारखे काही शिल्लक रहात नाही. नामाचे महत्त्व असे आहे की, जस-जसं साधक नामस्मरण साधतो, तस-तशी मनाची गती ही स्थिर होत जाते, जीवन उर्ध्वगामी होते. शेवटी ही जीवनाची गती सहस्रदळी जाऊन मिळते आणि साधकाला मोक्ष प्राप्त होतो. अशा प्रकारे नाम हे स्वर्गप्राप्तीच्याही पुढे जाऊन त्याला मोक्ष प्राप्त करून देते. त्याला नित्य अशा ब्रह्माची प्राप्ती होते आणि तो सर्वसुखी होतो. त्याला परमार्थातील सर्वोच्च अवस्था प्राप्त होते. त्यामुळे संत महात्मे नामाला 'परमामृत' म्हणतात. श्रीनिवृत्तीनाथमहाराज आपल्या हरिपाठामध्ये दुसऱ्या एका अभंगात असे म्हणतात, 'निवृत्ति नामामृत उच्चारी रामनामे। नित्य परब्रह्म त्याचे घरी।।'. म्हणून जनाबाई आता इतर कोणतीही साधने न करता फक्त नामस्मरणच करा, असे सांगत आहेत, 'नाम ते स्मरण अमृत संजिवनी। म्हणे दासी जनी हेंचि करा।।'

'कर्मसो अमृतं' असे श्रुतीवचन आहे. देहाच्या जाणिवेमध्ये आणि मन विकारलेले असताना आपण जो दैनंदिन व्यवहार करतो, त्याला साधारणपणे 'कर्म' असे म्हणतात. श्वसनाची गती वृत्तीनुसार कमी जास्त होते. त्यामुळे नाथमहाराज त्याला 'विकर्म' असे म्हणतात. मनोलय साधून वृत्ती अंतर्मुख होऊ लागली असता निश्वासाला एक प्रमाण येते. सर्वसाधारणमणे १८ ते २० किंवा त्याहीपेक्षा जास्त अंगुळे बाहेर जाणारा श्वास हा फक्त १२ अंगुळे बाहेर वाहू लागतो. त्याला

संत-महात्मे ‘कर्म’ असे म्हणतात. श्रीनाथमहाराज म्हणतात, ‘अविद्या युक्त जीव परम। त्यासी नित्यक्रिया तेचि कर्म।। नित्य न करणे ते अकर्म। विकर्म ते निषिद्ध।।’, ‘कर्म सर्वसाधारण। तेचि विकाराते पावले जाण।। उठिले विधिनिषेध दारूण। विकर्म जाणा ते म्हणिपे।।’. देहाकडून कोणतेही काम करायचे असेल तर ते आधी मनात येते आणि ते देहाकडून करविले जाते. म्हणजे मन विकारणे/मनात इच्छा निर्माण होणे, हे कर्माचे मूळ आहे. ‘काया वाचा अथवा मन। करिजे तितुके कर्म जाण।। सूक्ष्म स्फूर्तीचे जे भान। ते मूळ जाण कर्माचे।।’ असे श्रीनाथमहाराज म्हणतात. मनात निर्माण झालेली इच्छा देहाकडून पूर्ण होवो अथवा न होवो, ते कर्म झाले असेच अध्यात्मशास्त्र मानते. श्रीदासराममहाराज म्हणतात, ‘कर्माची किंमत ही वृत्तीवरती आहे, कृतीवरती नाही.’ मुनी वसिष्ठ प्रभू श्रीरामांना बोध करताना आपल्या ‘योगवासिष्ठ’ ग्रंथामध्ये सांगतात, ‘मन कृतं कृतं कर्म। न शरीर कृतं कृतं।।’. म्हणजे मन संकल्प-विकल्प करते तेच खरे कर्म. नामस्मरणाच्यायोगे मन श्वसनाचे ठिकाणी लय पावले असता मनामध्ये फक्त शुद्ध संकल्प उरतो. अशा वेळी श्वास हे हेतूरहित होतात. मन निश्चल झाले असता इंद्रियांकडून होणारी कर्मे बाधक होत नाहीत. अशा अवस्थेत साधकांकडून घडणाऱ्या आचरणाला ‘सत्क्रिया’ म्हणतात तर घडणाऱ्या कृतींना ‘अकर्म’ म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ‘परी कर्मफळी आस न धरावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी।। हे सत्क्रियाची आचरावी। हेतूंविण।।’

हे सर्व पाहिले असता कर्मापासून (निश्वास १२ अंगुळे खाली येणे) ते अकर्म (निश्वास बंद होणे/जीवन उर्ध्वगामी होणे) हा मार्ग फक्त नामस्मरणाच्यायोगेच आक्रमिता येतो. या ठिकाणी ‘कर्मसो अमृतं’ म्हणजे कर्माला ‘अमृत’ म्हटले तर अकर्माला ‘परमामृत’ म्हणावे लागेल. कारण साधकाची ही परमोच्च अवस्था आहे.

या सर्वदृष्टीने या ग्रंथाचे आमच्या श्रीप्रभूकाकांनी प्रत्येक ओवीचे केलेले विवरण हे अतिशय महत्त्वाचे आणि पाहण्याजोगे ठरते. श्रीप्रभूकाकांची विवरण लिहिणेची स्वत:ची एक शैली आहे. त्यामागे स्वत:ची अशी वैचारिक बैठक/चौकट आहे, लिखाणामागचा विचार अतिशय सुस्पष्ट आणि तर्कशुद्ध असतो. त्यासाठी अनेक साधू-संतांच्या ग्रंथांचे दाखले ते देतात, त्यांची संगती लावतात. कोणत्याही लिखाणामध्ये अवांतर विषयाला फाटे न फोडता, ओव्या वाचून वरवरचा वाटणारा अर्थ न सांगता, ग्रंथ लिहिण्याचा मूळ उद्देश काय आहे? हे ते पाहतात. याही ग्रंथामध्ये मुळात श्रीमुकुंदराज यांनी हा ग्रंथ का लिहिला? त्यांचा उद्देश काय होता? याचा धांडोळा त्यांनी घेतला आहे. श्रीमुकुंदराज यांना अपेक्षित असणारे, साधकांना नेमका मार्ग दाखवणारे आणि या आकाराने लहान पण परमार्थाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण अशा ग्रंथाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित करणारे विवरण श्रीप्रभूकाकांनी केलेले आहे.

उदाहरण द्यायचे झाल्यास अध्याय ५ मध्ये ओवी क्र. १० मध्ये अज्ञान-ज्ञान-विज्ञान आणि आपली वृत्ती याचा खुलासा अधिक स्पष्टपणे केला आहे. ते लिहितात, 'आपल्यापाशी सामान्यत: जे ज्ञान असते ते विपरीत ज्ञान. साधनाने विपरीत ज्ञान नाहीसे झाल्यावर राहते ते वृत्तिसहित अज्ञान. माझ्या ठिकाणी वृत्तिसहित अज्ञान आहे, हे जाणणे म्हणजे वृत्तिसहित ज्ञान होणे. त्याचे पलीकडे वृत्तीचे स्फुरण. हे वृत्तीचे स्फुरण जेथे होते ती आत्मवस्तू - वृत्तिरहित ज्ञान. तसेच अध्याय ६ मध्ये ओवी क्र. १० मध्ये 'या सर्वांशी जो जाणे। तो काय आपणाते नेणें।। नेणीवेस तरी कळणे। असेचिना।।' याचा अर्थ सांगताना 'काय' असा प्रश्न न करता इथे 'काय म्हणजे देह' असा अर्थ घेऊन ते पुढील विवरण करतात. 'सर्वाला जाणणाऱ्या आत्मरूप आपणाला तो कायरूप - देहरूप - जाणत नाही. नेणिवेच्या ठिकाणी कधीही जाणीव असत

नाही. जाणिवेला नेणीव समजू शकते.' अशी विशेष वाटलेली सर्वच विवरणे इथे पाहणे शक्य नाही. जी काही भावली त्यातील काही उदाहरणे खाली देत आहे.

**अध्याय ३, ओवी क्र.१३-**

जे शब्दांनी जाणता येते, ते अशुद्ध ब्रह्म. शुद्ध ब्रह्म जाणता येत नाही. ब्रह्म न जाणता ब्रह्मरूप होता येते, हे लक्ष्य (ध्येय) ठेवणे महत्त्वाचे.

**अध्याय ४, ओवी क्र.६ -**

आत्म्याचे ज्ञान होण्यासाठी कोणते साधन करावे तर मी सांगतो ते मन एकाग्र करून ऐक, असा त्या ओवीचा अर्थ नसून मन एकाग्र झालेनंतर जे ऐकू येईल, त्याने आत्म्याचे ज्ञान होऊन, तुमची अनुभवाने खात्री होईल.

**अध्याय ४, ओवी क्र.८ -**

आधी जाणत्या आत्म्याला जाणावे मग आत्मरूप व्हावे. कायेलाच (देहाला) धरले तर त्रिपुटीतील अनुभव येणार, आत्मरूप होता येणार नाही.

**अध्याय ४, ओवी क्र.१५-**

आपण आपल्याला जाणणे म्हणजे 'देह म्हणजे मी' ही भ्रांती दूर होणे. इथे आकार पाहणे थांबते. देहापलीकडचा खरा मी ओळखला की खोटा मी नाहीसा होतो.

**अध्याय ६, ओवी क्र.१०-**

स्थूल आणि सूक्ष्म देहाचे कारण हा 'कारण' देह आहे. तर कारणदेहाचा कारण हा 'महाकारण' देह आहे. अज्ञानाचे - नेणिवेचे ज्ञान झाले असता कारण देहाबरोबर स्थूल सूक्ष्म देह नाहीसे होतात. याही अवस्थेत अखंड स्मरण राहिले असता जाणीव लयाला जाऊन महाकारणदेहही शून्य होतो.

श्रीमुकुंदराज यांनी आपल्या 'परमामृत' या ग्रंथामध्ये प्रामुख्याने परमार्थातील ज्ञान, चारी देह, जाणीव-नेणीव, महावाक्य, स्वानुभवसुख

इ. गर्भित विषय मांडले आहेत. तर विवरणामध्ये श्रीप्रभुकाकांनी अनेक क्लिष्ट वाटणाऱ्या संकल्पना सोप्या करून मांडल्या आहेत. जिज्ञासूंना हा ग्रंथ अध्यात्मातील अनेक कोडी उलगडून सांगणारा आहे. याचा लाभ आपण सर्वांनी करून घेतला पाहिजे.

हा ग्रंथ २०२६ सालच्या गोविंदनवमीच्या उत्सवात प्रकाशित होत आहे. श्रीप्रभूकाकांनी लिहिलेला पहिला ग्रंथ - हरिपाठ संकीर्तनाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन २००७ साली झाले होते. याप्रकारे २००७ ते २०२६ अशी काकांच्या ग्रंथसंपदेची वीस वर्षे झाली. हाही एक अपूर्व योगायोग आहे. २० अंक परमार्थात महत्त्वाचा आहे. प्राणाला विसावा देण्याचं महत्त्व सांगणारा आहे. श्रीमामामहाराज रामपाठात म्हणतात, 'गोविंद म्हणे विसावा विसाविया नामी। सद्गुरूंचे धामी कळों येई।।'

अशा या अपूर्व ग्रंथाची प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य मला मिळाले. माझे श्रीसद्गुरू भगवान प.पू.श्रीदासराममहाराज यांच्या कृपेमुळेच हे साध्य झाले. श्रीसद्गुरू भगवान प.पू.श्रीदासराममहाराज यांच्याच कृपेतील माझ्या आईवडीलांच्या पुण्याईमुळे हे घडते आहे. 'वेडे वाकुडे गाईन परी तुझाचि म्हणवीन'. माझी थोटकी बुद्धी या ग्रंथाच्या प्रस्तावनेला न्याय देईलच असे नाही. परंतु साधकांनी या ग्रंथाचा अभ्यास जरूर करावा आणि आत्मलाभ करून घ्यावा, अशी प्रार्थना करतो. शेवटी योगीराज श्रीमुकुंदराज, श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज, श्रीसद्गुरू श्रीमामामहाराज, श्रीसद्गुरू श्रीदासराममहाराज, प.पू.सौ.सीतावहिनीमहाराज, श्रीसद्गुरू श्रीअण्णामहाराज यांचे चरणी प्रणिपात करून आणि कृपेची याचना करून प्रस्तावनेला विराम देतो.

*स्थळ - सांगली* **- *मधुसूदन विलास काटकर***

*मार्गशीर्ष कृ.१०, शके १९४७*

*श्रीगोंदवलेकरमहाराज जयंती (दि.१४/१२/२०२५)*

# माझे मनीचे

ज्या नामाची गोडी वैष्णवांना लागली, जे नाम जाणले असता मोक्ष प्राप्त होतो, असे नामामृत हेच श्रेष्ठ अमृत - परमामृत आहे. श्रीनाथमहाराज सांगतात, 'नाम हे परमामृत। नामे पावन तिन्ही लोक।।'. खरे ज्ञान - सत्यज्ञान - हेच ते नामामृत (परमामृत) आहे. श्रीनाथमहाराजांचे अवतार श्रीमामामहाराज नित्यपाठात सांगतात, 'नाम खरे ज्ञान हरीकथा कीर्तन। निरूपण भजन अहर्निश।।' वासना नाहीशी झाल्यावर खरे नाम प्रगट होते, खरे ज्ञान होते. ज्या ज्ञानाने वासना नाहीशी होते ते खरे ज्ञान - सत्यज्ञान - कसे प्राप्त होते, हेच योगीराज मुकुंदराजांनी 'परमामृत' या ग्रंथात सांगितले आहे. अर्थात परमामृत कसे प्राप्त करायचे हे सांगणारा 'परमामृत' हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ आहे. या परमामृताचा अर्थ अहर्निशी हरिकथा श्रवण केलेल्या आमच्या श्रीनानाकाकांनी लिहिलेला आहे. तो तसाच परम अर्थ - श्रेष्ठ अर्थ - आहे, हे कोणी सांगायची गरज नाही. ही अहर्निशी हरीकथा ही कोठे श्रवण होते हे योगीराज श्रीदासराममहाराज असे सांगतात, 'महाकारण देही अखंड स्मरण। अद्वय भजन हरीकथा।।'

योगीराज श्रीमुकुंदराज हे, आमचे नानाकाका म्हणतात त्याप्रमाणे - निर्विकल्पी, कल्पनातीत, ज्यांनी भगवंताला जाणले आहे, जे आत्मज्ञानाने अद्वैत, आत्मरूप झाले आहेत, ज्यांनी नित्य आत्महित साधले आहे असे महान संत होऊन गेले. अशा थोर ज्ञानी योगी संतांनी हे परमामृत आपल्यासाठी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे माझ्यासारख्या मुमुक्षूंची सोय झाली आहे.

आमचे घरी १९२४ सालापासून नित्यकीर्तन सुरू आहे. अशा नित्यकीर्तनामध्ये श्रीमुकुंदराज यांना स्फुरलेले अनेक अभंग नेहमी संदर्भासाठी घेतले जातात. उदाहरणार्थ - 'दृष्टीचे जे अग्र शून्याचे ते सार। तेचि दशमद्वार पाही बापा।।', 'हे खूण अनुभवाची पिंडी परतूनी

पाहे। आपेआप प्रकाशले तेणे आनंदे राहे।।', 'मन जडले गुरूपायी आता। जन्ममरण मज नाही।।', 'अकार उकार मकार कारण। अर्धमात्रा स्थान तयावरी।।'. त्यामुळे सहजच आमचे घरी श्रीमुकुंदराज यांचे नित्य स्मरण होते. श्रीसंत मुकुंदराज यांनी मांडलेले तत्वज्ञान व आमचे चिमड सांप्रदायाचे तत्वज्ञान यामध्ये खूप साम्य असल्याने हे पुस्तक माझेसाठी साधनेमध्ये उपयोगी ठरणारे आहे.

'परमामृत' हा ग्रंथ जवळजवळ आठशे वर्षांपूर्वी लिहिला गेलेला असल्याने यातील शब्दरचना ग्रंथराज ज्ञानेश्वरीप्रमाणे फार कठीण आहे. आमचे श्रीनानाकाकांनी तात्पर्यार्थासिह हा ग्रंथ उपलब्ध करून दिला असल्याने माझेसारखे सामान्यजनांना त्याचा लाभ होणार आहे. त्याचा केवळ शब्दार्थच नाही तर त्यातील गूढार्थ सहजपणे आकलन होणार आहे.

योगीराज श्रीमुकुंदराज यांनी या परमामृत ग्रंथामध्ये आपण देहातीत होऊन आपले कसे हित साधायचे याचा संपूर्ण मार्ग सांगितला आहे. या ग्रंथामुळे आपले परमार्थात वापरले जाणारे शब्द उदा. स्थूल, सुक्ष्म, कारण, महाकारण देह, तसेच जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या ह्या अवस्था याचे नेमके अर्थ काय आहेत, त्या देहाचे स्वरूप काय आहे, याचा उकल येथे सविस्तरपणे आला आहे.

या पुस्तकातील सर्वच अर्थ, उपलब्ध अर्थापेक्षा वेगळे, मर्मग्राही झाले आहेत. खूपच नवीन नवीन संज्ञांचे अर्थ स्पष्टपणाने मांडले आहेत. त्यातील मला आवडलेले काही अर्थ खालीलप्रमाणे देत आहे.

१) **परमामृताचा अर्थ** : परमामृताची प्राप्ती म्हणजे परम प्राप्ती. ज्या चंचळ चैतन्यातून हे जड विश्व निर्माण होते ते चंचळ चैतन्य म्हणजे अमृत तर हे चंचळ चैतन्य ज्या निश्चळ चैतन्यापासून निर्माण होते ते निश्चळ चैतन्य म्हणजे 'परमामृत' होय. असे जीवाला परमामृत प्राप्त झाले की जीवाचे जन्म हे दारिद्र्य नाहीसे होते.

..... प्रकरण १ ले, मंगलचरण, ओवी क्र.१

२) **'निवृत्तीदेवी ज्ञान' व्याख्या :** वृत्तीरहित ज्ञानाचे ठिकाणी, जाणीवरहित जाणत्याचे ठिकाणी वृत्तीचे स्फुरण झाल्यावर जे ज्ञान निर्माण होते ते वृत्तीसहित ज्ञान वेगळे व वृत्तीचे स्फुरण व्हायच्या अगोदर जे वृत्तीरहित ज्ञान आहे, जे निवृत्ती अवस्थेतील स्मरण आहे, ज्याला 'निवृत्तीदेवी ज्ञान' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात

..... प्रकरण ५ वे, लिंगदेह-निरसन, ओवी क्र.१०

३) **'अहंकाराची' व्याख्या :** मनामध्ये जो साधनेने विकल्परहित संकल्प राहतो, त्या संकल्पाचे ठिकाणी बुद्धीचा निश्चय होतो. बुद्धीचा निश्चय होऊन जो अर्थ समजतो त्या अर्थाचे ठिकाणी अनुसंधान ठेवणारे ते चित्त. तर हे द्वैतानुसंधान ठेवण्याच्या चित्ताच्या प्रवृत्तीला अहंकार म्हणतात.

..... प्रकरण ५ वे, लिंगदेह-निरसन, ओवी क्र.१२

४) **'आत्मप्रकाशाची' व्याख्या :** विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या नेणीवेची - अज्ञानाची - जाणीव (ज्ञान) झाली तर नेणीव उरत नाही. जी जाणीव उरली तो आत्मप्रकाश.

..... प्रकरण ६ वे, कारणदेह-निरसन, ओवी क्र.७

५) **'महाकारण देहाची' व्याख्या :** मनोलयाने अहंकार नाहीसा होतो, चैतन्याची नेणीव नाहीशी होऊन चैतन्याची जाणीव होते, 'पाहणे आपणासी आपण' हे आत्मज्ञान होते. या अद्वैतानुसंधानाला 'महाकारणदेह' म्हणतात.

..... प्रकरण ७ वे, महाकारणदेह-निरसन, ओवी क्र.६

६) **'तुर्या अवस्था' व्याख्या :** स्थूल, सूक्ष्म, कारण या तिन्ही देहातील अनुक्रमे जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होते. या तिन्ही देहात सर्वसाक्षी मनाला एका चैतन्याची अहर्निशी जाणीव होते. हे अखंड चैतन्याचे स्मरण असणाऱ्या अवस्थेला तुर्यावस्था म्हणतात

..... प्रकरण ७ वे, महाकारणदेह-निरसन, ओवी क्र.७

७) **'शून्याची' व्याख्या :** महाकारणदेहात जे आपण आपला वेगळेपणाने

अनुभव घेतो त्या अवस्थेला शून्य म्हणतात.

..... प्रकरण ८ वे, शून्य-खंडन, ओवी क्र.१

आमचे श्रीनानाकाकांची सर्व नोकरी सांगलीतच झाल्यामुळे त्यांना श्रीदादांचा नित्यसहवास लाभला. त्यांना प.पू.दादांची कीर्तने ऐकण्याचे भाग्य लाभले. त्यामुळे प.पू.दादांची एखादा विषय मांडणेची पद्धत, बोलण्याची ढब त्यांनी अगदी जवळून अनुभवली होती. प.पू.नानाकाका हे आमचे प.पू. अण्णांचे नित्य कीर्तनामध्ये रोज थोडा वेळ कीर्तनातील विषयावर बोलायचे. त्यावेळी त्यांनी मांडलेले विषय हे अत्यंत मार्मिक, थोडक्या शब्दात, नाविन्यपूर्ण असायचे. त्यामुळे सर्व श्रोते त्यांचे हे थोड्या वेळाचे प्रवचन ऐकून मंत्रमुग्ध होऊन जायचे. पूर्वी एका रामनवमीच्या कीर्तनामध्ये श्रीदासराममहाराज यांनी आमचे श्रीनानाकाकांचे बद्दल 'माझे लाडके शेंडेफळ' असा उल्लेख केलेला आहे, आणि या कीर्तनाची ध्वनीफीत आपले वेबसाईटवर आजही उपलब्ध आहे.(www.dasrom.org) हाच त्यांना प्राप्त झालेला आशीर्वाद आहे आणि त्याचेच सर्व फलित आहे असे मला वाटते. तसेच पुढे श्रीदादांचे भाषेत त्यांचे हातून खालील विविध पुस्तके लिहिली गेली. त्या त्या पुस्तकातील काही सारांश मी खाली देत आहे.

**१) हरिपाठ संकीर्तन (प्रकाशन साल २००७)**

ती.प.पू. श्रीदासराममहाराजांनी ३९ वर्षे विविध पद्धतीने ३९ वेळा ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ सांगितला. त्याचेच एकत्रीकरण साधून, त्या हरिपाठाचा सखोल अभ्यास करून, प्रत्येक चरणाचा गूढार्थ प्रगट केला. त्यासाठी लागणारे संदर्भ अभंग, ओव्या शोधून त्या त्या योग्य ठिकाणी त्याचा वापर करून ज्ञानेश्वर महाराजांना नेमके काय सांगायचे आहे हे स्पष्ट केले, तो ग्रंथ म्हणजे हरिपाठ संकीर्तन.

**२) ज्ञानेश्वरी प्रसाद (प्रकाशन साल २००९)**

ती.प.पू. श्रीदासराममहाराजांचे नित्य कीर्तनामध्ये ज्या ज्ञानेश्वरीतील ओव्या यायच्या त्याच ओव्या येथे सार रूपाने संग्रहित करून त्याचे

विवरण संक्षिप्त स्वरूपात दिलेले आहे. या ओव्यांचा ती.प.पू. दासराममहाराजांचे कीर्तनातून व्यक्त होणारा अर्थ हा सर्वस्वी वेगळा असायचा. तसाच अर्थ लिहिण्याचा प्रयत्न आमचे काकांनी केलेला आहे.

**३) तो हा दासबोध (प्रकाशन साल २०११)**

'मी कोण' याचा सारासार विचाराने शोध घेताना समर्थ रामदासस्वामींनी सतत एकांतात केलेल्या मंथनातून त्यांचे ठिकाणी समर्थ श्रीरामकृपेने प्रकट झालेले सार चिंतन - आत्मचिंतन म्हणजेच हा दासबोध ग्रंथ होय. ह्या दासबोध ग्रंथातील नित्यकीर्तनामध्ये येणाऱ्या ओव्या अर्थानुरूप, विषयानुरूप पुनर्गठीत करण्याचे काम माझे काकांनी केले. 'तो हा दासबोध' भावार्थासहित उपलब्ध आहे.

**४) चैतन्यब्रह्म (प्रकाशन साल २०१३)**

श्रीगोंदवलेकर महाराजांचे चरित्रात व श्रीदासराममहाराजांचे चरित्रात खूपच साम्य आहे असे नानाकाकांना आढळले. त्या दोघांचे जीवनातील ठळक साधर्म्य असणाऱ्या गोष्टी एकत्रितपणे येथे घेतल्या आहेत. तेच हे चैतन्यब्रह्म.

**५) आत्मारामपाठ (प्रकाशन साल २०१५)**

श्रीदासराम गाथेमधील आमचे श्रीनानाकाकांनी निवडलेले २० अभंग नित्यपठणासाठी एका चालीत म्हणता येतील असे असून ('वारे भरले या नयनात' ह्याची चाल सोडून) त्याचे विवरणासहित झालेले पुस्तक म्हणजे 'आत्मारामपाठ'. अनंत युगाचा आत्माराम हाच आमुचे ती.प.पू.दादांचे दृष्टीने 'राम' होता. हा आत्माराम कसा महत्त्वाचा आहे, तो कसा आहे, संतांनी तो कसा अनुभवला, या आत्म्याला जाणणे हाच आपुला खरा धर्म असून, साधन मार्गाने कसा आत्मा अनुभवता येतो हे सांगणारे २० अभंग विवरणासहित येथे दिले आहेत.

**६) नित्यकीर्तनानंदा (प्रकाशन साल २०२०)**

आमचे घरातील नित्यकीर्तने ही चैत्र महिन्यामध्ये ती.प.पू. मामांनी

रचलेल्या श्रीरामपाठावरती, श्रावण महिन्यामध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरिपाठावरती व उरलेल्या दहा महिन्यांसाठी ती.प.पू.मामांनी रचलेले नित्यपाठाचे २० अभंग, असे एकूण ३६५ विषयावरती एकत्रित लिहिलेली कीर्तनाची विवरणे म्हणजे 'नित्यकीर्तनानंदा'. आमचे श्रीदादांनी ३९ वर्षे ३९ प्रकारांनी रामपाठ, हरिपाठ व नित्यपाठ सांगितला. त्याचे संपूर्ण सार या ग्रंथात आपल्याला पहायला मिळते.

**७) अधिकस्य अधिकम् (प्रकाशन साल २०२४)**

वासना जाळून पुरुषोत्तमाची ओळख होण्यासाठी, नराचा नारायण होण्यासाठी, परमार्थातील कळस गाठण्यासाठी नरदेह प्राप्त झाल्यावर काय काय साधावे लागते हे श्रीमामामहाराजांनी त्यांचे अधिकाचे अभंगात सांगितले आहे. त्यातील निवडक ३० अभंगांवरील विवरण म्हणजे 'अधिकस्य अधिकम्' होय.

**८) समर्थमानस (प्रकाशन साल २०२४)**

श्रीसमर्थांनी मनातील चंचळत्व हा दोष दूर होणेसाठी मनाला उपदेश केला ते हे मनाचे श्लोक. या २०५ श्लोकांवरील गूढार्थ विवरण म्हणजे समर्थमानस.

आमचे घरी असलेली नित्यकीर्तन परंपरा पुढे चालविताना ह्या ग्रंथरूपी ज्ञानाचा आधार पुढील पिढ्यांना अनायासे मिळणार आहे. यावरून असे स्पष्ट होते की त्यांनी श्रीमामामहाराज, श्रीदासराममहाराज यांचा खरा अनुभवासहित ज्ञानवारसा पुढे जोपासला आहे. 'परमामृत' या विषयावर टीका लिहिणे हे काही कुणाचेही काम नाही. ज्याने आत्मज्ञानाच्या सर्व अंतरखुणा आत्मसात करून, सर्व अंतरंगातील ज्ञानाच्या खुणा अनुभवलेल्या आहेत त्यालाच या विषयावर टीका लिहिणे शक्य आहे. यावरून आमचे प.पू.नानाकाकांना श्रीसद्‌गुरू मामामहाराज, श्रीसद्‌गुरू दासराममहाराज यांचे कृपेने अशी आत्मानुभूती नक्की प्राप्त झाली आहे अशी मला खात्री आहे.

या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्यास माझी वाणी - माझी लेखणी अपात्र

आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. पण माझेवर असलेले काकांचे प्रेमामुळेच मी ही प्रस्तावना लिहिणेचा प्रयत्न येथे केला आहे. मला ह्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य लाभले त्यासाठी मी माझे बंधू श्री.अनिरूद्ध, श्री.अनिकेत तसेच आदरणीय प.पू.श्रीनानाकाका व ती.सौ.अपर्णाकाकू यांचा शतशः आभारी आहे. ह्या सर्वांचे असेच प्रेम माझेवरती राहूदे ही ईश्वरचरणी प्रार्थना.

तसेच या परमामृत ग्रंथाचा अभ्यास करून, त्याचे मनन, चिंतन करून मला व आपल्या सर्वांना देहातीत होणेची युक्ती लवकरात लवकर प्राप्त व्हावी अशी कळकळीची प्रार्थना आमचे योगीराज श्रीमुकुंदराज, भगवान सद्‌गुरू श्रीनिंबर्गीकरमहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीकोटणीस-महाराज, भगवान सद्‌गुरू श्रीमामामहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीदासराम-महाराज, श्रीरामसंजीवनी सीतामाता, भगवान सद्‌गुरू श्रीअण्णामहाराज, माझे पितृदेव हालसिद्धनाथभक्त प.पू.अप्पा व अंबामातेच्या पवित्र चरणी करतो व येथेच थांबतो.

*स्थळ - सांगली* **- *सुनिल सूर्यकांत केळकर***

*पौष वद्य षष्ठी*

*श्रीतात्यासाहेबमहाराज पुण्यतिथी*

*(दि.०८/०१/२०२६)*

# अनुक्रमणिका


| विषय | पान नं. |
| --- | --- |
| मंगलाचरण | २५ |
| अन्यमत - खंडण | ४२ |
| महावाक्यविवरण | ५० |
| स्थूलदेह निरसन | ५८ |
| लिंगदेह निरसन | ६८ |
| कारणदेह निरसन | ७८ |
| महाकारणदेह निरसन | ८५ |
| शून्य खंडण | ९२ |
| निदिध्यासन | ९९ |
| दृश्याभास खंडण | १०६ |
| अज्ञान खंडण | ११६ |
| स्वानुभवसुख वर्णन | १२६ |
| मुक्तीरहस्य | १३० |
| साक्षात्कार | १४१ |

प्रकरण १ ले

# मंगलाचरण

***नमो श्रीसद्गुरूनाथा। तूं परमप्राप्तीचा दाता।***
***कृपासिंधू जी समर्था। अनंता अपारा।।१।।***

तात्पर्यार्थ - परमामृताची प्राप्ती म्हणजेच परमप्राप्ती. ज्या चंचळ चैतन्यातून हे जड विश्व निर्माण होते ते चंचळ चैतन्य म्हणजे अमृत तर हे चंचळ चैतन्य ज्या नि:श्चळ चैतन्यापासून निर्माण होते ते निश्चळ चैतन्य म्हणजे परमामृत होय. हे निश्चळ चैतन्य हे चराचराचे मूळ - विश्वाचे मूळ - असून त्याला वेदांतात 'केवलज्ञान' म्हणतात. हे विश्वाचे मूळ हे नि:खळ आनंदस्वरूप असून त्या विश्वाच्या उगमी जन्ममरण असत नाही. हे विश्वाचे मूळ - उगमस्थान - प्राप्त झाले की मिळवायचे असे काही राहात नाही. त्याचे पदार्थाचे हवेपण - हव्यास - संपतो. विश्वातील साकार पदार्थ कितीही प्राप्त करा, जीवाची तृप्ती होत नाही, त्याचे हवेपण संपत नाही, म्हणून साकार पदार्थांची होते - ती प्राप्ती. तर विश्वाचे मूळ प्राप्त झाले की त्याचे हवेपण संपते म्हणून ती परमप्राप्ती. हे विश्वाचे मूळ - केवलज्ञान - ज्यांना प्राप्त होते ते स्वरूपाकार तीर्थरूप - ज्ञानरूप - आत्मरूप - अर्थरूप - समर्थ - विदेही संत सद्गुरूपदावर आरुढ होतात. ते कृपासिंधू आत्मरूप समर्थ सर्व विश्वात भरून राहिलेले अमर्याद, आदी अंत नसणारे अनंत असतात. अशा सद्गुरूनाथांचे पायीच नमन साधून त्या विश्वाच्या मुळाची अनुभूती येते. त्या, मिळवायचे काही न उरलेल्या वासनारहित शिष्याला मोक्षसुख प्राप्त होते. ***('दास म्हणे तेणे मूळ मेळविले। नाही त्या उरले मिळणेचे।।' - श्रीमामामहाराज केळकर, 'जडाचे मूळ ते चंचळ। चंचळाचे मूळ ते निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।', 'येक***

***बळाचे निवडले। ते पोहतची उगमास गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।', 'जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।', 'साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोन येकची जाले। देहातीत वस्तू।।'- श्रीसमर्थ, 'जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मन जडले गुरुपायी आता। मन जडले गुरुपायी। जन्ममरण मज नाही नाही।। स्वस्वरूपी लागला डोळा। निजतेजाचा हाची उमाळा। सोहंभावे मुकुंदरायी। भरला निजगुरू सर्वाठायी।।' - श्रीसंत मुकुंदराज)***

***तू आनंदमय स्वयंप्रकाश। कैवल्यदाता परम ईश।***
***तू निजरूपे अविनाश। निराकार।।२।।***

तात्पर्यार्थ - संत, सद्‌गुरू हे साकार मनुष्याकृती 'देह म्हणजे मी' असे मानणारे असत नाहीत, तर ते सदा असणाऱ्या अविनाश स्वरूपी मिळालेले, एक देहातीत वस्तूरूप - निजरूप - झालेले, निराकार, केवळ आनंदाचे स्वयंप्रकाश चैतन्यरूप असतात. सायुज्यमुक्तीचे - कैवल्याचे - दान फक्त या विदेही देवरूप स्वयंब्रह्म सद्‌गुरूंपाशीच प्राप्त होते. ***('जे गुरुसी मनुष्य मानिती। ते मिथ्या गुरुभक्ती। त्यासी कल्पांती नोहे विश्रांती। उपदेश भ्रांती मनुष्यत्वे।।'- श्रीनाथमहाराज, 'साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोन येकची जाले। देहातीत वस्तू।', 'महाराजे चक्रवर्ती। जाले आहेत पुढे होती। परंतु कोणी सायुज्य मुक्ती। देणार नाही।।', 'देहापासी गेला देही। तो कैसेनी होईल विदेही। म्हणोनी ज्ञात्यावाचून नाही। ज्ञान-प्राप्त।।'- श्रीसमर्थ, 'नमो नमो दिगंबरा। प्रकाशरूप सुंदरा।'- श्रीचिमडमहाराज, 'सद्‌गुरूसमान नाही कोणी जगी। व्यासरूप अंगी***

***सदा असे। तोची एक व्यास जया नाही नाश। दिक, काल आकाश। जयाचेनी।।'- श्रीदासराममहाराज, 'तू सच्चिदानंदघनू। षडविकारविहीनू। स्वयंप्रकाशे प्रकाशमानू। तू स्वसंवेद्य।।' - श्रीसंत मुकुंदराज)***

***तू नि:संग निरंजन। तू निरंतर अभिन्न।***
***नाही तुजसमान। कोणी देवा।।३।।***

तात्पर्यार्थ - विनाशी अनेक रूपे असणाऱ्या जगात जो एक गुप्तपणे जगामागे, जगावेगळा, अविनाशी देव स्थित आहे, त्या एका देवाशी एकी होऊन - समरस होऊन - जो देवरूप होऊन जनांपेक्षा, जगापेक्षा वेगळा होतो, अर्थात त्या एकासारखा दृश्य जगात दुसरा कोणी असत नाही, असा, देवा भक्तात अंतर नाही असा, निरंतर अभिन्न सद्‌गुरू, अहंकाराचा मळ नसणारा नि:संग असतो. निवृत्ती निर्गुण निरंजन असे अत्यंत विमळ शुद्ध सद्‌गुरू, निरंजनी वास करतात. पैल मेरूचे शिखरी, परेच्या पलिकडे हे निरंजन ठिकाण अनुभवता येते. दिननीशी होणारे षड्‌विकारात्मक आयास टाकून साधणाऱ्या गुरुभजनाच्या सहाय्याने हे गुरुस्थान प्राप्त करता येते. निरंजन स्थळी वास करणाऱ्या निवृत्ती निर्गुण सद्‌गुरूंचे दर्शन झाले तर चराचराचे मूळ अशा विमळशुद्धस्वरूपज्ञानाची प्राप्ती होते. या वृत्तीरहित ज्ञानाने पूर्ण समाधान होते. त्याला मोक्ष प्राप्त होतो. ***('अनेकी सदा एक देवासी पाहे', 'दृश्यावेगळा दृश्याअंतरी। सर्वात्मा तो सचराचरी। विचार पाहता अंतरी। निश्चयो बाणे।।', 'वृत्तीरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।', 'आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षची पावणे।।' - श्रीसमर्थ, 'न करी रे संग राहे रे निश्चळ। लागो नेदी मळ अहंतेचा।। या नाव अद्वैत खरे***

*ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबड ते।।', 'निरंजनी आम्ही बांधियेले घर। निराकारी निरंतर राहिलो आम्ही।। निराभासी पूर्ण झालो समरस। अखंड ऐक्यास पावलो आम्ही।। तुका म्हणे आता नाही अहंकार। झालो तदाकार नित्य शुद्ध।।'- श्रीतुकाराममहाराज, 'नित्य दीपावळी। दास तुज ओवाळी। निरंजन स्थळी। वास करूनी। जय जया श्रीगुरू काकडारती करू। मी तुझे लेकरू। मायबापा।।' - श्रीचिमडमहाराज, 'सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नाचत गुरुभजनी। आम्ही जाऊ निरंजनी।।'- श्रीपंतमहाराज)*

*तू जव कृपा करिसी। तव संसारबंधना तोडिसी।*
*अविद्येपासुनी सोडविसी। तारिसी जीवा।।४।।*

तात्पर्यार्थ - हे गुरू, तुमची जर एखाद्यावर कृपा झाली म्हणजे तुमचा अनुग्रह ज्या नरास प्राप्त झाला, तर तो नर, जीव वासनेपासून मुक्त होतो. साहजिकच त्याचा जन्ममरण हा संसार सहजच शून्यवत होतो. संसाराच्या गोष्टी सुटल्यावर त्याला आत्मज्ञान होते. कल्पना सुसरीची मिठी सुटून अविद्येचा वेगी पूर ओसरतो; जीवाला मोक्ष प्राप्त होतो. *('तुमचा अनुग्रह ज्या नरासी झाला। त्यासी स्वरूप दावूनी मुक्तची केला।।'- श्रीचिमडमहाराज, 'जेची क्षणी अनुग्रह केला। तेची क्षणी मोक्ष जाला। बंधन काही आत्मयाला। बोलोची नये।।', 'वासना नदी महापुरी। प्राणी बुडता ग्लानी करी। तेथे उडी घालुनी तारी। तो सद्गुरू जाणावा।।'- श्रीसमर्थ, 'अविद्येचा पूर बाबा वेगी ओसरेना। कल्पना सुसरीची मिठी सुटेना।।' -संत मुक्ताबाई, 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेची झाली अंगे हरीरूप।।' - श्रीनाथमहाराज, 'आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव*

***म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***न होय जे देवां असुरा। ते तुझे करणे दातारा।***
***समर्थ न देखो दुसरा। तुजवाचोनी।।५।।***

तात्पर्यार्थ - स्वर्गामध्ये अमर्याद भोग भोगणाऱ्या देवांना 'दमन' करायला जमत नाही, तर संपत्ती आणि शक्तीने उन्मत्त झालेल्या दानवांना दया करणे शक्य होत नाही. ते दमन व ती दया सद्गुरूकृपेने देवांना व दानवांना अनुभवायला मिळते. आत्मबोध सुकर होतो. केवळ सद्गुरूकृपेने देवांना, दानवांना आत्मज्ञान होते. परब्रह्म असणाऱ्या राम आणि कृष्णाला आत्मज्ञान हे अनुक्रमे मुनी वसिष्ठ व ऋषी संदीपान यांचेमुळे प्राप्त झाले होते. तर केवळ मुनी नारदांमुळे असंख्य हत्त्या करणाऱ्या लुटारू वाल्या कोळ्याचा महर्षी वाल्मीकी झाला, दैत्यकुळामध्ये जन्मलेला प्रल्हाद हरीभक्त झाला. प्रजापतींनी देवांना दमन, दानवांना दया, तर मानवांना दान उद्धारासाठी आचरण्यास सांगितले होते. असे सर्वांना उपदेशाने सत्यज्ञान प्राप्त करून देणाऱ्या सद्गुरूंसारखा दुसरा कोणीही दाता असू शकत नाही.***('परब्रह्म राम वसिष्ठा शरण। कृष्णे संदीपान गुरू केला।।', 'श्रीरामासी राम ठावा जरी असता। तरी का शरण जाता वसिष्ठासी।।'- संतवचन, 'माहाराजे चक्रवर्ती। जाले आहेत, पुढे होती। परंतु कोणी सायुज्यमुक्ती। देणार नाही।।', 'जे त्रैलोकी नाही दान। ते करिती संतसज्जन। तया संतांचे महिमान। काय म्हणोनी वर्णावे।।' - श्रीसमर्थ, 'अगा दैत्याचिया कुळी। प्रल्हादू तो मी न्याहाळी। म्हणोनी दैत्यभावादीमेळी। लिंपेचिना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***आणिका कवणा नमस्कारू। कवणाचे स्तवन करू।***
***जय जया जी श्रीगुरू। अगाध महिमा।।६।।***

तात्पर्यार्थ - सद्‌गुरू हे मायेच्या पलीकडील परब्रह्मस्वरूप आहेत. आपले स्वरूप हेच त्यांचे गुरूरूप आहे. आपण स्वरूपाकार होणे म्हणजे स्वरूपदर्शन - गुरूदर्शन. मग अनुग्रह घेऊन अहंकाररहित अवस्थेत स्वरूपाकार झाल्यावर, गुरूरुपाशी तद्रूप झाल्यावर, अद्वैत स्थितीत नमस्कार दुसऱ्या कुणाला कसा करावा? शब्दात मायेचे वर्णन करता येते. शब्दात जे वर्णिले जाते ती सारी माया. मग परब्रह्माचे वर्णन कसे करणार? वर्णन केले तर ते वर्णन दुसऱ्याचे होणार, ते माझे वर्णन होणार नाही. काही न बोलणे - मौन - हीच त्यांची स्तुती. सद्‌गुरूंचे वर्णन करता येत नाही हेच त्यांचे वर्णन. त्यांचा अगाध महिमा वर्णन करायचा म्हणजे सोन्याला चांदीचा मुलामा दिल्यासारखे आहे. त्यांचे एकपण जाणवून त्यांना शरण जाणे हेच हितकर. अंतर्निष्ठांच्या खुणा अंतर्निष्ठ होऊन जाणणे, जीवन्मुक्तांची लक्षणे जीवन्मुक्त होऊन जाणणे, हेच हितकारक. श्रीगुरूंचाच जयजयकार करणे हेच श्रेयस्कर.

***('म्हणोनी सद्‌गुरू वर्णवेना। हे गे हेची माझी वर्णना। अंतरस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती।।', 'जे जे दृष्टीने देखिले। जे जे शब्दे वोळखिले। जे जे मनास भासले। तितुके रूप जयेचे।।', 'देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मूक्त जाणे।।', 'मायेवीण माहेर विश्रांती ठावो। शब्दी अर्थी लाभ बोलणे वावो।।'- श्रीसमर्थ, 'का साडेपंधरया रजतवणी। तैशी स्तुतीची बोलणी। उगियाची माथा ठेविजे चरणी। हेची भले।।', 'स्तुती काही न बोलणे। पूजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।', 'पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणिजे जे एकपण। तयाची नाव शरण। मज येणे गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जैसा सर्व पटामाजी एक तंतू। तैसा तू विश्वभरितू।***
***सर्वव्यापुनी विरहितू। अलीप्त तू।।७।।***

तात्पर्यार्थ - ज्याप्रमाणे वस्त्रामध्ये एक सुतच सर्वत्र व्यापलेले असते त्याचप्रमाणे सोहंस्मरणाचा एकच तंतू या सर्व सृष्टीला व्यापून राहिला आहे. पण हे अखंड स्मरण (सोहंभावाचे स्मरण) सृष्टीपेक्षा वेगळे आहे. या सोहंभावाचे स्मरणात विस्मरण अजिबात असत नाही. हा सोहंभाव व त्याचे अखंड स्मरण, हा निजगुरू सर्वठायी व्यापून राहिला आहे. पण तो सृष्टीहून परता आहे. सृष्टीचा स्पर्श त्याला नाही. शरीरभाव नाहीसा झाला किंवा दृश्य ओसरले तर ही सोहंभावाची प्रतिती प्रगट होते. ***('झाला विठ्ठल संग। गमनी भरला रंग।। एकची तंतू सोहंस्मरणाचा। वाजत जैसा चंग।। चिन्मयमूर्ती परात्पर आहे। पाहूनी झालो दंग।।' - श्रीरंगनाथस्वामी, 'सोहंभावे मुकुंदरायी। भरला निजगुरू सर्वा ठायी।।' - श्रीसंत मुकुंदराज, 'सोहंभावे स्मरला। स्मरला नाहीच की विस्मरला।।' - संत शिवदीन केसरी, 'तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ही अनेक सगुण रूपे। तू धरिसी आपुलेनी व्यापे***
***शिवशक्तीची साकार रूपे। दाविसी तू।।८।।***

तात्पर्यार्थ - अष्टधा प्रकृतीचे मूळ - दृश्याचे मूळ - ही शिवशक्ती - पुरुषप्रकृती - मूळ माया - हीच असून तिनेच ही साकार रूपे - सगुण रूपे - आपणास दाखविली आहेत. मूळमायेपासून या साकार जगापर्यंत सारे वायुरूप चंचळ चैतन्यापासून निर्माण झालेले आहे. हे सारे कर्तृत्त्व वायुरूप चैतन्याचे आहे. एकट्या चैतन्याच्या अधिष्ठानावर हे सारे जड विश्व साकारले आहे. त्याच्यामुळेच हे सारे दृश्यमान झालेले आहे. हे

चंचळ चैतन्य निश्चळ चैतन्यापासून निर्माण झालेले आहे. हे चराचराचे मूळ हे निश्चळ चैतन्य हेच परमामृत आहे. हेच सद्‌गुरूंचे खरे रूप आहे.

*(‘अष्टधा प्रकृतीचे मूळ। ते हे मूळमायाच केवळ। सूक्ष्मरूप बीज सकळ। मुळीच आहे।।’, ‘निश्चळी चंचळ चेतले। म्हणोनी चैतन्य बोलिले। गुणसमानत्वे जाले। गुणसाम्य ऐसे।।’ , ‘मूळमायेपासून सेवटवरी। वायोची सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।’, ‘तयामध्ये जाणीवकळा। जगज्ज्ञोतीचा जिव्हाळा। वायो जाणीव मिळोन मेळा। मूळमाया बोलिजे।।’, ‘वायोस म्हणती प्रकृती। आणि पुरुष म्हणती जगज्ज्ञोती। पुरुषप्रकृती शिवशक्ती। याचेच नाव।।’, ‘पाच भूते तीन गुण। आठ जाली दोनी मिळोन। म्हणोनी अष्टधा प्रकृती जाण। बोलिजेते।।’, ‘पंचभूते आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृती जाण। अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसे।।’, ‘निश्चळामध्ये चंचळ। तेची कल्पना केवळ। अष्टधाप्रकृतीचे मूळ। कल्पनारूप।।’, ‘जडाचे मूळ ते चंचळ। चंचळाचे मूळ ते निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।’, ‘चंचळपणे विकारले। सगुण ऐसे बोलिले। येर ते निर्गुण उरले। गुणातीत।।’ - श्रीसमर्थ, ‘निश्चळाच्या अंगावरी। उठती चंचळाच्या लहरी।।’- संतवचन, ‘तैसी छत्तीसही इये तत्वे। मिळती जेणे एकत्वे। तेणे समूहपरत्वे। क्षेत्र म्हणिपे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*

***तुजवीण अन्य न देखे कोणी। म्हणोनी आणिकाते नमनी।***
***हा मस्तक तुझिये चरणी। ठेविला सत्य ।।९।।***

तात्पर्यार्थ - नमन झाल्याने, कल्पना सरल्याने आणिकामध्ये हे गुरू, तुमच्याशिवाय वेगळे अन्य काही दिसतच नाही. तुम्ही सत्य प्रगट झालात की विश्वाचा आभास मावळतोच. सारे भेद नाहीसे होऊन तुमचे

एकपण जाणविणे म्हणजेच तुमच्या चरणावर मस्तक ठेवणे, तुम्हाला शरण जाणे होय. ***('स्वस्तिश्री वटेशू। जो लपोनी जगदाभासू। दावी मग ग्रासू। प्रगटला करी।।', 'तू जयाप्रती लपसी। तया जग हे दाविसी। प्रकटू तै करिसी। आघवेची तू।।', 'पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणिजे जे एकपण। तयाची नाव शरण। मज येणे गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तू शुद्धात्मा स्वयंज्योती। तुझी सर्वत्र ज्ञानदीप्ती।***
***नमो नमो जी श्रीगुरूमूर्ती। आनंदविभो ।।१०।।***

तात्पर्यार्थ - हे गुरू, तुम्ही स्वत: ज्ञानज्योतीरूप - स्वयंप्रकाश - आहात. तुमच्या ज्ञानप्रकाशाने मिथ्या कल्पनेचा नाश होऊन द्वैताचे अनुसंधान सुटते व अद्वैतानुसंधान जडते. विश्वाचा आभास नाहीसा होऊन सर्वत्र ज्ञानाचा प्रकाश प्रगटतो. प्रकाशरूप सुंदर तुमच्या रूपाचे ठिकाणी नमन साधते व तुमच्यामुळे आनंदरूपाचा प्रत्यय येतो.

***('तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।', 'जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।' - श्रीसमर्थ, 'जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नमो नमो दिगंबरा। प्रकाशरूप सुंदरा।।' - श्रीचिमडमहाराज)***

***तू ब्रह्मा रूपे उत्पत्ती करिसी। विष्णुरूपे प्रतिपाळिसी।***
***रुद्ररूपे संहारिसी। पुनरपी रचावया।।११।।***

तात्पर्यार्थ - हे गुरू, तुम्ही परब्रह्मरूप आहात. तुमच्याठायी असणारा, अखंडस्मरणाने अहर्निशी परमार्थ घडविणारा, चौथा शुद्ध सत्व गुण ही

तुमची विशेषता आहे. या गुणातून पुढे त्रिगुण निर्माण होतात व तमोगुणातून पंचमहाभूते. यातील जाणीव नेणीव, सुख दुःख आदी द्वंद्वांनी प्रतीत होणारा रजोगुण हा ब्रह्मा असून त्यातून विश्वाची, दृश्याची उत्पत्ती होते. तर उर्ध्वगतीत प्रतीत होणारी शुद्ध जाणीव ही सत्वगुणी विष्णू असून ती विश्वाचा प्रतिपाळ करणारी आहे. अधोगतीत प्रतीत होणारी नेणीव हा तमोगुणी रुद्र त्याचे नाशास कारणीभूत होतो. हा रुद्ररूपे होणारा संहार हा पुनर्निमाणासाठी झालेला असतो. अध:पतन हे सुद्धा उद्धारासाठीच होते. ***('वायोमध्ये जाणीव गुण। तेची ईश्वराचे लक्षण। तयापासून त्रिगुण। पुढे जाले।।', 'शुद्ध नेणीव तमोगुण। शुद्ध जाणीव सत्वगुण। जाणीव नेणीव रजोगुण। मिश्रीत चालला।।', 'जाणीव म्हणिजे अंतःकरण। अंतःकरण विष्णुचा अंश जाण। विष्णु करितो पाळण। येणे प्रकारे।।', 'काही जाणीव काही नेणीव। हा रजोगुणाचा स्वभाव। जाणता नेणता जीव। जन्मास येती।।', 'जाणीवेने होते सुख। नेणीवेने होते दुःख। सुखदुःख आवश्यक। उत्पत्तीगुणे।।', 'नेणता प्राणी संहारतो। नेणीव तमोगुण बोलिजेतो। तमोगुणे रुद्र संहारितो। येणे प्रकारे।।', 'सत्वगुणे भगवद्भक्ती। रजोगुणे पुनरावृत्ती। तमोगुणे अधोगती। पावती प्राणी।।', 'पुढे तिजपासाव कोण। सत्वरजतमोगुण। तमोगुणापासून निर्माण। जाली पंचभूते।।' - श्रीसमर्थ, 'अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा। जया नाव म्हणती ब्रह्मा। स्थिती जे विष्णुनामा। पात्र जाहले।।', 'मग आकारू हा हारपे। तेव्हा रुद्र जे म्हणिपे। तेही गुणत्रय जेव्हा लोपे। तै जे शुन्य।।', 'उपजे ते नाशे। नाशले पुनरपी दिसे। हे घटिकायंत्र जैसे। परिभ्रमे गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तू सर्वसाक्षी सर्वज्ञ। तू सर्वविद्याविद् प्राज्ञ।***
***तू तत्वार्थ जीव सर्वज्ञ। सर्वेश्वर।।१२।।***

तात्पर्यार्थ - हे गुरू, सर्वसाक्षी मनाने तुर्यावस्थेत सर्व (ब्रह्म) जाणणारे - सर्वज्ञ - तुम्हीच आहात. अर्थात तुम्हीच ब्रह्मविद्या जाणणारे प्रज्ञावान प्राज्ञ आहात. सर्व तत्त्वांना ज्यामुळे अर्थ प्राप्त होतो असे वस्तूरूप स्वरूपाकार तुम्हीच आहात. तर कल्पनेच्या उपाधीतील जीव व मायेच्या उपाधीतील शिव - ईश्वर तुम्हीच आहात. ***(‘कल्पना उपाधी तेणे झाला जीव। मायोपाधी शिव बोलिजेते।।’- संतवचन, ‘म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेची जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।’, ‘दृश्य पदार्थची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तू।।’- श्रीसमर्थ)***

***तू जाणशी स्वरूपासी। म्हणोनी जाणीव स्फुरविसी।***
***परमात्मा म्हणविसी। यया उपाधीस्तव ।।१३।।***

तात्पर्यार्थ - सद्‌गुरू हे अनिर्वाच्य निवृत्ती निर्गुण म्हणजे उन्मनी अवस्थेत जाणीवरहित जाणते, वृत्तीरहित ज्ञानी परब्रह्मरूप असतात. ते आपल्यासारख्या मूढ लोकांना स्वरूपाची जाणीव व्हावी म्हणून उन्मनी अवस्थेतून तुर्या अवस्थेत येतात. स्वरूपाकार असणारे महात्मे स्वरूप जाणणारे, आकाश जाणणारे होतात व ही स्वरूपाची जाणीव हृदयदेशी आपल्या ठिकाणी प्रगट करतात. वस्तुत: परब्रह्मरूप असणारे जगाच्या उद्धारासाठी या वेगळेपणाने पाहण्याच्या उपाधीने स्वत:ला परमश्रेष्ठ आत्मरूप म्हणवितात - परमात्मा म्हणवितात. ***(‘अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेची उन्मनीची स्थिती। निरोपाधी विश्रांती। योगियांची।।’, ‘मीपण ते बुडाले। विवेके वेगळेपण गेले। निवृत्तीपदास प्राप्त जाले। उन्मनीपद।।’, ‘वेगळेपणे पहावे। तयास आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।’, ‘जेथे नाही दृश्यभान। जेथे जाणीव हे अज्ञान। विमळशुद्धस्वरूपज्ञान। यासी बोलिजे।।’- श्रीसमर्थ,***

*'तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरीटी। येर भिन्नपण ते उठी। अज्ञानास्तव।।', 'एथ जाणीव करी तोची नेणे। आथिलेपण मिरवी तेची उणे। आम्ही जाहलो ऐसे जो म्हणे। तो काहीची नव्हे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जे परब्रह्म सगुण। तोची परमात्मा जाण। परमपुरुष ऐसी खूण। तेथची बोलिजे।।'- संत मुकुंदराज, 'आम्ही वैकुंठवासी। आलो याची कारणासी। बोलीले जे ऋषी। साच भावे वर्ताया।।' - श्रीतुकाराममहाराज)*

*तुझिये इच्छेचा विस्तारू। विस्तारले हे चराचरू।*
*जीव अंश अपारू। स्फुरसी तूची।।१४।।*

तात्पर्यार्थ - श्रीगुरूंच्या ठिकाणी सहज झालेल्या इच्छेने, कल्पनेने सोहं (श्वसन) या विश्वात चराचरात अमर्याद पसरले आहे. यायोगे अव्यक्त निर्गुण श्रीगुरुंचे ठिकाणी विश्व आकारले आहे. हे विश्वात पसरलेले संसरण - जीवपण - मीपण - म्हणजे अंशरूपाने असणारे तुमचेच स्फुरण आहे. अजन्मा आकाशरूप आत्म्याचे ठिकाणी ईच्छेने श्वसन - संसरण - निर्माण होणे हाच आकाशावर प्राणाचा संघात. या प्राणाच्या संघातानेच अव्यक्त आत्म्याचे ठिकाणी विश्वाचा भास होतो. म्हणूनच आकाशावर प्राणाचा संघात म्हणजे विश्वाची उत्पत्ती असे श्रीदासराममहाराज म्हणत असे मला वाटते. ***('बंदेयू उत्पत्ती विश्वन्नू हरिवू। माडवऱ्यारू इल्ला बंदक्को मनुजवू।। अंद्र इंदे शब्द एंद्यंदी मुंदिल्ला। इन्नू स्वयंसिद्ध बुद्धीवू बंदिल्ला।। गुरुपादसल्लीके इट्टावरू भावन्नू। संकल्प नडी ब्याडी मनदोळ बंदन्नू।। लयवाग बेको यडबला मध्यदी। काया विरहित नागी सूत्रदबल आनंदी।।', 'हरी नारायण गुरू नारायण।।' - श्रीगुरूलिंगगीता, 'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीची मी***

*आघवे।।', 'ऐसा करितेनवीण गोचरू। अव्यक्ती हा आकारू। निपजे जो व्यापारू। तया नाम कर्म।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*

***सर्व जीवांची ज्ञप्तिकळा। जगासी जाणे सकळा।***
***तो ज्ञानात्मा जिव्हाळा। त्वंपदाचा तू।।१५।।***

तात्पर्यार्थ - गुरूरूपाचे - मूळ स्वरूपाचे - ठिकाणी होणारी अहंपणाची - मीपणाची - जाणीव (कल्पना) हीच सर्व जीवांची ज्ञप्तिकळा आहे. अहंपणाच्या जाणीवेने तो निजत्वापासून विभक्त होतो. त्याला निजत्वाचे विस्मरण होते. तो भवचक्री - संसारचक्री फिरतो. भ्रमणाने त्याला भ्रांती होते. त्याला त्रिगुणाचे योगे सकळ जगाची जाणीव होते. त्याला त्रिपुटीतील वृत्तीसहित ज्ञान होते. अर्थात या काल्पनिक मीपणामुळे - जीवपणामुळे - त्वंपदामुळे - ज्याला जीव तू म्हणतो तो वृत्तीरहित ज्ञानरूपी, मूर्तीमंत ज्ञान असा ज्ञानघन ज्ञानात्मा हाच खरा मूळ ज्ञानाचा जिव्हाळा (स्त्रोत) आहे. ***('अहंपणे जाणीव जाली। तेची मूळप्रकृती बोलिली। महाकारणकाया रचली। ब्रह्मांडीची।।', 'ज्ञानी येक अंतरात्मा। सर्वामध्ये सर्वात्मा। त्याचा कळावया महिमा। बुध्दी कैची।।' - श्रीसमर्थ, 'विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी। निजस्मरणी होय भक्त। जेथे नुरे द्वैताद्वैत।।' - श्रीदासराममहाराज, 'आत्मस्वरूपा विसरूनी आम्ही भवचक्री फिरलो। काय सुकृत होते नकळे शरणपदी आलो।' - श्रीचिमडमहाराज, 'तत्पदाचा अर्थू परमात्मा। त्वंपदाचा अर्थू जीवात्मा। या उभयासी तदात्मा। बोले असिपद।।'- विवेकसिंधू)***

***माया अविद्या संबंधे। जीव ईश्वर होसी भेदे।***
***हाही आपुलेनी विनोदे। खेळ तुझा।।१६।।***

तात्पर्यार्थ - हे आत्मरूप गुरू, तुम्हाला कल्पनेच्या उपाधीने जीव ही

संज्ञा प्राप्त होते तर मायेच्या उपाधीने शिव-ईश्वर ही संज्ञा प्राप्त होते. आपले स्वत:चे सुख स्वत:ला अनुभवता यावे म्हणून आपणच हा खेळ आरंभलेला आहे. ***('कल्पना उपाधी तेणे झाला जीव। मायोपाधी शिव बोलिजेते।।'- श्रीनामदेवमहाराज, 'आपुलिया जीवे शिवासी पहावे। आत्मसुख घ्यावे वेळोवेळा।।'- श्रीतुकाराममहाराज)***

***तू स्वानंद सदोदीत। असिपदी तदात्मा अलीप्त।***
***पदातीत स्वयंभरीत। कैवल्य तू।।१७।।***

तात्पर्यार्थ - सदोदीत मिळणारा स्वरूपाचा आनंद - स्वरूपानंद - ब्रह्मानंद - निर्विषयानंद - हेच खरे गुरूंचे रूप आहे. असिपदी पापपुण्यातीत अलिप्त अशा निर्गुणी अनन्य होऊन सदोदीत असणाऱ्या स्वरूपी मिळून मोक्षाचा आनंद प्राप्त करणे म्हणजे तिन्ही पदाहून थोर अशा गुरूपदावर आरूढ होणे. ***('ब्रह्मानंद माझा गुरू। कैसा फेडू हा उपकारू।।'- संतवचन, 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।' - श्रीसमर्थ, 'तुका म्हणे ऐसा पाहाता विचार। गुरुपद थोर सर्वांहोनी।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***ऐशी करिता तुझी स्तुती। मुकावल्या वेदश्रुती।***
***मग मी प्राकृत किती। वर्णाविया योग्य तूज।।१८।।***

तात्पर्यार्थ - ब्रह्मरूप सद्गुरूंचे वर्णन शब्दात करता येत नाही. शब्दात वर्णन होते ती वट्ट माया. म्हणून वेदश्रुतींनी कितीही स्तुती केली तरी ती अपुरीच ठरते. ते सोन्याला चांदीचे पाणी दिल्यासारखे होते. वेद मुकावस्थेत आल्यावर त्यांना खरे ज्ञान झाले. वेदांचे मौन हीच वेदांनी केलेली स्तुती. जे सोहंकृत संस्कृत आहे ते वर्णन करताना थकले,

मौनावले, मग ते आपल्यासारख्या प्राकृताला कसे जमेल? जे प्रकृतीच्या पलीकडे आहे अशा अक्षर परमात्म्याचे वर्णन प्रकृतीने कृत अशा प्राकृताला कसे जमेल?

***(‘म्हणोनी सद्गुरू वर्णवेना। हे गे हेची माझी वर्णना। अंतरस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती।।’, ‘शब्दची निःशब्द होती। श्रुती नेती नेती म्हणती। हे तो आले आत्मप्रचिती। प्रत्यक्ष आता।।’ - श्रीसमर्थ, ‘स्तुती काही न बोलणे। पुजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।’, ‘म्हणोनी वेदविद नर। म्हणती जयाते अक्षर। जे प्रकृतीसी पर। परमात्मरूप।।’, ‘तेथील प्रमाण नेणवे वेदासी। ते जीवजंतूसी केवी कळे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘श्रुती स्मृती तुजला गाती। परी ती आजवरी ना होय पुरती।।’- श्रीचिमडमहाराज)***

***तू प्रेमभरीत परमपुरुष। चतुर्विध वाचेचा ईश।***
***आता देई देवा मति-प्रकाश। तूज जाणावया।।१९।।***

तात्पर्यार्थ - हे गुरु तुम्ही सर्व भूतमात्रावर दया करणारे प्रेमरूप परमपुरुष - परब्रह्म - आहात. मन, वाचा तुमच्या सत्तेने कार्यरत असतात. पण परेहून परते गेल्याशिवाय ती तुमची सर्वसत्ता हाताला येऊ शकत नाही. मनवाचातीत असे तुमचे स्वरूप असल्याने त्याचे वर्णन किंवा त्यांच्या गुरुसुखाचे वर्णन वाचेला करता येत नाही. ते गुरुनाम जाणण्यासाठी चारीवाचे पैल जावे लागते. चारीवाचे पैल हरीवाचेने हे गुरुनाम अनुभवता येते. हे सद्गुरूंचे स्वरूप जाणण्यासाठी स्मरणरूप देवाचा ज्ञानप्रकाशच हवा. स्मरणाच्या प्रकाशात अज्ञानाचे ज्ञान होऊन वस्तूदर्शन (गुरुदर्शन) होणारे आहे. ***(‘स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञान अंधःकारा।।’ - श्रीदासराममहाराज, ‘स्मरणाचा देव जाणे कोणगाव।।’ - श्रीमामामहाराज, ‘तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देऊनी गेले।***

*ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।', 'तो केवळ परब्रह्म। जया परमपुरुष ऐसे नाम। ते माझे निजधाम। होऊन ठाके।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मनवाचातीत तुझे हे स्वरूप। म्हणोनी अमाप भक्ती केली।।' - संतवचन, 'ते सुख काय सांगू। वाचे बोलता नये।।'- श्रीनिवृत्तीनाथ, 'बोलू ऐसे बोल। जेणे बोले विठ्ठल डोले।। प्रेम सर्वांगाचे ठाई। वाचे विठ्ठल रखुमाई।। परेहून परते घर। तेथे राहू निरंतर।। सर्व सत्ता आली हाता। नामयाचा खेचर दाता।।'- श्रीनामदेवमहाराज)*

***तू कृपासिंधू जरी वरद होसी। तरी अज्ञान जीवाचे फेडीसी।***
***मग लोपले प्रकटविसी। शिवत्व सिध्द।।२०।।***

तात्पर्यार्थ - हे गुरु, तुम्ही दयेचे सागर आहात. तुम्ही कृपा केली तरच जीवाचा मीपणा हा अज्ञानाचा अंध:कार दूर होऊन ज्ञानाचा उजेड प्रगट होणार आहे. लोपलेले सत्यस्वरूप प्रगट होणार आहे. जीवत्व विरून जाऊन शिवत्व सिध्द होणार आहे. ***('दयासागरे हो मला थोर केले। बहू सेवकामाजी ते मेळविले। कृपेने दिले सौख्य ते अंतरीचे। परी भोगणे आहे या देहाचे।।' - श्रीचिमडमहाराज, 'माझा अहंभाव असे शरीरी। तथापी तो सद्‌गुरू अंगिकारी। नाही मनी अल्पविकार ज्याला। विसरू कसा मी गुरुपादुकाला।।'- श्रीनारायणमहाराज जालवणकर, 'आकारु जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जे।।', 'तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरिटी। येर भिन्नपण ते उठी। अज्ञानास्तव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणिजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।'- श्रीसमर्थ, 'सत्यस्वरूप लोपले होते। ते म्या पाहिले गुरूचेनी हाते।।'- संतवचन)***

*म्हणोनी मी विनवी शरणागत। तू ज्ञानसूर्य हृदयी उदीत।*
*तरी अविद्यातम क्षणात। फिटेल स्वामी।।२१।।*

तात्पर्यार्थ - हे गुरु, या देहाचे, विश्वाचे स्वामी, मी शरणागत आपणास विनवीत आहे की तुम्ही मला माझ्या हृदयी उदय पावलेल्या, प्रकाशावेगळ्या नवलप्रकाश देणाऱ्या, तुमच्या ज्ञानसूर्याच्या नवल प्रकाशाचा साक्षात्कार घडवा, म्हणजे अविद्येचा अंध:कार, अज्ञानाचा अंध:कार क्षणात नाहीसा होईल व सर्वत्र ज्ञानाचा उजेड पसरेल. ***('मागेपुढे दाटे ज्ञानाचा उजेड। अंगणात झाड कैवल्याचे।।' - महाकवी ग.दि.माडगूळकर)***

***यावरी श्रीगुरु झाले प्रसन्न। करविती परमार्थाचे कथन।***
***बोलेन सकळ शास्त्रांचे मथन। निर्वाण तेची।।२२।।***

तात्पर्यार्थ - श्रीमुकुंदराज यांची ही एकनिष्ठा पाहून त्यांचे निवृत्ती निर्गुण सद्गुरू प्रसन्न झाले. त्यांचे कृपेने वृत्तीरहित ज्ञान श्रीमुकुंदराज यांचे अंतर्यामी प्रगट झाले. तेच परमार्थज्ञान त्यांचे मुखाने वदविले गेले आहे. हे ज्ञान म्हणजे साही शास्त्रांचे मंथन करून निघालेले परमामृत आहे. या परमामृतसेवनाने मोक्षाची प्राप्ती होणारी आहे. ***('ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती।।', 'तेणे कारणे मी बोलेन। बोली अरूपाचे रूप दावीन। अतिंद्रीय परी भोगवीन। इंद्रियाकरवी।।', 'मंथुनी नवनीता तैसा घे अनंता। वाया व्यर्थ कथा सांडी मार्गू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वृत्तीरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।' - श्रीसमर्थ)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते मंगलाचरणं नाम प्रथमं प्रकरणं संपूर्णम्।।१।।**

प्रकरण २ रे

# अन्यमत - खंडण

***जे जाणोनी सर्व किजे। जे सर्वदा अभ्यासिजे।***
***जेथे परतोनी चित्ते राहिजे। बुडी देउनी।।१।।***
***ते अभ्यंतरीचे ज्ञान। प्रगट बोलेन साधन।***
***जेथे रतले योगीजन। निरंतर।।२।।***

तात्पर्यार्थ - अंतरीचे अंतिम सत्य जाणण्यासाठी जे साधन आहे, ज्या साधनाचे ठिकाणी योगीजन रममाण - निमग्न - होऊन राहतात, ते साधन आज उघडपणे सांगतो.

या साधनाचे ठिकाणी मन एकाग्र होऊन लय पावल्यावर जे उरते त्याच्या जाणीवेत सारी कर्मे व्हावीत. मन मुरल्यावर जे उरते त्याचा सर्वकाळ अभ्यास व्हावा. ***('मन मुरे मग जे उरे। ते तू कारे सेविसीना।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जैसे सागरीचे अमृत। का मंथुनी काढिजे नवनीत।***
***तैसे सार सर्वात। तेची सांगेन।।३।।***

तात्पर्यार्थ - जसे समुद्र मंथनाने समुद्रातील सार अमृत वेगळे काढले जाते किंवा मंथनाने जसे दुधातील सार - नवनीत - लोणी - वेगळे काढले जाते तसे वायु मंथनाने श्वसनातील असार त्रिगुण - संसार - बाजूला करून देहातीत सार अमृत चक्रपाणी अनंत - निवृत्ती निर्गुण - कसा अनुभवता येतो हेच आता सांगणार. ***('मंथोनी नवनीता तैसा घे अनंता।', 'त्रिगुण असार निर्गुण हे सार।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'असारा संसारा त्यजुनी बरवे साधन करी।।'- श्रीसमर्थ, 'संसार समस्त त्रिगुण। त्यामाजी मी अवघा निर्गुण।।' - श्रीनाथमहाराज)***

*नलगे यापरते काही करणे। नानापरीची अभ्यासने।*
*संकल्पविकल्पात्मक साधने। सर्व त्यजिजे।।४।।*

तात्पर्यार्थ - हे सार अनुभवण्यासाठी देहाने किंवा मनाने जे जे आम्ही करतो ते सारे करणे त्यागले पाहिजे. 'नलगे काही करणे' म्हणजे श्रीसमर्थांचे 'काहीच न करोनी प्राणी' होय. मनातील संकल्पविकल्प सर्व त्यागले तरच त्याची खूण प्राप्त होते. तरच साराचे सार नाम अनुभवता येते. ***('संकल्पविकल्प नुपजो यांचे चित्ती। ऐसे कृपामूर्ती करा वेगी।। ज्यासी तुझी खूण लाधली असेल। तो पुन्हा न येईल गर्भवासा।।' - श्रीचिमडमहाराज, 'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।'- श्रीसमर्थ)***

*संकल्प विकल्पात्मक मते। नाना दर्शने कष्ट ते।*
*जव महावाक्याचे विवरण चित्ते। अनुभविले नाही।।५।।*

तात्पर्यार्थ - जोवर संकल्पविकल्प करणारे मन आहे तोवर नाना दृश्यांचे दर्शन भासमान होऊन दिननीशी षडविकारात्मक आयास - कष्टच - पदरात येणार. जेव्हा एकाग्र मनाला महावाक्याचे अर्थाचे विवरण अनुभवाला येते तेव्हाच हे कष्ट नाहीसे होतात.

*जो निरूपाधिस्वरूप। अनुभविले नाही आपेआप।*
*तोवरी कष्टासी माप। कवण करी।।६।।*

तात्पर्यार्थ - जोवर निरूपाधिक स्वरूप सहज अनुभवाला येत नाही म्हणजे आपण स्वरूपाकार होत नाही तोवर भवदु:खाची आधीव्याधी तुटत नाही, तोवर जे कष्ट होतात त्याचे मोजमाप कोण करू शकेल? ***('वस्तु जे का निरोपाधी। तेची सहजसमाधी। जेणे तुटे आधीव्याधी। भवदु:खाची।।'- श्रीसमर्थ)***

***व्रते तपे नियमांचिया सांकडी। संदेही गुंतली बापुडी।***
***ती केवी पावतील पैलथडी। संसार सागराचिये।।७।।***

तात्पर्यार्थ - देहाच्या अनुषंगाने केलेली व्रते, तपे, नेम याने संशयाची निवृत्ती होत नाही. अर्थात भाव धरला जात नाही, आत्मज्ञान होत नाही, संसाराच्या गोष्टी सुटत नाहीत मग ते संसारसागर कसा बरे तरून जातील? ***('न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संदेह अवघा फिटला। जनी म्हणे उदय झाला।।' - संत जनाबाई)***

***पूजा स्नाने तीर्थे दाने। मंत्र यंत्र याग हवने।***
***किजे तितुके फळ भोगणे। स्वर्गादीक सर्वथा।।८।।***

तात्पर्यार्थ - पूजा, स्नाने, तीर्थे, दाने, मंत्रे, यंत्रे, योगे, हवने इत्यादी कर्मफळाच्या अपेक्षा धरून कर्तेपणाने केलेल्या कर्माने स्वर्गादीक सुखे मिळतील पण कर्मबंध प्राप्त झाल्याने मोक्षाची प्राप्ती होणार नाही. ***('स्वर्ग व्हावा तरी यज्ञयाग करा। सत्कर्मे आचरा नित्यनेमे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'तैसा कर्तृत्वाचा मदू। आणि कर्मफळाचा आस्वादू। या दोहीचे नाव बंधू। कर्माचा की।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जप तप अनुष्ठाने। आणि नानापरीची साधने।***
***मोक्ष न पाविजे आत्मज्ञाने। वाचोनिया सर्वथा।।९।।***

तात्पर्यार्थ - जप, तप, अनुष्ठानाने संसाराच्या गोष्टी सुटून आत्मज्ञाने मोक्ष प्राप्त झाला तर जप, तप, अनुष्ठान, तीर्थे करण्याला अर्थ, आत्मा कळला नाही तर जप, तप, साधन करून काय उपयोग? ***('आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जोवरी जीवेश्वर उपाधी। निरसुनी नेणिजे ऐक्यसिद्धी।***
***भेद सांडुनी शबल विरोधी। शुद्ध स्वरूप न प्रकाशे।।१०।।***

तात्पर्यार्थ - निजत्वाचे विस्मरणाने 'देह म्हणजे मी' हा काल्पनिक अहंकार ही उपाधी जोवर आहे तोवर जीव व ईश्वर वेगवेगळे असा भेद राहणार. जेव्हा हा अहंकार ही अशुद्ध उपाधी नाहीशी होते तेव्हा तो भेदाभेद नाहीसा होऊन निर्गुणस्वरूपाकार होतो. ***('विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी। निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत।।' - श्रीदासराममहाराज***

***त्वंपद तत्पदीचे लक्ष्य। शबल सांडोनी परोक्ष।***
***नेणिजे शुद्ध अपरोक्ष। तववरी मोक्ष कैचा।।११।।***

तात्पर्यार्थ - (त्वंपद) जीव व (तत्पद) शिव हे कल्पनेमुळे हरीरूपाचे ठिकाणी उठलेले तरंग आहेत. जोवर कल्पनेच्या निरासाने अनुक्रमे अविद्या व माया हे जीवातील, शिवातील, शबलत्व - अशुद्धत्व - नाहीसे होऊन त्यांचे असीपदी ऐक्य होत नाही, जोवर आत्ता जे परोक्ष आहे, लपलेले आहे ते शुद्ध सत्य स्वरूप अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष प्रगट होत नाही व प्रत्यक्ष-अपरोक्ष - असणारा विश्वाचा अशुद्ध भास मावळत नाही, शबलत्व सांडले जात नाही तोवर मोक्ष प्राप्त होत नाही. जीवाने शिवरूप होऊन स्वरूपाकार मोक्ष प्राप्त करणे हेच जीवाचे, शिवाचे लक्ष्य - ध्येय - आहे. ***('माया अविद्या नाशी। ऐक्य होय जीवेश्वरासी। ऐसे बुझिनिया मानसी। सुखिया होइजे।।', 'माया अविद्येसी पाहता। विरोध भासे उभयता। म्हणोनी शबलत्यागे शुद्ध घेता। अखंड एकरस ब्रह्म।।'- संत मुकुंदराज, 'जीव शिव दोन्ही हरीरूपी तरंग। सिंधु तो अथांग दासरामी।।'- श्रीदासराममहाराज)***

***जोवरी तो येक मी येक। हा न तुटेची कलंक।***
***जव न प्रकाशे सम्यक। तव परमप्राप्ती न घडे।।१२।।***

तात्पर्यार्थ - जोवर जीव वेगळा व शिव वेगळा ही विभक्तता नाहीशी होऊन जीवाशिवाचे ऐक्य साधत नाही, जोवर जीवाचा अहंकार हा अज्ञानाचा काळीमा नाहीसा होऊन त्याला सर्वत्र सदा सम असणाऱ्या एकाचे, प्रकाशाने सम्यक ज्ञान होत नाही, तोवर त्याला परमामृताची परमप्राप्ती होत नाही. ***('म्हणौनी सर्वत्र सदा सम। ते आपणची अद्वय ब्रह्म। हे संपूर्ण जाणे वर्म। समदृष्टीचे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जववरी त्रिपद शोध न घडे। अर्धमात्रा परते न सापडे।***
***क्षराक्षर निवाडा न घडे। उत्तमपुरुषी समरस।।१३।।***

तात्पर्यार्थ - आपले आयुष्याचे साधन - श्वसन - हे त्रिपद आहे. इडा, पिंगला, सुषुम्ना हे ते तीन पद असून या तीन पदांच्या संशोधनाने, अभ्यासाने, जो तीन अवस्थांची एक अवस्था साधतो, जो अवस्थात्रयी सावधान होऊन अर्धमात्रा या तुर्येच्या पलीकडे उन्मनी अवस्था प्राप्त करतो, जो अभ्यासाने श्वसनातील त्रिगुण आणि पंचभुते हा असार क्षर भाग दूर करून सार अक्षर - निर्गुण - उत्तमपुरुषी समरस होतो तो मोक्षाची प्राप्ती करतो. ***('त्रिपद जाणता मिळणी साधिता। सुखासुख हाता येत असे।। त्रिपदाचे ऐक्य त्रिपुटीचा लय। गुरुकृपा होय तरीच कळे।।' - श्रीदासराममहाराज, 'संसार समस्त त्रिगुण। त्यामाजी मी अवघा निर्गुण। हे तुज कळावया निजखूण। गुणनिरूपण म्या केले।।' - श्रीनाथमहाराज, 'त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।' - श्रीसमर्थ)***

***सच्चिदानंद विवरण। जव नेणिजे कार्यकारण।***
***निवळेना शुद्ध आत्मज्ञान। तव मोक्ष कैचा।।१४।।***

तात्पर्यार्थ - जोवर साधनाभ्यासाने मनाला तो बोध - गुरुलिंगसाधुबोध - प्राप्त होऊन सच्चिदानंद ही पदवी प्राप्त होत नाही, जोवर कार्य कोणते, त्याचे कारण कोणते व त्या कारणाचे कारण महाकारण कोणते हे कळत नाही, जोवर अज्ञाननिवृत्ती होत नाही तोवर शुद्ध आत्मज्ञाने मोक्ष प्राप्त होत नाही. ***('जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवची या साधना। भजावे लागे।।', 'ते तू गुरुलिंगजी माझे। जे येकलेपणीचे विरजे। जयालागी वोलांडिजे। अद्वैतबोधू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'आत्मयासी देहद्वये बंधन। तयासी आज्ञान हेची कारण। आज्ञान निवृत्तीवीण। मोक्षू कैचा।।', 'ऐसे नेणीव तेची कारण। कार्य स्थूल सूक्ष्म जाण। तिये कारण सुषुप्तीचे लक्षण। ऐक आता।।', 'कार्यकारणाचे कारण। यालागी बोलिजे महाकारण। कार्यकारण झालिया शून्य। महाकारण कवण म्हणे।।' - संत श्रीमुकुंदराज)***

***सद्गुरूमुखे वेदांत श्रवण। न घडे तयाचे मनन।***
***जव न पविजे निदिध्यासन। तववरी मोक्ष कैचा।।१५।।***

तात्पर्यार्थ - जोपर्यंत सद्गुरुमुखाने उपनिषदांचे भाष्य ऐकले नाही व त्यायोगे मन-न होऊन म्हणजे मनाचे मनत्व नाहीसे होऊन निजत्वाचे आकलन झाले नाही तोपर्यंत मोक्ष कुठून प्राप्त होणार? ***('सोडू नये कीर्तन पुराण श्रवण। मनन निदिध्यासन साक्षात्कार।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***सांडुनी वेदांत सिद्धांत। जे का बोलती पाखांड मत।***
***त्यांची नायकावी मात। महावाक्यार्थ अनुभविजे।।१६।।***
तात्पर्यार्थ - उपनिषदांनी सांगितलेले सिद्धांत सोडून जे लोक इतर मतांचा पुरस्कार करतात, त्यांचे म्हणणे आचरणात आणू नये तर उपनिषदातील महावाक्यांचे अर्थ आचरणात आणावेत, अनुभवावेत.

***वेद बोलिला सृष्टीक्रम। तो सांडुनी सकळ धर्म।***
***वेदांतांचे निजवर्म। लाहिजे गुरुमुखे।।१७।।***
तात्पर्यार्थ - वेदांमध्ये जो सृष्टीक्रमाविषयी प्रकृतीधर्म सांगितला आहे तो सारा सोडून मुमुक्षूंनी वेदांतातील निजधर्म सद्‌गुरूंच्याकडून समजून घ्यावा. ***(‘सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म। हेची जाणिजे मुख्य वर्म। साधुलक्षणाचे।।’ - श्रीसमर्थ)***

***वेदांताचे अबोलणे। सिद्धांतीचे जाणोनी नेणणे।***
***जेथे मिळणी होय ते पावणे। कैवल्यपद।।१८।।***
तात्पर्यार्थ - वेदांतातील अनुभव अनुभवून ‘जाणोनी नेणणे’ किंवा ‘वृत्तीरहित ज्ञान होणे’ ही विज्ञानावस्था प्राप्त होणे म्हणजे कैवल्यपद प्राप्त होणे. ***(‘ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे। जाणोनी नेणणे विज्ञान ते।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘वृत्तीरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।’- श्रीसमर्थ, ‘गोविंद म्हणे अबोलणे। हीच अनुभवाची खुणे।।’ - श्रीमामामहाराज केळकर)***

***जीवेश्वरांची मिळणी। होय परमपद निर्वाणी।***
***तेथे द्वैतबुद्धीची कडसणी। तुटोनी जाय।।१९।।***
तात्पर्यार्थ - जेव्हा जीव व शिव यांचे ऐक्य होते तेव्हा परमपद मोक्षाची

प्राप्ती होते. त्याचे द्वैतबुद्धीने - देहबुद्धीने - असणारे देहाशी तादात्म्य नाहीसे होते. ***('म्हणोनी देहबुद्धी हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुद्धीने विघडे। ऐक्यता ब्रह्मीची।।' - श्रीसमर्थ)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते अन्यमत खंडणं नाम द्वितीयं प्रकरणं संपूर्णम्।।२।।**

प्रकरण ३ रे

# महावाक्यविवरण

***करूनी आदिशक्तीचा अंगिकारु। जो करी उत्पत्ती स्थिती संहारु।***
***सर्वसाक्षी सर्वेश्वरु। तो शबल बोलिजे।।१।।***

तात्पर्यार्थ - वायुरूप आदीशक्तीच्या सहाय्याने मूळमायेपासून शेवटपर्यंत उत्पत्ती स्थिती लय जो करतो त्या जाणत्या सर्वसाक्षी सर्वेश्वराला शबल ब्रह्म म्हणतात. ***('मूळमायेपासून सेवटवरी। वायोची सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।' - श्रीसमर्थ)***

***स्थूळ दृष्टीचे जाणणे। तितुकेही निरसणे।***
***उरे अदृश्य जो द्रष्टेपणे। तोची शुद्ध परमात्मा।।२।।***

तात्पर्यार्थ - जे स्थूल दृष्टीला जाणवते त्या साऱ्या दृश्याचा निरास केल्यावर जो अदृश्य द्रष्टा (पाहणारा) उरेल तोच शुद्ध परमात्मा - परब्रह्म समजावा.***('दृष्टीस दिसे ते निरसे। येतद्विषई श्रुती असे। म्हणोन जे दृष्टीस दिसे। ते स्वरूप नव्हे।।', 'दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।' - श्रीसमर्थ)***

***सर्वज्ञ आणि सर्वेश्वरू। ऐसा सकलशास्त्रांचा निर्धारु।***
***तोची जाणिजे परात्परु। ज्ञप्तिमात्र।।३।।***

तात्पर्यार्थ - ज्याला सर्वशास्त्रे सर्वज्ञ सर्वेश्वर परमात्मा असे म्हणतात तेच परात्पर सगुण ब्रह्म होय. ज्ञान - जाणीव - हेच त्याचे स्वरूप आहे.

***अनंतशक्तीचा द्रष्टा। स्थानमानविरहित प्रतिष्ठा।***

***जया अपरमीत घनदाटा। पार नेणिजे।।४।।***

तात्पर्यार्थ - जो अनंत अफाट शक्तीला अखंड जाणणारा, पाहणारा आहे, ज्याचे राहण्याचे ठिकाण किंवा त्याचे प्रमाण सांगता येत नाही म्हणजे जो अंतर्यामी गुप्तपणे वास करणारा आहे, जो जिकडे तिकडे घनदाट अमर्याद भरलेला आहे, ज्याचा अंत:पार कळत नाही अशा अनंताला परमात्मा म्हणतात.

***तया बोलिजे शुद्ध। निरसिजे शबलत्व अशुद्ध।***
***ज्ञानघनानंद सिद्ध। परमेश्वर।।५।।***

तात्पर्यार्थ - आकाशाचा शब्दगुण गेला, वेगळेपणाने पाहता येणे ही आकाशाची उपाधी गेली की आकाश हेच निराभास ब्रह्म. अशुद्ध उपाधी गेली की उरतो तो आनंदघन, ज्ञानघन परमेश्वर - ब्रह्म - स्वरूप - चिदाकाश. ***('वेगळेपणे पाहावे। तयास आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।', 'उपाधीवीण जे आकाश। ते ब्रह्म निराभास। ते निराभासी मूळमायेस। जन्म जाला।।', 'आकाश अवकाश तो भकास। परब्रह्म ते निराभास। उपाधी नस्ता जे आकाश। तेची ब्रह्म।।' - श्रीसमर्थ, 'सांगे पितळेची गंधिकाळीक। जै फिटली होय नि:शेख। तै सुवर्ण काई आणीक। जोडू जाइजे।।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ब्रह्मांड हिरण्यगर्भ माया। जो वेगळा देहत्रया।***
***मूळ प्रकृती महामाया। या विलक्षण जो।।६।।***

तात्पर्यार्थ - ब्रह्मांडातील विराट, हिरण्यगर्भ, माया व महामाया तर पिंडातील स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारणदेह हे आठ देह जाणून त्यांचा निरास झाल्यावर जे उरते ते विमळ निरंजन परब्रह्म. ***('अष्टदेह थानमान।***

*जाणोन जालिया निरसन। पुढे उरे निरंजन। विमळ ब्रह्म।।',* *'पंचभूतीक हे माया। माईक जाय विलया। पिंड ब्रह्मांड अष्टकाया। नासिवंत।।' - श्रीसमर्थ)*

***उत्पत्ती स्थिती संहार। सर्वसाक्षीत्वाचा व्यवहार।***
***या अवस्थातीत अपार। आपेआप जो।।७।।***

तात्पर्यार्थ - अवस्थेप्रमाणे मनाला भासमान होणाऱ्या साकार जगाला उत्त्पत्ती स्थिती लय आहे. तसेच ते तुर्यावस्थेत सर्वसाक्षी मनाला अनुभवाला येणाऱ्या साकार दृश्य सगूण ब्रह्माला पण आहे. पण जी वस्तू साक्षात आहे, जिचा पार लागत नाही त्या निरंजन स्थानाला मात्र उत्पत्ती, स्थिती, लय नाही. त्या साक्षात वस्तूचा साक्षात्कार सदोदीत आहे. ***('गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'खुंटलासे शब्द राहिला व्यवहार। झाला साक्षात्कार सदोदीत।।' - संतवचन, 'उत्पत्ती स्थिती संहार जाण। त्याहून वेगळा निरंजन। येथे ज्ञानाचे विज्ञान। होत आहे।।' - श्रीसमर्थ)***

***ब्रह्मा विष्णू रुद्र। आणि चौथा हा सर्वेश्वर।***
***यावेगळा अपरंपार। शुद्ध ब्रह्म जो।।८।।***

तात्पर्यार्थ - ब्रह्मा, विष्णू, रुद्र आणि चौथा सर्वेश्वर हे सारे वायुरूप आहेत, मूळमायेच्या उपाधीत सापडलेले आहेत. त्यांना निर्माण करणारा परमेश्वर हा त्यांच्यापेक्षा वेगळा थोर, मोठा आहे. असीम उपाधीरहित असे हे शुद्ध ब्रह्म आहे. मूळमाया हा चौथा देह विदेह झाल्यावर या देहातीत वस्तूची - परब्रह्माची - प्राप्ती साधूंना होते. ***('ब्रह्मा विष्णु आणि हर। त्यासी निर्मिता तोची थोर। तो वोळखावा परमेश्वर।***

*नाना यत्ने करोनी।।', 'ब्रह्मा विष्णू महेश्वर। चौथा आपण जगदेश्वर। वायोस्वरूप विचार। विवेकी जाणती।।', 'अविद्यागुणे बोलिजे जीव। मायागुणे बोलिजे शीव। मूळमायागुणे देव। बोलिजेतो।।'- श्रीसमर्थ)*

***याचिपरी पाहता। जीवा अविद्या विरहिता।***
***काम्य कर्मातीता। जाणिजे ऐसा।।९।।***

तात्पर्यार्थ - कल्पनेची उपाधी नाहीशी होऊन निर्हेतूक कर्म आचरणाऱ्या, जीवपणाचा वियोग झालेल्या योग्याला पाहत्या स्वरूपाला जाणता येते. स्वरूपाचा योग घडतो. ***('नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।' - संतवचन, 'आइके सकळ संमते जगी। अर्जुना गा तोची योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेची फळी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'कल्पना उपाधी तेणे झाला जीव। मायोपाधी शीव बोलिजेते।।' - संतवचन)***

***स्थूळ सूक्ष्म कारण। चौथा देह महाकारण।***
***जागृती स्वप्न सुषुप्ती जाण। तुरीया चौथी।।१०।।***

***विश्व तैजस प्राज्ञ। प्रत्यगात्मा सर्वज्ञ।***
***हे अभिमानी संज्ञ। शबल त्वं पदार्थी।।११।।***

तात्पर्यार्थ - स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे चार देह, त्या देहांच्या अनुक्रमे, जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या या चार अवस्था व अनुक्रमे विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा हे चार अभिमानी या साऱ्या उपाधी म्हणजे शबलत्व, महावाक्यातील त्वं या पदाने सांगितलेल्या जीवाला असतात. ***('जागृती, स्वप्न, सुषुप्ती तुरीया। कारण ऐसिया जीवस्थिती।।'- श्रीदासराममहाराज)***

***या इतुकियांचा द्रष्टा। तो ज्ञानघन तया प्रगटा।***
***शुद्ध बोलिजे प्रतिष्ठा। जीवत्व निरासे।।१२।।***

तात्पर्यार्थ - जीवत्व निरासाने आकाराचे पाहणे हे द्वैताचे देखणे हे अज्ञान नाहीसे होऊन म्हणजे अशुद्धत्व नाहीसे होऊन शुद्ध ज्ञानघन ब्रह्म प्रगट होते. चारी देहांचा द्रष्टाच दृश्य होतो व द्रष्टेपण नाहीसे होते. ***('आकारु जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जे।।', 'तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरीटी। येर भिन्नपण ते उठी। अज्ञानास्तव।।', 'दृश्य जाउनिया द्रष्टे। द्रष्ट्यासिची जै भेटे। तै एकलेपणेन घटे। द्रष्टेपणही।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।।' - श्रीदासराममहाराज)***

***शबल तो वाच्य पक्ष। शुद्ध बोलिजे लक्ष्य।***
***लक्ष्यी ऐक्य जाणितल्या मोक्ष। सिद्धीची लाभे।।१३।।***

तात्पर्यार्थ - जे शब्दांनी जाणता येते ते दृश्य शबल (अशुद्ध) ब्रह्म. शुद्ध ब्रह्म हे जाणता येत नाही तर ब्रह्मरूप होता येते. म्हणून शुद्ध ब्रह्म होणे हे लक्ष्य (ध्येय) ठेवणे महत्त्वाचे. ध्येयाने प्रेरीत होऊन जीवाने अहंकार टाकून आपणच परब्रह्म आहोत हे ऐक्य जाणले तर मोक्षाची प्राप्ती, स्वरूप सिद्धीची प्राप्ती.

***दोही नयनी एक दृष्टी। दोही श्रवणी एक नाद उठी।***
***दोही अधरपुटी। एकची शब्द।।१४।।***

तात्पर्यार्थ - डोळे जरी दोन असले तरी पाहणे एकच आहे. दोन कान असले तरी ऐकणे एकच आहे तर ओठ दोन असले तरी बोलणे एकच.

***तैसे दोही पदीचे एक विवरण। करिता जीवेश्वराचे निरसन।***
***शुद्ध लाधे तया कवण। द्वैत कल्पी।।१५।।***

तात्पर्यार्थ - कल्पना केली तर जीव व ईश्वर ही दोन पदे वेगळी भासतात, द्वैत जाणवते. तेच कल्पनेचा निरास झाला की जीव व ईश्वरातील अशुद्ध गोष्टींचा निरास होऊन शुद्ध स्वरूपात जीव व ईश्वर एक ब्रह्मच आहेत हे लक्षात येते. शुद्ध सत्य ब्रह्माची ओळख झाल्यावर कोण बरे कल्पना करेल? ***('वस्तु ते ओळखा सांडा रे कल्पना। नका आडराना जाऊ झणी।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***जैसे महदाकाश अखंड पूर्ण। घटमठी दिसे भिन्न।***
***घटमठाकाश ऐसे जाण। बोलती तया।।१६।।***
***ते घट मठ दोन्ही भंगता। ठायीचेची ऐक्य तत्वता।***
***तैसे जीवेश्वर उपाधी निरसता। स्वस्वरूप एक।।१७।।***

तात्पर्यार्थ - वस्तुतः आकाश हे कोठेही झाले तरी पूर्ण एकच अखंड आहे. पण ते आकाश कोणत्या उपाधीत सापडले आहे त्यावरून त्याला वेगवेगळे नाव दिले जाते. घटात सापडलेल्या आकाशाला घटाकाश तर मठात सापडलेल्या आकाशाला मठाकाश म्हटले जाते. उपाधीमुळे ते घटाकाश, मठाकाश वेगवेगळे समजले जाते. हेच घट, मठ फुटले, उपाधी नाहीशी झाली की सारे आकाश एकच आहे असे प्रत्ययाला येते. तसेच सर्व भुतांतरी ब्रह्मांश - गगन - सारखेच आहे. पिंडात सापडलेल्या ब्रह्मांशाला - गगनाला - जीवात्मा म्हणतात तर ब्रह्मांडात सापडलेल्या ब्रह्मांशाला - गगनाला - शिवात्मा (ईश्वर) म्हणतात. अविद्या व मायेची अनुक्रमे जीव व ईश्वराची उपाधी नाहीशी झाली की जीव शीवरूप होऊन सर्वकाळी असणारे एकस्वरूप राहते. उपाधीरहीत आकाश - चिदाकाश - राहते. ***('पंचभूतांमध्ये वास। म्हणोन बोलिजे***

*आकाश। भूतांतरी जो ब्रह्मांश। तेची गगन।।' ,'घटी व्यापक जे आकाश। तया नाव घटाकाश। पिंडी व्यापक ब्रह्मांश। त्यास जीवात्मा बोलिजे।।', 'मठी व्यापक जे आकाश। तया नाव मठाकाश। तैसा ब्रह्मांडी जो ब्रह्मांश। त्यास शिवात्मा बोलिजे।।', 'मठाबाहेरील आकाश। तया नाव महदाकाश। ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश। त्यास परमात्मा बोलिजे।।', 'उपाधीवेगळे आकाश। तया नाव चिदाकाश। तैसा निर्मळात्मा परेश। तो उपाधीवेगळा।।' - श्रीसमर्थ)*

***माया अविद्या नाशी। ऐक्य होय जीवेश्वरासी।***
***ऐसे बुझोनिया मानसी। सुखिया होइजे।।१८।।***

तात्पर्यार्थ - मनाचा संपूर्ण लय साधला, मन वृत्तीसहित मुरले, बुझले की अविद्या व माया या दोन्ही उपाधींचा नाश होतो. जीव व शीव (ईश्वर) एकच आहेत हे ज्ञान होते. जीव व ईश्वर यांचे ऐक्य साधते. त्याला अद्वैताचे निश्चळ सुख प्राप्त होते. तो सुखरूप होतो. ***('आपुलिया जीवे शीवासी पहावे। आत्मसुख घ्यावे वेळोवेळा। घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे। भुती लीन व्हावे तुका म्हणे।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***माया अविद्येसी पाहता। विरोध भासे उभयता।***
***म्हणोनी शबल त्यागे शुद्ध घेता। अखंड एकरस ब्रह्म।।१९।।***

तात्पर्यार्थ - जोवर माया व अविद्येची उपाधी अनुक्रमे ईश्वराला व जीवाला आहे तोवर ईश्वर व जीव वेगळे भासतात. माया व अविद्येची उपाधी नाहीशी झाली की अशुद्ध शबल भाग नाहीसा होऊन एक शुद्ध अखंड ब्रह्मच राहते. एक स्वरूपच राहते.

***ऐसेनी महावाक्यविवरणे। त्वंपद तत्पद शोधणे।***
***असिपदी पावणे। ऐक्यसिद्धी।।२०।।***

तात्पर्यार्थ - त्वंपद व तत्पद ही पदे उपाधी दूर करून शुद्ध करणे व जे शुद्ध तत्पद आहे तेच शुद्ध त्वंपद आहे हे ऐक्य असिपदी सिद्ध करणे - अनुभवणे म्हणजे महावाक्याचे विवरण समजणे होय. ***('जो शुद्धु तत्पदार्थ। तोची शुद्धु त्वंपदार्थु। उभयांचा ऐक्यी परमार्थु। उरे केवळ ब्रह्म।।'- श्रीमुकुंदराज)***

***म्हणुनी या दृष्टीवीण। सकळ भेदमते जाण।***
***ते बोलिजे खंडज्ञान। मायीक व्यवहार।।२१।।***

तात्पर्यार्थ - सर्वत्र अभेद अद्वैत अनुभवणे या सत्यज्ञानावाचून बाकी सारी ज्ञाने द्वैतावर आधारित विपरीत ज्ञाने आहेत. लटक्या मायीक व्यवहारातून प्राप्त होणारी लटकी ज्ञाने, खंडीत ज्ञाने, बदलणारी ज्ञाने आहेत. ***('तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरीटी। येर भिन्नपणे ते उठी। अज्ञानास्तव।।', 'लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते महावाक्यविवरणं नाम तृतीयं प्रकरणं संपूर्णम्।।३।।**

प्रकरण ४ थे

# स्थूलदेहनिरसन

***आता अद्वैत पाहणे। ते दुसरे करूनिया जाणणे।***
***पुनरपी मुरवणे। ठायिच्या ठायी।।१।।***

तात्पर्यार्थ - जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या या चारही अवस्थेत वेगळेपणाने पाहणे घडते, द्वैताचे पाहणे घडते. आता अद्वैत हे खरं ज्ञान अनुभवण्यासाठी प्रथमतः महाकारणदेहात सर्वसाक्षी मनाने तुर्यावस्थेत वेगळेपणाने अद्वैत ब्रह्माचा अनुभव घ्यावा लागतो. नंतर ते सर्वसाक्षी मन मुरवून अनुभव ठायीच मुरला, द्वैतातील तुर्यारूप ज्ञान मावळले असता 'अनुभव म्हणजे अनन्य' अजिबात द्वैत नाही अशा अद्वैती तो समरस होतो. ***('ज्ञान म्हणजे अद्वैत। तुर्या प्रत्यक्ष द्वैत। म्हणौनी शुद्ध ज्ञान ते सतत। वेगळेची असे।।', 'म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेची जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।', 'ऐक अनुभवाचे लक्षण। अनुभव म्हणिजे अनन्य जाण। ऐक अनन्याचे लक्षण। ऐसे असे।।', 'वेगळेपणे पाहावे। तयास आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।' - श्रीसमर्थ, 'साधुबोध झाला। तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभवा।। - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***उफराटे दृष्टीचे पाहणे। जे दृष्टीमाजी दृष्टी मुरवणे।***
***पहातया मुळासी जाणणे। स्वस्वरूपासी।।२।।***

तात्पर्यार्थ - आता अद्वैत पाहण्याकरता दृष्टी जी दृश्य पाहणारी, द्वैत पाहणारी बहिर्मुख आहे ती अंतर्मुख व्हावी लागेल. म्हणजे दृष्टी उफराटी व्हावी लागेल. याकरता आत्ता जी आपली स्थूल दृष्टी आहे, चर्मदृष्टी आहे ती ज्ञानदृष्टीत मुरवावी लागेल. आत्मसुख अनुभवण्यासाठी ज्ञानदृष्टी

उघडावी लागेल. या ज्ञानदृष्टीला चांगदृष्टी, डोळियाचा डोळा, नयन असेही म्हणतात. या ज्ञानदृष्टीला देवाचे दर्शन होते, अद्वैत ज्ञान होते. ही चांगदृष्टी, ज्ञानदृष्टी प्राप्त होण्याकरता मनाचे सुमन व्हावे लागेल. मनाचे सुमन होण्यासाठी रवीशशी दृष्टी सम करून नासिकाग्री न्यावी लागेल. प्राणापानामाजी मनातील विकल्प मुरल्यावर, मनाचे सुमन झाल्यावर, अग्रावर नीलबिंदूचा साक्षात्कार होतो, आत्मप्रकाशाची भेट होते. सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन ज्ञानाचे विज्ञान होऊन पाहते विश्वाचे मूळ स्वस्वरूप प्राप्त होते.***(‘उफराटी दृष्टी लावोनिया दिली। प्रकाशाची भेटी केली जेणे।।’- संतवचन, ‘आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी। वाऊगी चाउटी नका करू।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘दृष्टी चांग होण्या जाण। मन करावे सुमन।।’, ‘चांग दृष्टी प्राप्त होता। देव भेटेल तत्वता।।’, ‘जो का डोळियाचा डोळा। तोची दावी घननीळा।।’ - श्रीदासराममहाराज, ‘ज्ञानदेव म्हणे डोळियाचा डोळा। वोळखावा डोळा आपुलिया।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तेथुनी परते पाहता। नाही पाहणे सर्वथा।***
***दुमदुमीत अखंडिता। माजी पडिजे।।३।।***

तात्पर्यार्थ - विश्वाचे मूळ असे केवळ आनंदाचे पाहते निश्चळ चैतन्य पाहिल्यावर त्यापलीकडे त्याला मिळवायचे, पाहायचे दुसरे काही राहात नाही. सर्वत्र जिकडे तिकडे अखंडीतपणे ते एकच भरून राहिल्याचे जाणवते. ***(‘दास म्हणे तेणे मूळ मिळविले। नाही त्या उरले मिळणेचे।।’- श्रीमामामहाराज, ‘पाहता पाहता न दिसे काही। दिसते परी ते फिर फिर पाही। मागे पुढे दाटले घनदायी। सहजची ज्योती रे।।’ - संत महिपती)***

***जेथे नाही माया अविद्या। जे अपरिमित स्वसंवेद्या।***
***ते सांगे ब्रह्मविद्या। सावधान परियेसा।।४।।***

तात्पर्यार्थ - ज्याचे ज्ञान डोळ्यांना होत नाही, जे ज्ञान शब्दात वर्णन करता येत नाही, जे ज्ञान कल्पनेने जाणता येत नाही म्हणजे ज्या ज्ञानापर्यंत माया, अविद्या पोचू शकत नाही असे सर्वकाळी न बदलणारे, स्वसंवेद्य म्हणजे आपले ज्ञान आपल्याला होणारे ब्रह्मज्ञान आता सांगतो, ते लक्ष देऊन ऐक. ***('जे जे दृष्टीने देखिले। जे जे शब्दे वोळखिले। जे जे मनास भासले। तितुके रूप जयेचे।।' - श्रीसमर्थ, 'अविद्येचा पुर बाबा वेगी ओसरेना। कल्पना सुसरीची मिठी सुटेना।।' - संत मुक्ताबाई)***

***जे घनानंदसुखाची राशी। प्रवेशोनी तये स्वप्रकाशी।***
***असिजे गमनागमनासी। नासोनी सदा।।५।।***

तात्पर्यार्थ - जन्ममरण न असून म्हणजे संसरण - संसार - शून्य झाल्यावर म्हणजे गमनागमन नासल्यावर सदा असणाऱ्या स्वयंप्रकाश आत्म्याचे ठिकाणी प्रवेश झाला तर घनानंदसुखाची राशी, सुखाचा सुखनिधी, सुखसागर प्राप्त होणार आहे. ***('जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।'- श्रीदासराममहाराज, 'तेथ सोहंहंसाची बोळवण। न करताची जहाली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।'- श्रीनाथमहाराज)***

***ते साधावे कवणे रिती। जेणे होय नित्यतृप्ती।***
***ते युक्ती ऐकावी सुनिश्चिती। एकाग्र होऊनी।।६।।***

तात्पर्यार्थ - त्या आत्म्याचे ज्ञान कोणत्या साधनाने साधावे की ज्या आत्मज्ञानाने नित्य आत्म्यापासून होणारी तृप्ती - नित्यतृप्ती - जीवास

प्राप्त होईल, ती युक्ती मन एकाग्र करून ऐका म्हणजे तुमची अनुभवाने खात्री होईल. ***(‘येकाग्र करूनिया मन। बळेची धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होऊच नये।।’ - श्रीसमर्थ)***

***परी आधी सांगो साधन। आत्मस्वरूपाचे परिज्ञान।***
***ते जाणितल्यावीण। काय घ्यावे।।७।।***

तात्पर्यार्थ - म्हणून आधी आत्मस्वरूपाचे पूर्णज्ञान होणारे खरे बरवे साधन सांगतो. आत्मस्वरूपाचे पूर्णज्ञान झाले तरच बरवे साधन साधते किंवा बरवे साधन साधले तरच सुखशांतमन होऊन आत्मस्वरूपाचे पूर्ण ज्ञान होते. आत्मा जाणला नाही तर कायेचे भान जात नाही, मीपणेवीण साधन साधत नाही. येथे काय हा शब्द देह या अर्थाने आला आहे हे आपण लक्षात घ्यावे. ***(‘आणीक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोची धन्य। समाधानी।।’ - श्रीसमर्थ, ‘आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***आधी आत्मयाते जाणावे। मग तयाते साधावे।***
***येर नुसते अनुभवावे। काय धरूनी।।८।।***

तात्पर्यार्थ - आधी जाणत्या आत्म्याला जाणावे मग आत्मरूप होणे हे साध्य साधावे. जर कायेलाच धरले तर त्रिपुटीतील अनुभव येणार, अद्वैती समरस होता येणार नाही, आत्मरूप होता येणार नाही. येथे काय हा शब्द देह या अर्थाने आला आहे.

***ज्या युक्ती स्वरूप एक। जाणणे ते बुद्धी ऐक।***
***मी आहे हे तव निष्टंक। जाणसी तू।।९।।***

तात्पर्यार्थ - ज्या युक्तीने एक स्वरूप जाणता येते ती युक्ती व ज्या

बुद्धीला हे स्वरूप जाणवते ती बुद्धी कोणती ते ऐक. एक स्वरूप जाणण्यासाठी 'मी अमूक आहे' अशी जी बुद्धी सर्वांच्या हृदयदेशी ज्या वस्तूचे ठिकाणी सदासर्वदा स्फुरते आहे ती वस्तू म्हणजे ते एक स्वरूप आहे व त्या स्फुरणाऱ्या बुद्धीनेच स्वरूप जाणता येते. ***('एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी। मी अमुका आहे ऐसी। जे बुद्धी स्फुरे अहर्निशी। ते वस्तु गा मी।।', - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ऐसे तव जाणसी। परी मी कोण हे नेणसी।***
***तरी का आपआपणासी। बुझेसिना।।१०।।***

तात्पर्यार्थ - जोवर 'मी अमूक आहे' ही हृदयदेशी - अंत:करणात - जाणीव आहे तोवर वस्तू कोण हे समजत नाही, निजत्वाचे विस्मरणच होते, मूळमाया चौथा देह विदेह होत नाही, देहातीत वस्तूची जाणीव होत नाही, आपला आपल्याला विसर होतो. ***('अहंपणे जाणीव जाली। तेची मूळप्रकृती बोलिली। महाकारणकाया रचली। ब्रह्मांडीची।।', 'मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।' - श्रीसमर्थ, ''मी परब्रह्म' येणे आकारे। ज्ञानस्वरूपी स्फुर्ती स्फुरे। ते वोळखावी चातुरे। महामाया।।' - संत मुकुंदराज, 'स्वरूप निर्विकल्प पूर्ण। ते 'मी' म्हणावया म्हणते कोण। ऐसेही ठायी स्फुरे मीपण। ते मुख्यत्वे जाण मूळमाया।।'- श्रीनाथमहाराज, 'विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।।' - श्रीदासराममहाराज)***

***तू कोण कोठुनी कैचा। आला गेलासी तरी साचा।***
***परी पा लव न धरीसी विचाराचा। आपणा जाणावया।।११।।***

तात्पर्यार्थ - जोवर येण्याजाण्याची क्रिया - संसार - आहे तोवर आपणाला जाणण्यासाठी मी कोण, कुठून आलो, कसे आलो याचा पुसटसा देखील विचार केला जात नाही. ***('या या संसाराचे पायी।***

***राम आठवत नाही।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***तू देह की देहाचा जाण। देह तूज जाणे की तूज याचे ज्ञान***
***पाहता द्रष्टा तू आपण। देह तूज दृश्य।।१२।।***

तात्पयार्थ - तू म्हणजे देह का 'देह म्हणजे मी' असे मानणारा तू? देह तुला जाणतो का तू देहाला जाणतोस? या प्रश्नांचा विचार जर केलास तर तू पाहणारा द्रष्टा असून देह हा तुला दिसणारा पदार्थ - दृश्य - आहे. अर्थात तू देहापेक्षा, दृश्यापेक्षा वेगळा आहेस.

***देह सबाह्य अभ्यंतरी। तू जाणशी गा विचारी।***
***देह अलंकाराचे परी। मिरविशी तू।।१३।।***

तात्पर्यार्थ - तू विचारपूर्वक उपलब्ध साधने वापरून देह अंतर्बाह्य कसा आहे हे जाणू शकतोस. ज्ञेय हे ज्ञात्यापेक्षा वेगळे असते अर्थात आपण देहापेक्षा वेगळे आहोत. अंगावर जसा दागिना धारण करावा तसा देह आपण धारण केलेला आहे.

***लेवोनी खोळी पंचभुतांची। भुती मिरविशी तुची।***
***जाणीव असे की याची। तुजची की।।१४।।***

तात्पर्यार्थ - पंचमहाभुतांची खोळ घेऊन अनंतरूपे अनंतवेषे तूच मिरवत आहेस याची तुला जाणीव आहे का? ***('अनंतरूपे अनंतवेषे देखिले मी त्यासी। बापरखुमादेवीवरू खूण बाणली कैसी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ऐसे आपणिया जाण। निरसी हा दृश्य गुण।***
***जे देह मी म्हणतोसी आपण। ते सांडी भ्रांती।।१५।***

तात्पर्यार्थ - आपण आपल्याला जाणले की आपले आकार पाहणे - द्वैताचे देखणे थांबते व 'देह म्हणजे मी' ही भ्रांती दूर होते. खरा मी

कळला की खोटा मी नाहीसा होतो. ***(‘आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी। आपणा पाहता आकार उरेना। बोलाया राहेना पाहता कोणी।।’, ‘आपणा पाहता आकार उरेना। जेथे पहाणेपणा पहाणे आले।।’ - श्रीदासराममहाराज)***

***देहाचिया अवयवा समस्ता। तुची एक जाणता।***
***तो तुझा तू आइता। विचारूनी पाही।।१६।।***

तात्पर्यार्थ - देहाच्या सर्व इंद्रियांना तू जाणतोस. इंद्रियांच्यामार्फत जे ज्ञान होते ते जाणणारा तूच आहेस. तुझ्याशिवाय नुसत्या इंद्रियांना ज्ञान होत नाही. अर्थात तू इंद्रियांपेक्षा वेगळा आहेस, हे साध्या विचाराने पटेल.

***रोम त्वचा नाडी मांस। अस्थी हे पंच अंश।***
***कठीण हा धरणीचा भास। जाणशी तू।।१७।।***

तात्पर्यार्थ - केस, कातडी, शिरा, मांस, अस्थी हे देहातील पाच कठीण पदार्थ पंचमहाभुतापैकी पृथ्वीच्या अंशाने भासमान होतात. भासमान होतात असे म्हटले आहे कारण ते सारे कल्पनेने भासते. कल्पना सरल्यावर निर्विकल्प अवस्थेत किंवा अवस्था बदलल्यावर म्हणजे स्वप्नावस्थेत यातील काहीही जाणवत नाही.

***लाळ मूत्र शोणीत। मज्जा रेत हे आप द्रवत।***
***या पाचा अंशाते निश्चित। जाणता तू एक।।१८।।***

तात्पर्यार्थ - लाळ, मूत्र, रक्त, मेंदू आणि रेत हे पाच द्रव पदार्थ पंचमहाभुतापैकी आप तत्वाने भासमान होतात. हे तुला निश्चित माहीत आहे.

*क्षुधा, तृषा, आळस, निद्रा। मैथून हे अंश वैश्वानरा।*
*या पाचाचिया व्यवहारा। जाणशी तू ।।१९।।*
तात्पर्यार्थ - भूक लागणे, तहान लागणे, आळस, झोप येणे, मैथुनाची गरज भासणे हे गुण पंचमहाभुतांपैकी तेज तत्वाचे आहेत. यांच्यामुळे होणारा व्यवहार तू जाणतोस.

*चलन, धावन निरोधन। प्रसरण आणि आकुंचन।*
*हे चंचळ पाचही गुण। वायुचे देखणा तू ।।२०।।*
तात्पर्यार्थ - हालणे, धावणे, निरोध करणे, पसरणे व आवरणे ही पाचही लक्षणे पंचमहाभुतांपैकी वायु तत्वाची आहेत. या साऱ्या वायूच्या क्रिया तू अनुभवतोस, पाहतोस.

*काम, क्रोध, शोक जाण। लोभ भय हे पाच गुण।*
*ते आकाशाचे लक्षण। देखणा तू ।।२१।।*
तात्पर्यार्थ - काम, क्रोध, शोक, लोभ, भय हे पाच गुण पंचमहाभुतांपैकी आकाश तत्वाचे आहेत. हे सारे आकाशाचे गुण तू अनुभवतोस.

*ऐसे पंचभुतांचे अंश। जाणसी पंचवीस।*
*ते सर्वही तूज दृश्य। स्थूल देह हा ।।२२।।*
तात्पर्यार्थ - प्रत्येक भुतांचे पाच याप्रमाणे पाच भुतांचे एकूण पंचवीस गुण एकत्र येऊन हा दृश्य स्थूल देह झालेला आहे. याची जाणीव तुला आहेच.

*याचे साही विकार जाण। जायते अस्ती विवर्धन।*
*विपरीणमते वार्धक्य संहरण। यासीच असे ।।२३।।*
तात्पर्यार्थ - या स्थूल देहाला सहा विकार असतात. तो जन्माला येतो, त्याचे अस्तित्व जाणवते, तो वाढतो, त्याचे रूपांतर होते, तो म्हातारा

होतो, तो शेवटी नाश पावतो. हे सारे विकार स्थूल देहाला असतात.

***याचे वर्ण व्यक्तीरूपासी। जाणसी याचिया नामासी।***
***म्हणोन तूज आत्मयासी। हे विजाती कैची ।।२४।।***

तात्पर्यार्थ - या व्यक्त झालेल्या व्यक्तीचे रंग, रूप, नाम तू जाणतोस. याला जाणणारा आत्मा हा अव्यक्त निराकार, अरूप आहे. म्हणजे आत्मा, जीव हा देहापेक्षा वेगळा आहे. नामरूपाने व्यक्त होणारा देह हा भ्रम असून तो निर्भ्रम आत्म्यापेक्षा वेगळा आहे. ***('जे जे रूप आणि नाम। तो तो अवघाची भ्रम। नामरूपातीत वर्म। अनुभवे जाणावे।।', 'भ्रमरूप विश्व स्वभावे। तेथे काय म्हणोनी सांगावे। निर्गुण ब्रह्मावेगळे आघवे। भ्रमरूप।।' - श्रीसमर्थ)***

***तू आत्मा निराकार। जाणसी या देहाचा आकार।***
***जरी काष्ठी अग्नीचा संचार। तरी वेगळा की ।।२५।।***

तात्पर्यार्थ - देहाचा आकार जाणणारा देहापेक्षा वेगळा निराकार आत्मा देहाच्या उपाधीत गुप्तपणे असतो. जसा लाकडामध्ये गुप्तपणे अग्नीचा संचार असतो. पण अग्नी हा लाकडापेक्षा वेगळा असतो.

***तैसा तू यासी व्यापुनी। अससी या स्थुलाते भरूनी।***
***रोमांच आदी अग्र करूनी। जाणसी तू ।।२६।।***

तात्पर्यार्थ - तसा तू या संपूर्ण स्थूल देहामध्ये केसाच्या टोकापर्यंत व्यापून राहिला आहेस. केसाच्या टोकाला जरी काही झाले तरी तुला ते समजते.

***परी हे तूज नेणे। तुची अससी जाणपणे।***
***तो तू आत्मा आपण। नव्हेसी नरनारी ।।२७।।***

तात्पर्यार्थ - पण हे शरीर तुला जाणू शकत नाही. जाणता - ज्ञानी -

साक्षी - एक अंतरात्मा आहे. तू आपणच आपणाला जाणतोस. नराचे किंवा नारीचे शरीरातील शरीर जाणणारा, चालवणारा आत्मा एकच असतो. पुरुषाचा, स्त्रीचा देह वेगळावेगळा, देहात फरक पण आत्मा एकच. पुरुषत्व व स्त्रीत्व हा लिंगभेद देहापाशी आहे. ***('नव्हे नरनारी गैबी सुत्रधारी। हालवी जो जीवजंत।।' - संत सोहिरोबानाथ)***

***आत्मयाचेनी जागेपणी। बाह्य व्यापार करणे।***
***इंद्रियाद्वारा भोगणे। विषयाचे घडे ।।२८।।***

तात्पर्यार्थ - आत्मा अखंड जागा असतो म्हणून देह झोपू शकतो, देहातील सारे अन्नपचन, श्वासोच्छवास इत्यादी हालचाली किंवा बाह्यत: होणाऱ्या हालचाली होऊ शकतात. इंद्रियांद्वारे ऐकणे, पाहणे, चव घेणे असे विषयांचे सेवन होऊ शकते. तो झोपला की सारे संपलेच.

***मी अमुका नामरूपाचा। ऐसा अभिमान विश्वाचा।***
***तू जाणता या सर्वाचा। विलक्षण आत्मा ।।२९।।***

तात्पर्यार्थ - 'देह म्हणजे मी' अशी कल्पना करणारा, देहाच्या नावाला माझे नाव तर देहाच्या रूपाला माझे रूप असे मानतो. असा जो देहाभिमान धरतो त्या अभिमान्याला 'विश्व' म्हणतात. देहाला आपण जाणतो म्हणजे आपण देहापेक्षा वेगळे, देहाला कल्पनेने चिकटलेल्या अभिमान्यापेक्षा वेगळे आहोत. कल्पना वेगळी व कल्पक वेगळा. ***('अर्जुनपण न घेता। मी ऐसे जे पांडुसुता। उठतसे ते तत्वता। तयाचे रूप।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते स्थूलदेहनिरसनं नाम चतुर्थ प्रकरणं संपूर्णम् ।।४।।**

प्रकरण ५ वे

# लिंगदेह निरसन

***तूज श्रवणातुनी ऐकणे। त्वचेतुनी स्पर्श घेणे।***
***नयनातुनी देखणे। नाना रूपाते ।।१।।***

तात्पर्यार्थ - तू कानानी ऐकणे, त्वचेमार्फत स्पर्श घेणे, डोळ्यांनी अनेक रूपे पाहणे अनुभवतोस.

***जिव्हेतूनी स्वाद घेसी। घ्राणातुनी परिमळ जाणसी।***
***वाचेतुनी उच्चारिसी। अक्षरे सर्व ।।२।।***

तात्पर्यार्थ - तूच जिव्हेतून रसास्वाद चाखतोस, घ्राणातून परिमळ अनुभवतोस तर वाचेतून सर्व अक्षरे उच्चारतोस.

***करातुनी देणे घेणे। पायातुनी चालणे।***
***शिश्नातुनी रती भोगणे। गुदी मळ विसर्ग ।।३।।***

तात्पर्यार्थ - तूच हाताने देणे घेणे, पायानी चालणे, शिश्नातुनी रतीसुख घेणे, गुदातून मल त्यागणे या क्रिया करतोस.

***या इंद्रियातुनी तुची जाण। प्रकाशसी आड ठाकोन।***
***तो तू इंद्रियासी विलक्षण। साक्षीरूप ।।४।।***

तात्पर्यार्थ - ही सर्व कर्मे या दहा इंद्रियांच्या मागे दडून तूच इंद्रियांकडून करवीत असतोस. म्हणजेच तू या इंद्रियाहून वेगळा, इंद्रियांना जाणणारा, इंद्रियांमार्फत कर्म करणारा किंवा ज्ञान मिळवणारा आहेस. इंद्रियांच्या कर्मातून तूच प्रकाशात येतोस, जाणवतोस.

*श्रवण स्पर्शन दर्शन। आस्वादन अवघ्राण।*
*या ज्ञानेंद्रिये करून। सकळ पाचही विषय ।।५।।*
*शब्द स्पर्श रूप रस गंध। वचन दान गमनानंद।*
*मळविसर्ग हे पंचविध। कर्मेंद्रिया जाणता तू ।।६।।*

तात्पर्यार्थ - श्रवण करणे, स्पर्श जाणविणे, पहाणे, चव घेणे, वास घेणे या क्रिया करून शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पाच विषय भोगणाऱ्या अनुक्रमे कान, त्वचा, डोळा, जीभ, नाक या इंद्रियांना ज्ञानेंद्रिये म्हणतात. तर बोलणे, देणे घेणे, येणे जाणे, आनंद भोगणे आणि मल टाकणे ही पाच कर्मे करणाऱ्या अनुक्रमे तोंड, हात, पाय, शिश्न आणि गुद यांना कर्मेंद्रिये म्हणतात. या ज्ञानेंद्रियांतून जाणणारा किंवा कर्मेंद्रियांतून कर्मे करणारा तूच आहेस.

*प्राणापान व्यान। उदान आणि समान।*
*यांची स्थाने स्थिती संपूर्ण। जाणसी तुची एक ।।७।।*

तात्पर्यार्थ - प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान या पंचप्राणांची स्थाने व कार्ये काय आहेत ती तू एकटाच जाणतोस.

*अंतःकरण मन बुद्धी। चित्त अहंकार या पाचा भेदी।*
*स्फुरसी जाणसी तू या आदी। ठाइचाची उभा ।।८।।*

तात्पर्यार्थ - अंतःकरण म्हणजे शुद्ध जाणीव, मन, बुद्धी, चित्त, अहंकार या पाचांच्या मुळाशी ज्याला मूळ नाही असा, अहर्निशी वृत्तीचे स्फुरण असणारा वेगळा जाणीवरहित जाणता तूच आहेस.

*अंतःकरणीचा आठव सपूर। वरी उठती वृत्तीचे उद्गार।*
*तयासी जाणे तो अक्षर। सिद्धची असे ।।९।।*

तात्पर्यार्थ - अंत:करणातील स्मरणाचा - जाणीवेचा - आधार महत्त्वाचा. या स्मरणाचे आधारे वृत्तीसहित ज्ञान अज्ञानाचे बोलणे होते. ही अंत:करणातील जाणीव ज्या ठिकाणी स्फुरते तो जाणीवरहित जाणता, वृत्तीरहित ज्ञानी अक्षर परमात्मा.

***वृत्तीचे स्फुरण झाले। तया मागुनी जाणणे उठिले।***
***हे म्हणो नये पहिले। आइतेची असे ।।१०।।***

तात्पर्यार्थ - वृत्तीरहित ज्ञानाचे ठिकाणी, जाणीवरहित जाणत्याचे ठिकाणी वृत्तीचे स्फुरण झाल्यावर जे ज्ञान निर्माण होते ते वृत्तीसहित ज्ञान वेगळे व वृत्तीचे स्फुरण व्हायच्या अगोदर जे वृत्तीरहित ज्ञान आहे, जे निवृत्ती अवस्थेतील स्मरण आहे, ज्याला 'निवृत्तीदेवी ज्ञान' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, जे ज्ञान श्रीज्ञानेश्वरमहाराजांना प्रमाण आहे, ज्याला संत विज्ञान असे संबोधतात, ते साधुंचे अंतरी असणारे जागते ज्ञान वेगळे. श्रीसमर्थ सांगतात, ***'ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।'***. हे ज्ञान 'स्वयंभू' आहे. या ज्ञानरूपाने आत्मा सर्वत्र भरून राहिला आहे. या ज्ञानाचा अथांग सागर म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज होते. परमार्थात हे ज्ञान होणे महत्त्वाचे. या ज्ञानात अज्ञान - विस्मरण - संभवतच नाही. अखंड स्मरण, अखंड ज्ञान, जे शब्दाने वर्णन करता येत नाही, जे ज्ञान अज्ञानाचे पैल प्राप्त होते, त्या अखंडस्मरणाने मोक्ष प्राप्त होतो, अखंड सुख प्राप्त होते, अखंड परमार्थ होतो, तो अर्थरूप समर्थ होतो. आपल्यापाशी सामान्यत: जे ज्ञान असते ते विपरीत ज्ञान. साधनाने विपरीतज्ञान नाहीसे झाल्यावर राहते ते वृत्तीसहित अज्ञान. माझ्या ठिकाणी वृत्तीसहित अज्ञान आहे हे जाणणे म्हणजे वृत्तीसहित ज्ञान होणे. त्याचे पलीकडे वृत्तीचे स्फुरण. हे वृत्तीचे स्फुरण जेथे होते ती आत्मवस्तू - वृत्तीरहित

ज्ञान. ***('तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देऊनी गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***अंत:करणवृत्तीचे स्फुरण। ते संकल्पविकल्पात्मक मन।***
***तेची निश्चयात्मक म्हणोन। बुद्धी म्हणविजे ।।११।।***

तात्पर्यार्थ - संकल्प, विकल्प करणे हे मनाचे स्वरूप आहे. 'संकल्पविकल्पात्मकं मन:' असे मनाचे स्वरूप श्रीजगद्गुरू शंकराचार्य सांगतात. साधनेने रामकृष्णी नित्य नामाचा टाहो फोडला असता विकल्प - संशय - हा पापाचा प्रकार नाहीसा होऊन रामकृष्णी संकल्प - भाव - धरला जातो. या निश्चयी संकल्पाचे ठिकाणी बुद्धीचा निश्चय होतो. हा संकल्पी निश्चय होणे हे बुद्धीचे स्वरूप आहे. ***('नाममंत्रजप कोटी जाईल पाप। रामकृष्णी संकल्प धरूनी राहे।।', 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।', ' तुझियेनी नामे सकळ संदेह फिटला। बापरखुमादेवीवरू श्रीविठ्ठला।।', 'म्हणऊनी संशयाहुनी थोर। आणीक नाही पाप घोर। हा विनाशाची वागूर। प्राणियासी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संकल्प विकल्प। तेची मनाचे स्वरूप।। निश्चयी संकल्प। तेची बुद्धीचे स्वरूप।।' - श्रीदासराममहाराज)***

***निश्चयात्मक जो अर्थू। तेथे अनुसंधानात्मक हेतू।***
***ते चित्त हे जाण तू। तत्प्रवृत्ती तो अहंकारू ।।१२।।***

तात्पर्यार्थ - मनामध्ये जो साधनेने विकल्परहित संकल्प राहतो, त्या संकल्पाचे ठिकाणी बुद्धीचा निश्चय होतो. बुद्धीचा निश्चय होऊन जो अर्थ समजतो त्या अर्थाचे ठिकाणी अनुसंधान ठेवणारे ते चित्त. तर हे द्वैतानुसंधान ठेवण्याच्या चित्ताच्या प्रवृत्तीला अहंकार म्हणतात. जोवर

कल्पना आहे, संकल्प आहे तोवर हे द्वैतानुसंधान संपत नाही. जे सर्वत्र सदा सम आहे त्याचे अनुसंधान ठेवणे हे चित्ताचे समत्व हे योगाचे सार आहे. येथे मन आणि बुद्धीचे ऐक्य साधलेले असते. ***('अर्जुना समत्व चित्ताचे। तेची सार जाण योगाचे। जेथ मन आणि बुद्धीचे। ऐक्य आथी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।', 'वृत्तिरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।' - श्रीसमर्थ)***

***ऐसी अंतःकरणपंचकस्फुर्ती। तुची जाणसी स्वयंज्योती।***
***यालागी स्वसंवेद्य मूर्ती। आत्मा तुची ।।१३।।***

तात्पर्यार्थ - आत्म्याच्या ठिकाणी असणाऱ्या वृत्तीरूप जाणीवेनेच आत्म्याचा स्वयंप्रकाश - स्वयंज्योती - जाणली जाते. नादप्रकाशाने जाणता आत्मा जाणला जातो. जाणता जाणला की जाणीव जाते. आपली जाणले ही वृत्ती तद्रूप होते. आत्म्याला स्वतःची जाणीव स्वतःला होते. म्हणून त्याला स्वसंवेद्य म्हणतात. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' - श्रीसमर्थ)***

***जैसा कापुसापासुनी निघे दोरा। तोची तया भासे दुसरा।***
***तैसे मन बुद्धी चित्त अहंकारा। होणे स्वरूपापासुनी ।।१४।।***

तात्पर्यार्थ - कापसाला पीळ दिला की कापसाचाच दोरा होतो. पण दोरा हा कापसापेक्षा वेगळा समजला जातो. त्याप्रमाणे स्वरूपापासून स्फुरलेले मन, बुद्धी, चित्त, अहंकार स्वरूपापेक्षा वेगळे भासतात.

***तो पीळ नुकलिता दोरा। म्हणावा परी कापूस खरा।***
***उकलिता नुकलिता दुसरा। भासू नाही ।।१५।।***

तात्पर्यार्थ - कापसाला पीळ आहे तोपर्यंत कापसालाच सूत म्हणतात. पीळ असो किंवा नसो तेथे कापसाशिवाय दुसरे काय आहे?

***नातरी उदकाचा तरंग। तेथे दुसरा नाही भाग।***
***तो विरालिया चांग। उदक उदकी ।।१६।।***

तात्पर्यार्थ - पाण्यावर तरंग उठतो. तो काय पाण्यापेक्षा वेगळा असतो का? तो तरंग शांत झाला की मूळचे पाणीच राहते.

***परी जळावाचोनी काही। आणिक विजातीय नाही।***
***तैसे मन माघारे आत्मयाचे ठायी। तव तव ते नाहीच होय ।।१७।।***

तात्पर्यार्थ - उदक आणि त्यावर उठलेला तरंग असे दोन पदार्थ जरी वेगळे भासत असले तरी तेथे उदकाशिवाय काही असत नाही. लाट मुरली की मूळचे पाणीच राहते. त्याप्रमाणे आत्म्याचे ठिकाणी स्फुरलेली मनोवृत्ती माघारी येऊन जाणीवेसहित आत्म्याचे ठिकाणी तद्रूप झाली, मन वृत्तीसहित मुरले की आत्माच राहतो.

***तो तरंग का दोरा। उठवी पीळ आणि वारा।***
***तैसा हा लिंगदेहाचा उभारा। कारण माया करी ।।१८।।***

तात्पर्यार्थ - उदकावर तरंग उठतो तो वाऱ्यामुळे किंवा कापसाचे सुत बनते ते पीळल्यामुळे तसे आत्म्याचे ठिकाणी लिंगदेहाचा भास होतो तो मायेमुळे.

***उकललिया का मुरालिया। पीळ वारा जाय लया।***
***तैसी आत्मज्ञाने कारण माया। मिथ्या होय ।।१९।।***

तात्पर्यार्थ - दोरा उकलला की दोऱ्याचे कारण पीळ आपोआप नाहीसा होतो किंवा लाट - तरंग - शमली की लाटेचे कारण वारा आपोआप शांत होतो त्याप्रमाणे जाणीव विरून आत्मज्ञान झाले की सुक्ष्मदेह भासविणारी माया नाहीशी होते.

***तरंग जळ दोरा कापूस। ऐक्य होता जाय दुजा भास।***
***तैसे होय मन स्वरूपी समरस। तेथे अज्ञान हारपे ।।२०।।***

तात्पर्यार्थ - लाट आणि पाणी व कापूस आणि दोरा हे द्वैत भासमान होण्याचे कारण अनुक्रमे चंचळ वारा व पीळ नाहीसे झाल्यावर लाट आणि पाणी यांचे तसेच दोरा आणि कापूस यांचे ऐक्य होते, त्यातील दुजेपणाचा भास होत नाही. त्याप्रमाणे मन हे मनत्व सोडून स्वरूपाचे ठिकाणी समर्पण झाले, समरस झाले की द्वैतरूपी अज्ञानाचे अद्वैत ज्ञान होते.

***असो हे स्फुर्ती कल्पना। बोलिजे लिंगदेह अंत:करणा।***
***तेथे स्वप्नावस्था जाणा। वासनामय ।।२१।।***

तात्पर्यार्थ - आत्म्याचे ठिकाणी स्फुरलेल्या कल्पनेला, जाणीवेला अंत:करण म्हणतात. या अंत:करणाचाच लिंगदेह असतो. या कल्पनेमुळेच, वासनेमुळेच स्वप्न साकारते, अनुभवाला येते. ***('स्वप्नीचा देह केवळ मन। त्याही देहासी असे मनपण। तैसा हाही देहो मनची जाण। अभिमाने कठीण स्थूल केला।।' - श्रीनाथमहाराज)***

***मन प्रवर्ते इंद्रियद्वारे। ते वासना अभ्यंतरी विवरे।***
***तैं स्वप्नावस्था मांडे बरे। श्रूत दृष्ट आभास ।।२२।।***

तात्पर्यार्थ - मन इंद्रियांद्वारे दृश्यामध्ये कार्यरत असते. त्या दृश्यासंदर्भातील

मूर्त, अमूर्त मनातील वासना अंत:करणात घर करून राहतात. त्या वासनाच स्वप्नावस्थेत पाहण्याच्या, ऐकण्याच्या रूपाने भासमान होतात.

***तैजस अभिमानी दृश्य। या इतुकिया ओळखीस।***
***असे अंत:करणी चिदाभास। व्यापक तो ।।२३।।***

तात्पर्यार्थ - पंचमहाभुतांपैकी तेजतत्त्वाच्या सुक्ष्मदेहातील स्वप्नावस्थेचा अनुभव घेणाऱ्या तेजस्वी अभिमान्याला तैजस म्हणतात. अंत:करणात व्यापक चिदाभास असल्याने हे ज्ञान होते.

***जैसा आदित्यलोही पडे अग्नी। तो नव्हे काय दिनमणी।***
***तैसा बिंबला जो अंत:करणी। तो स्वयंप्रकाश ।।२४।।***

तात्पर्यार्थ - उन्हामध्ये ठेवलेल्या स्वच्छ गुळगुळीत लोखंडी पदार्थामध्ये जसे सूर्याचे प्रतिबिंब पडते, लोखंड तापते तेथे सूर्याचा भास निर्माण होतो त्याप्रमाणे स्वच्छ अंत:करणात आत्मप्रकाश - स्वयंप्रकाश - बिंबतो, ठसतो. त्याला चिदाभास म्हणतात.

***यात तुझी एक जाणीव नाही। तरी हे इत्यादी न स्फुरे काही।***
***यालागी चिदाभासे आभास पाही। भासविला ।।२५।।***

तात्पर्यार्थ - या अज्ञानाचे अवस्थेत एक ब्रह्मही जाणवत नाही व इत्यादीक मायाही जाणली जात नाही. या अज्ञानातून चिदाभासाने विपरीतज्ञान हा आभास भासतो.

***तुझी एक जाणीव खंडे। तरी काही न पुढे मांडे।***
***येथे तुवाची उरिजे अखंडे। स्वस्वरूपे ।।२६।।***

तात्पर्यार्थ - तुझ्या ठिकाणी ही असणारी अहंची जाणीव जर खंडीत

झाली तर हे पुढचे काहीच मांडले जाणार नाही. तुझे सर्वकाळ असणारे अखंड स्वस्वरूप फक्त उरेल.

***तुची स्फुरशी बोलशी ऐकशी। अंतरीचे अंतर जाणशी।***
***तुची पाहे तुजशी। विचारूनिया ।।२७।।***

तात्पर्यार्थ - तुझे ठायीच स्फुरण आहे. तूच मुखावीण बोलतोस, तूच श्रोत्रेवीण ऐकतोस, तूच नेत्रेवीण तुला पाहतोस. तू चैतन्य, उपाधीअंतरी गुप्त असणारे चैतन्य (अंतर) जाणतोस. तू स्वत:चा विचार केलास तर तुला हे कळेल.***('नेत्रावीण देखे श्रोत्रावीण ऐके। रसनेवीण चाखे ते निजवस्तू।। पायावीण चाले मुखावीण बोले। अंगावीण खेळे ते निजवस्तू।।' - श्रीदासराममहाराज, 'अपाणिपादोहमचिन्त्यशक्तिः पश्याम्यचक्षुः स श्रुणोभ्यकर्णः। अहं विजानामि विविक्तरूपो न चास्ति वेत्ता मम चित्सदाहम्।।' - कैवल्यउपनिषद)***

***जयाचेनी प्रकाशे। अंत:करण प्रकाशे।***
***जो निजतेजे स्फुरतसे। ते जाण तुची ।।२८।।***

तात्पर्यार्थ - ज्याच्या प्रकाशाने अंत:करण प्रकाशात येते असे स्फुरद्रूप निजतेज जेथे स्फुरते, तो तूच आहेस असे जाण.

***तेची जाणीव धरूनी उल्हासे। तरी नसतेची दृश्य भासे।***
***ते ते जाणीव निरसे। तै आत्मा लाभे ।।२९।।***

तात्पर्यार्थ - त्या केवल आनंदाच्या चैतन्याजवळ जी जाणीव आहे त्या जाणीवेने जे नाही आहे असे दृश्य भासमान होते. या दृश्याच्या जाणीवेचा निरास जेव्हा होतो तेव्हा आत्मा प्राप्त होतो.

***जाणिवेचिये वेळे। जे तिये पुढे आभासिले।***
***ते दृश्य म्हणोनी त्यजिले। तेथे उरले तेची उरे ।।३०।।***

तात्पर्यार्थ - जाणीवेत येणारे सारे दृश्य जर टाकले, ओसरले तर जे उरते ते कायमचे उरणारे अविनाश सत्य होय.

***जे जे भासे जाणिविये। ते ते जरी निरसुनी जाये।***
***तरी जाणीवची आहे। तेची पाहे तियेते ।।३१।।***

तात्पर्यार्थ - जे जे जाणीवेला भासते त्या दृश्याचा निरास झाल्यावर जी जाणीव राहते तीच त्या आत्म्याला पाहते.

***ते जाणीव आत्मयाची प्रभा। तो स्वयंभू तियेते उभा।***
***दीप आपुलिया शोभा। आपण जैसा ।।३२।।***

तात्पर्यार्थ - ती जाणीव म्हणजे स्वयंभू आत्म्याचा प्रकाश आहे. त्याच्या प्रकाशानेच त्याला पाहायचे. जसे दिव्याच्या प्रकाशानेच दिवा आपण पाहतो तसे.

***दृश्य मृगजळ आभासन। ते करूनिया निरसन।***
***तू पाहे बा कवण। आपण ऐसे ।।३३।।***

तात्पर्यार्थ - दृश्य जग जेवढे दिसते तेवढे सारे मृगजळाप्रमाणे खोटे असून ते खरे भासते. म्हणून जे जे दिसते त्या सर्व दृश्याची आशा त्यागून आपण कोण, कसे आहोत हे पाहा.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते लिंगदेह निरसनं नाम पंचमं प्रकरणं संपूर्णम् ।।५।।**

प्रकरण ६ वे

# कारणदेह निरसन

***नेणे म्हणशी ते नेणीव। तो मिथ्या भ्रम भाव।***
***रूपासारिखा अवयव। छायेस जैसे।।१।।***

तात्पर्यार्थ - वस्तुतः आपण आत्मरूप आहोत. आपणापाशी अखंड स्मरण - जाणीव - आत्म्याची आहे. देहतादात्म्याने संसारामुळे हे निजत्वाचे विस्मरण झाले आहे. आपण काही विसरलो आहोत हे या आत्म्यापाशील स्मरणाने आठवते. स्मरणाच्या प्रकाशाने अज्ञानाचा अंध:कार जाणवतो. आपण काही जाणत नाही हे जाणतो म्हणजे काय जाणायला पाहिजे हे आपणास माहीत आहे असाच त्याचा अर्थ होतो. आपणास खोटे कळते याचा अर्थ आपणास खरेही समजते. म्हणजे नेणीव - अज्ञान - हा भ्रम आहे, खोटी आहे. जसे रूप आहे तशीच त्याची छाया उमटणार. 'देह म्हणजे मी' हा मीपणा, हे अज्ञान, हा भ्रम तसेच त्याचे ठायी असणारी नेणीव हाही भ्रम.

***आप आपणिया जाणता। सदैव असे सर्वथा।***
***ना तरी न कळण्याची अवस्था। कवण सांगे।।२।।***

तात्पर्यार्थ - आत्म्यापाशी अखंड स्मरण - जाणीव - आहेच. नाहीतर मला कळत नाही हे कोण सांगेल?

***आप आपणा जाणता निके। तेथे नेणीव आड ठाके।***
***तरी इयेचे पारखे। पण कवण सांगे ।।३।।***

तात्पर्यार्थ - खरे पाहिले तर आपण आपणालाच पहात असतो, चैतन्यच चैतन्याला पहात असते, पण देह तादात्म्याने आपण आकार पाहतो,

द्वैताचे पाहणे होते, अज्ञान - नेणीव - आडवे येते. पण आपण आपल्याला जाणत नाही. ही नेणीव -अज्ञान - आहे, हा नेणीवेचा परकेपणा आपणास कशाने कळतो. ***(‘आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।। आपणा पाहता आकार उरेना। बोलाया राहेना पहाता कोणी।।’ - श्रीदासराममहाराज, ‘तैसा सर्वत्र मीची मिया। घेपतसे धनंजया। परी दृश्यत्व हे वायां। अज्ञानवशे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।’ - श्रीसमर्थ, ‘आपली आपणपेया। विसरू जो धनंजया। तेची रूप यया। अज्ञानासी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***नकळे ऐसे जाणवले। ते न कळण्यासी नाही कळले।***
***म्हणोनी नेणणे जया विवळे। तोची जाण आत्मा ।।४।।***

तात्पर्यार्थ - मला कळत नाही ही नेणीव - अज्ञान - आहे. असे जे आपणास समजते, ते अज्ञान्याला नाही कळले, ते ज्ञानी अंतरात्म्यालाच कळले. हे अज्ञान आहे हे ज्याला कळले, तो ज्ञानी अंतरात्मा.

***आपुलिया जाणीवा। धरिशी नेणीव भावा।***
***याकारणे तो गोवा। पडे जयाचा तयासी ।।५।।***

तात्पर्यार्थ - जीव आपल्या जाणीवेलाच नेणीव समजतात व नसलेल्या अज्ञानात गुरफटतात.

***आप आपलिया न कळे हे नेणीव। ऐसे म्हणावे तरी तोची जाणीव भाव।***
***म्हणोनिया नेणीव। मिथ्या भ्रांती ।।६।।***

तात्पर्यार्थ - आपण आपल्याला जाणत नाही या नेणीवेलाच जाणणे

हीच खरी जाणीव. म्हणून अज्ञान ही भ्रांती.

***नेणीव जरी जाणितली। तरी ते नेणीव मिथ्या झाली।***
***तेथील जाणीव उरली। आत्मप्रभा ।।७।।***

तात्पर्यार्थ - विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या नेणीवेची - अज्ञानाची - जाणीव (ज्ञान) झाली तर नेणीव उरत नाही. जी जाणीव उरली तो आत्मप्रकाश.

***तुची आपण नेणशी। ऐसे तुची जाणशी।***
***तरी नेणीवे का गुंतसी। नाथिलाची ।।८।।***

तात्पर्यार्थ - तू आपणाला स्वत:ला जाणत नाहीस हे तूच जाणतोस म्हणजे तू नेणीवेला जाणतोस म्हणजे मग नेणीव कुठे शिल्लक राहते? मग तू नसलेल्या नेणीवेत का गुरफटतोस?

***तू आत्मा स्वयंप्रकाश। तेथे नेणीव ही मिथ्या भास।***
***तो निरसता तू अविनाश। स्वतः सिद्ध ।।९।।***

तात्पर्यार्थ - आपण ज्ञानरूप - प्रकाशरूप - आत्मरूप आहोत. आपणापाशी अखंड स्मरण आहे. मग तेथे नेणीवेचा - अज्ञानाचा - अंध:कार कसा असेल? सुर्याच्या गावाला कधी अंधार असतो का? 'देह म्हणजे मी' या खोट्या मीपणामुळे - जीवपणामुळे - अज्ञानाचा भ्रमभास निर्माण झाला आहे. एवढा भ्रम दूर केला की आपणच अविनाश स्वत:सिद्ध स्वयंब्रह्म आहोत. ***('आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणिजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।'- श्रीसमर्थ, 'नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।' - संतवचन)***

***या सर्वांशी जो जाणे। तो काय आपणाते नेणे।***
***नेणीवेस तरी कळणे। असेचिना ।।१०।।***

तात्पर्यार्थ - सर्वाला जाणणाऱ्या आत्मरूप आपणाला तो कायरूप - देहरूप - जाणत नाही. नेणीवेच्या ठिकाणी कधीही जाणीव असत नाही. जाणीवेला नेणीव समजू शकते.

***ऐसे नेणीव तेची कारण। कार्य स्थूळ सूक्ष्म जाण।***
***तिये कारण सुषुप्तीचे लक्षण। ऐक आता ।।११।।***

तात्पर्यार्थ - आपण आपल्याला न जाणणे, हे अज्ञान - नेणीव - होय. हा चैतन्याचा विसर झाल्याने जगाची जाणीव होणे हे कार्य होते. म्हणजे नेणीव हे कारण तर स्थूल सूक्ष्म देहात अनुक्रमे जागृती व स्वप्नावस्थेत, दृश्याचा जगाचा अनुभव घेणे हे कार्य. म्हणून कारणदेहातील सुषुप्तीचे, अज्ञानाचे वर्णन आता करतो. ***('आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरूनी राहणे आपणासी।।' - श्रीदासराममहाराज, 'ते आघवेची दिसणे। जयाते का न देखणे। विश्व भासतसे जेणे। लपालेनी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चैतन्याचा विसरू। ते हे जग।।' - श्रीसमर्थ)***

***मन प्रवर्ते इंद्रियद्वारे। बाह्यविषयी व्यवहारे।***
***हे जागृती हे खरे। जाणिजेसू ।।१२।।***

तात्पर्यार्थ - मन हे इंद्रियांमार्फत बाह्य विषयात कार्यान्वित होते, जीवाचे दृश्याशी तादात्म्य होते. याला जागृती म्हणतात, हे तू जाणतोस.

***तो आभास घेउनी अंतरी। मन सूक्ष्म कल्पना करी।***
***तेधवा स्वप्नावस्था बरी। मांडे तेथे ।।१३।।***

तात्पर्यार्थ - तो जागृतीतील आभास लक्षात घेऊन मन अंतरी तशाच सूक्ष्म कल्पना करते. त्यातून स्वप्नांचा आभास होतो ती स्वप्नावस्था.

***परी जाणीव दोहीची एक। ते आपणिया करी निःशेख।***
***तेव्हा सुषुप्ती अवस्था देख। अज्ञान गडद ।।१४।।***

तात्पर्यार्थ - जागृती, स्वप्न या दोन्ही अवस्थांमध्ये मनाला दृश्याचे काल्पनिक संशयित ज्ञान असते. ते कल्पना सरली की कल्पांती नाहीसे होते. ते विपरीत ज्ञान जेव्हा नाहीसे होते, तेव्हा तिसरी सुषुप्ती - निद्रा - अवस्था प्राप्त होते. सुषुप्ती अवस्थेत 'नेणे ब्रह्म नेणे माया' असे संपूर्ण अज्ञान - नेणीव असते.

***ते नेणीवची आहे जाणीव। परी धरिला विपरीत भाव।***
***आप आपणा नाठव। अज्ञानवशे ।।१५।।***

तात्पर्यार्थ - स्थूल व सूक्ष्म देहातील जागृती व स्वप्न या अवस्थेत मनातील विपरीत भावाने विनाशकाळी विपरीतबुद्धीला विपरीत ज्ञान होते, द्वैताचे - दृश्याचे - ज्ञान होते. 'देखणे येकाचे येक' होते त्यामुळे संसरण - संसार - शून्य होत नाही, त्याला सत्य आत्मज्ञान होत नाही. या दोन्ही अवस्थेत आपले ज्ञान आपल्याला होत नाही. म्हणून या दोन्ही अवस्थेतील जाणीवेला नेणीवच - अज्ञानच - समजतात. ***('विनाशकाले विपरीत बुद्धी' - संस्कृत वचन, 'जागृती, स्वप्न, सुषुप्ती नाठवे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आत्मेयासी देहद्वये बंधन। तयासी आज्ञान मुळ कारण। म्हणौनी आज्ञान निवृत्तीवीण। मोक्षू कैचा।।'जव आज्ञान न फिटे। तव संसार निःशेष न तुटे। विपरीतज्ञानाचा कोंबू फुटे। माघौता म्हणौनी।।' - संत मुकुंदराज, 'आपला आपणपेया। विसरू जो धनंजया। तेची रूप यया।***

*अज्ञानासी।।’, ‘आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*

***आप आपणा विसरली। मग प्रपंचाचा आभास कल्पू लागली।***
***मी जीव हीच भुली। सुषुप्तीसी ।।१६।।***

तात्पर्यार्थ - आपण आपणाला विसरलो, चैतन्याचा विसर झाला, सत्य स्वरूप लोपले त्यामुळे भवचक्रात - संसारी - फिरावे लागले, कल्पनेमुळे भासमान दृश्य सत्य वाटू लागले व दिननीशी सायास (षड्विकारात्मक आयास) हा प्रपंच साकारला. ‘देह म्हणजे मी’ या कल्पनेने मीपणा - जीवपणा - हे अज्ञान - हा भ्रम झाला. तेच सुषुप्तीचे कारण आहे. ***(‘आत्मस्वरूपा विसरोनी आम्ही भवचक्री फिरलो।।’ - श्रीचिमडमहाराज, ‘चैतन्याचा विसरू ते हे जग।।’ - श्रीसमर्थ, ‘सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।’, ‘तैसे आपुलेनी विसरे। चैतन्यची देहाकारे। आभासोनी अविष्करे। देहपणे जे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ते नेणीव जै फिटे। तै स्वयंभ स्वरूप उमटे।***
***जैसे किडाळ जळलियापुढे। शुद्ध राहे ।।१७।।***

तात्पर्यार्थ - ‘देह म्हणजे मी’ हा खोटा मीपणा गेला, जीवपणा हे अज्ञान दूर झाले की संसार नि:शेष नाहीसा होऊन स्वयंभ सत्यस्वरूप प्रगट होते, नवलस्वरूपाचा योग घडतो. हिणकस जळून गेले की राहते ते शुद्ध चोख सोने. ***(‘देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।’ - श्रीसमर्थ, ‘तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देउनी गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले।***

*जाणते जे।।', 'आकारू जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ तुरे। अद्वय जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।' - संतवचन, 'रामकृष्णवाचा पाही। हेची जीवपण देही।।' - श्रीमामामहाराज)*

***नेणीवेपासाव उगवता। अभिमान होय धरता।***
***तो प्राज्ञ हे व्यवस्था। कारणदेहाची ।।१८।।***

तात्पर्यार्थ - 'देह म्हणजे मी' या अज्ञानातून - नेणीवेतून - उद्धभवलेल्या त्या अज्ञानावस्थेचा अभिमान धरणारा तो प्राज्ञ. ही कारणदेहाच्या अवस्थेची व्यवस्था.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते कारणदेह निरसनं नाम षष्ठं प्रकरणं संपूर्णम् ।।६।।**

प्रकरण ७ वे

# महाकारणदेह निरसन

***हा अवघा दृश्याकार। भासे जाणीवेसमोर।***
***तो निरसुनी तुची उर। ज्ञानस्वरूप ।।१।।***

तात्पर्यार्थ - जे जे साकार दृश्य कल्पनेने भासतंय ते कल्पनेच्या निरासाने टाकून दे म्हणजे सर्वकाळी असणारे ज्ञानस्वरूप उरेल.

***नेणीवेच्या नेणीवभावा। तुची जाणसी स्वयमेवा।***
***ते जाणीव धरूनी आपुलिया खेवा। आपण रिगावे ।।२।।***

तात्पर्यार्थ - नेणीव - अज्ञान - ज्याच्यामुळे आहे त्या देहभावाला - शरीरभावाला - जे जाणते ते स्वयमेव जागते ज्ञान. देहभाव विरल्यावर राहणाऱ्या जाणीवेच्या साधनाने - साह्याने - आपण आपल्याशी तद्रूप व्हावे. जाणीवरहित जाणते व्हावे. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' - श्रीसमर्थ)***

***आप आपणासी जाणता। नेणीव आहे की आता।***
***स्वयेची होउनी ज्ञाता। निरशी नेणीव ।।३।।***

तात्पर्यार्थ - आपण आपल्याला जाणले की देहाचे ज्ञान, आकाराचे ज्ञान ही नेणीव नाहीशी होते. आपण ज्ञानरूप - आत्मरूप - झाल्यावर तेथे अज्ञान - नेणीव - राहीलच कसे? ***('आकार पहाणे द्वैताचे देखणे। विसरोनी रहाणे आपणासी। आपणा पाहता आकार उरेना। बोलाया राहेना पहाता कोणी।।' - श्रीदासराममहाराज)***

***नेणीव जेथे निरसली। तेथे जाणीव राहिली एकली।***
***ते निजदृष्टी बोलिली। आत्मरूप ।।४।।***

तात्पर्यार्थ - विपरीत ज्ञान नाहीसे झाल्यावर राहणाऱ्या अज्ञानाची - नेणीवेची - जाणीव होणे म्हणजे नेणीवेचा निरास होणे होय. नेणीवेचा निरास झाल्यावर जी एक जाणीव उरते त्या निजदृष्टीला आत्मरूपाचे दर्शन होते.

***जो आपलिया जाणीवा। जाणे प्रपंचा सर्वा।***
***तया आपणा जाणावया गोवा। पडे नेणीवेचा ।।५।।***

तात्पर्यार्थ - जीव आपल्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवेने सर्व प्रपंच जाणतो पण तो प्रपंचच - नेणीवेचा पडदाच - जीवाला स्वत:चे ज्ञान करून घेण्यामध्ये आडवा येतो. ***(‘प्रपंच पडदा पडली झापड। राम दिसेना डोळा गे।। दिवसा झोपी रात्री झोपी। झोपेने दिधला टोला रे।।’- श्रीसमर्थ, ‘त्रिविध देहे त्रिविध अवस्था। त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता।। येया प्रपंचाते तत्साक्षित्वे जाणौनी वेवस्था। ते तुरीया जाणावी।।’ - श्रीसंत मुकुंदराज)***

***ते नेणीव फिटे गुरुखुणा। जाणे आपण आपणा।***
***बोलिजे या अनुसंधाना। महाकारण ऐसे ।।६।।***

तात्पर्यार्थ - गुरुकृपेने अनुभवाच्या गुरू - श्रेष्ठ - खुणा प्राप्त झाल्या की मनोलयाने अहंकार नाहीसा होतो, चैतन्याची नेणीव नाहीशी होऊन चैतन्याची जाणीव होते, ‘पाहणे आपणासी आपण’ हे आत्मज्ञान होते. या अद्वैतानुसंधानाला ‘महाकारणदेह’ म्हणतात.

***फिटुनिया नेणणे। आप आपणा जाणणे।***

***तिही देहाचेनी साक्षीपणे। महाकारणदेह ।।७।।***

तात्पर्यार्थ - दृश्याचे विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या नेणीवेला - अज्ञानाला - जाणणे म्हणजे नेणीव फिटणे, नेणीव मिथ्या होणे, आपण आपणाला जाणणे होय. या योगे स्थूल, सूक्ष्म, कारण या तिन्ही देहातील अनुक्रमे जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होते. या तिन्ही देहात सर्वसाक्षी मनाला एका चैतन्याची अहर्निशी जाणीव होते. हे अखंड चैतन्याचे स्मरण असणाऱ्या अवस्थेला तुर्यावस्था म्हणतात तर या देहाला महाकारणदेह म्हणतात. ***('जागृती स्वप्न सुषुप्ती। तिन्ही अवस्थांते प्रकाशिती। यालागी ते चौथी। तुरीय म्हणती सज्ञान।।' - श्रीनाथमहाराज, 'महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरीकथा।।' - श्रीदासराममहाराज)***

***तिही अवस्थांचे जाणपण। तियेशी तुर्या अवस्था ऐसी खूण।***
***तिही देहांचे जे अवलोकन। ते महाकारणदेह ।।८।।***

तात्पर्यार्थ - तिन्ही अवस्थांमध्ये वेगळेपणाने होणारे चैतन्याचे ज्ञान - जाणीव - ज्या अवस्थेमध्ये होते त्या अवस्थेला तुर्यावस्था असे म्हणतात. हे तिन्ही देहातील चैतन्याचे अनुसंधान ज्या देहात प्राप्त होते त्याला महाकारणदेह म्हणतात. म्हणून महाकारणदेहात अखंड चैतन्याचे स्मरण असते.

***मी सर्वसाक्षी आपण। हा प्रत्यगात्म्याचा अभिमान।***
***सर्वांचे जेथे खुंटले स्फुरण। ते शुद्धस्वरूप ।।९।।***

तात्पर्यार्थ - मी, चैतन्याला - ब्रह्माला - सर्वाला - जाणणारे सर्वसाक्षी मन असा ज्याला अभिमान असतो तो प्रत्यगात्मा. सर्वसाक्षी मनाचे उन्मन झाले की 'मी अमुक आहे' असे हृदयदेशी (अंतःकरणात) स्फुरण

राहात नाही, अहंचे स्फुरण राहात नाही, ज्ञानाचे विज्ञान होते ते निश्चळ शुद्धस्वरूप. ***(‘म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।’, ‘जेथे ज्ञानची होते विज्ञान। जेथे मनची होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।’ - श्रीसमर्थ, ‘तया पाडे देही। जया मी आहे हे सेचि नाही। निरहंकारता पाही। तया नाव।।’, ‘एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी। मी अमुका आहे ऐसी। जे बुद्धी स्फुरे अहर्निशी। ते वस्तू गा मी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***कार्यकारणाचे कारण। यालागी बोलिजे महाकारण।***
***कार्यकारण झालिया शून्य। महाकारण कवण म्हणे ।।१०।।***

तात्पर्यार्थ - स्थूल देह व सूक्ष्म देह हे कार्य व कारणदेह हे त्यांचे कारण. या कार्यकारणाचे कारण हा चौथा देह महाकारण होय. अज्ञानाचे (नेणीवेचे) ज्ञान झाले की कारणदेहाबरोबर स्थूल, सूक्ष्म हे कार्य शून्य होते. अखंड स्मरणाने - जाणीवेने - जाणीवेचा ग्रास होतो. महाकारणदेह शून्य होतो. ***(‘ऐसे नेणीव तेची कारण। कार्य स्थूळ सूक्ष्म जाण। तिये कारण सुषुप्तीचे लक्षण। ऐक आता।।’, ‘आत्मेयासी देहद्वयेबंधन। तयासी आज्ञान हेची कारण। आज्ञान निवृत्तीवीण। मोक्षू कैचा।।’, ‘जव आज्ञान न फिटे। तव संसार नि:शेष न तुटे। विपरीत ज्ञानाचा कोंबू फुटे। माघौता म्हणौनी।।’- संत मुकुंदराज)***

***आहे स्वयंभ आपण। जाणे आपली आपण खूण।***
***परब्रह्म निर्वाण। निजस्वरूप ।।११।।***

तात्पर्यार्थ - स्वयंभ परब्रह्म म्हणजेच निजस्वरूप. आपण आपल्या स्वरूपाला पाहणे म्हणजे स्वरूपाकार होणे, परब्रह्माकार होणे, मोक्ष प्राप्त होणे होय. ***(‘परब्रह्म म्हणिजे सकळापरते। तयास पाहता***

***आपणची ते।।', 'आकाश वेगळेपणे पाहावे। स्वरूपी स्वरूपची व्हावे।।' - श्रीसमर्थ)***

***ऐसे आपुले अनुसंधान। करिता होय विज्ञान।***
***प्रपंचाचे मिथ्यापण। प्रत्यया ये ।।१२।।***

तात्पर्यार्थ - खोट्या कल्पनेचा नाश झाला की द्वैतानुसंधान सुटते व स्वरूपानुसंधान जडते, कल्पनेने भासणारा प्रपंच खोटा आहे हे प्रत्ययाला येते व सत्यस्वरूप प्रगट होते. जाणत्याला जाणल्याने जाणीव विरते व ज्ञानाचे विज्ञान होते. ***('तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।', 'सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेची शुद्ध कल्पना।।', 'साक्षत्व वृत्तीचे कारण। उन्मनी ते निवृत्ती जाण। जेथे विरे जाणपण। विज्ञान ते।।', 'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।'- श्रीसमर्थ)***

***मी शुद्धात्मा आपण। ऐसा वर्ते जो अभिमान।***
***तयाचाही साक्षी कवण। तुजवाचोनी ।।१३।।***

तात्पर्यार्थ - ब्रह्माचे ठिकाणी - शुद्धात्म्याचे ठिकाणी - 'मी' चे स्फुरण होते, अभिमान उत्पन्न होतो. त्या अभिमान्याला जाणणारा साक्षी तुझ्याशिवाय कोण असणार? ***(''मी परब्रह्म' येणे आकारे। ज्ञानस्वरूपी स्फुर्ती स्फुरे। ते वोळखावी चातुरे। महामाया।।' - संत मुकुंदराज, 'स्वरूप निर्विकल्प पूर्ण। ते 'मी' म्हणावया म्हणते कोण। ऐसेही ठायी स्फुरे मीपण। ते मुख्यत्वे जाण मूळमाया।।'- श्रीनाथमहाराज)***

*म्हणोनी जाणीवेचे जे निजज्ञान। ते शुद्धस्वरूप आपण।*
*सर्व निरसी परिपूर्ण। निजात्मा तू ।।१४।।*

तात्पर्यार्थ - दृश्यभान गेल्यावर जी निजत्वाची जाणीव राहते ती जाणणारे आपले शुद्धस्वरूप होय. जाणीव विरल्यावर जे विज्ञान राहते, तोच आपला आत्मा होय. ***('जेथे नाही दृश्यभान। जेथे जाणीव हे अज्ञान। विमळ शुद्धस्वरूपज्ञान। यासी बोलिजे।।', 'साक्षत्व वृत्तीचे कारण। उन्मनी ते निवृत्ती जाण। जेथे विरे जाणपण। विज्ञान ते।।' - श्रीसमर्थ, 'पाठी श्रुतीसहित अशेष। जग हारपे जेथ निःशेष। ते निजज्ञानही चोख। जाणता मीची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

*ज्ञान जेथुनी स्फुरावे। ते आपणची स्वभावे।*
*ऐसे स्वरूप अनुभवावे। जाण पै गा ।।१५।।*

तात्पर्यार्थ - जेथे अहंपणे जाणीव प्रगट होते तेच स्वभावे आपले स्वरूप आहे. त्या वायुस्वरूपाचाच अनुभव आपणास घ्यावयाचा आहे. ***('वायोमध्ये जाणीव गुण। तेची ईश्वराचे लक्षण। तयापासून त्रिगुण। पुढे जाले।।' - श्रीसमर्थ, 'स्वरूप निर्विकल्प पूर्ण। ते 'मी' म्हणावया म्हणते कोण। ऐसेही ठायी स्फुरे मीपण। ते मुख्यत्वे जाण मूळमाया।।' - श्रीनाथमहाराज, ''मी परब्रह्म' येणे आकारे। ज्ञानस्वरूपी स्फुर्ती स्फुरे। ते वोळखावी चातुरे। महामाया।।', 'हे परब्रह्म निर्गुण। सर्वेश्वराचे निजरूप जाण। मुळमायेसी अधिष्ठान। जाण पूर्ण चैतन्य।।' - श्रीसंत मुकुंदराज, 'अहंपणे जाणीव जाली। तेची मुळप्रकृती बोलिली। महाकारणकाया रचली। ब्रह्मांडीची।।' - श्रीसमर्थ)***

*जेथे जाणीव खुंटे। ते तुझे स्वरूप नेटेबोटे।*
*घनानंद चढे ना वोहटे। अपरिमीत ।।१६।।*

तात्पर्यार्थ - महाकारणदेहातील वेगळेपणाने होणारी चैतन्याची जाणीव विरली - खंडीत झाली - की शब्द खुंटतो, बोलणे तुटते, व्यवहाराचा शेवट होतो व सदोदीत साक्षात्कार होऊन तो विमळशुद्ध स्वरूपाकार होतो, आपल्या स्वरूपाचे ज्ञान होते. या स्वरूपाचे ठिकाणी अपरिमीत असा आनंद आहे. 'आनंदाचे डोही आनंद तरंग आनंदची अंग आनंदाचे' असेच त्याचे वर्णन करावे लागते. ***('खुंटलासे शब्द राहिला व्यवहार। झाला साक्षात्कार सदोदीत।।' - संतवचन, 'जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।'- श्रीसमर्थ)***

***जे अमर्याद अमूप। ते जाणिजे आपेआप।***
***अविनाश स्वरूप। अखंडीत ।।१७।।***

तात्पर्यार्थ - हे अविनाश स्वरूप अमर्याद, अखंडीत सर्वत्र गुप्तपणे पसरले आहे. ते जगापेक्षा वेगळे एकमेव असल्याने विनाशी जगात त्याला उपमा नाही. सहजावस्थेत आपेआप ते स्वरूपच जाणले जाते.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते महाकारणदेह निरसनं नाम सप्तम प्रकरणं संपूर्णम् ।।७।।**

प्रकरण ८ वे

# शून्य खंडण

***जरी ते शून्य भाविजे। तरी कल्पूनि नाम ठेविजे।***
***जे आपण आपणा सुजे। ते शून्य कीजे ।।१।।***

तात्पर्यार्थ - महाकारणदेहात जे आपण आपला वेगळेपणाने अनुभव घेतो त्याला शून्य म्हणतात. स्वरूप - ब्रह्म - वस्तू - वेगळेपणाने अनुभवता येत नाही. अर्थात महाकारणदेहातील शून्याचा अनुभव म्हणजे ब्रह्माचा, चराचराचे मूळ अशा स्वरूपाचा अनुभव नव्हे. शून्य जाणवते म्हणजे त्याच्या नामरूपाची कल्पना करता येते आणि तो नामरूपातीत आहे. जे जे रूप आणि नाम आहे तो सारा भ्रम आहे आणि वस्तू निर्भ्रम आहे. म्हणून महाकारणदेहात जे आपण आपल्याला जाणतो ती जाणीव शून्य व्हावयास हवी. वस्तूला पाहताच आपण वस्तुरूप स्वरूपाकार व्हावयास हवे. ***('भिन्नपणे अनुभवले। तयास शून्य ऐसे बोलिले। वस्तू लक्षिता अभिन्न जाले। पाहिजे आधी।।', 'जे जे रूप आणि नाम। तो तो अवघाची भ्रम। नामरूपातीत वर्म। अनुभवे जाणावे।।', 'वस्तू आपणची होणे। ऐसे वस्तूचे पाहणे। निश्चयेसी भिन्नपणे। शून्यत्व लाभे।।' - श्रीसमर्थ, 'कारणदेही देखे दसवेद्वार। महाकारणी घोर शून्य ज्ञान।।' - श्रीदासराममहाराज, 'निश्चळ ते परब्रह्म। जेथे नाही दृश्य भ्रम। विमळब्रह्म ते निर्भ्रम। जैसे तैसे।।' - श्रीसमर्थ)***

***जो सर्व शुन्याते जाणे। तया शून्य ऐसे कवण म्हणे।***
***जे काही नाही तेणे। आपणा केवी जाणिजे ।।२।।***

तात्पर्यार्थ - जे ब्रह्म (सर्व हे नाव ब्रह्माचे आहे) शून्याला जाणते त्याला शून्य कोण म्हणेल? शून्य आहे हे कोणाला कळते ते ब्रह्म.

नेणीवेची जाणीव कोणाला होते ते ब्रह्म. जे काही नाही ते शून्य आपणच आपणास कसे जाणेल?

***जिया स्वरूपी नुरे दृश्य। दृश्यासी द्रष्टत्व अदृश्य।***
***जयाचे तयासीच प्रकाश। स्वस्वरूप सदा ।।३।।***

तात्पर्यार्थ - स्वरूपाचे ठिकाणी दृश्यभ्रम असत नाही. त्यामुळे दृश्याचे दृष्टीने हे दृश्यभ्रम नसणारे दृष्टत्व अदृश्य असते. दृश्याला द्रष्टा पाहता येत नाही. ते स्वरूप आपल्याच प्रकाशाने आपल्याला सदा पाहते. ***('दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।', 'निश्चळ ते परब्रह्म। जेथे नाही दृश्यभ्रम। विमल ब्रह्म ते निर्भ्रम। जैसे तैसे।।'- श्रीसमर्थ)***

***सर्वही निरसुनी जाणीव। उरले सांडून नेणीव।***
***तया ज्ञाना जाणावया भाव। न स्फुरे काही ।।४।।***

तात्पर्यार्थ - नेणीव सांडून जी जाणीव उरते म्हणजे नेणीवेची जाणीव होऊन नेणीव खोटी ठरते व जी जाणीव उरते तिचा निरास झाल्यावर जे ज्ञानरूप अखंड स्मरण उरते ते जाणावयास कोणतेही साधन उरत नाही. ***('अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।' - श्रीदासराममहाराज, 'मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंधःकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।' - श्रीसमर्थ)***

***म्हणोनी अभाव ऐसा भासे। परी शून्य म्हणावे कैसे।***
***जे सर्वासी जाणोनी असे। शुन्यासमवेत ।।५।।***

तात्पर्यार्थ - शरीरभाव प्रगट झाला असल्याने सोहंभावाचा अभाव भासतो. पण जो सोहंभाव शुन्यासहित सर्व दृश्याला जाणणारा आहे,

जो शरीरभाव नासल्यावर प्रत्ययाला येतो, ज्याचेपाशी विस्मरण नाही असे अखंडस्मरण आहे, त्याला शून्य कसे म्हणणार? ***(‘तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘सोहंभावे स्मरला। स्मरला नाहीच की विस्मरला।।’ - संत शिवदिनी)***

***शून्याते शून्यपण। जाणीव कल्पी आपण।***
***ते स्वरूपी होय लीन। शून्यासहित ।।६।।***

तात्पर्यार्थ - शून्याचे शून्यपण स्वरूपाकार आपणाला कल्पनेने जाणवते आणि ती जाणीव शून्यज्ञानासह स्वरूपी तद्रूप होते. ***(‘जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।’- श्रीसमर्थ)***

***ते शून्य ना जाणीव। दृश्य ना नेणीव।***
***ज्ञप्तीमात्र भरीव। स्वस्वरूप ।।७।।***

तात्पर्यार्थ - ते ब्रह्म म्हणजे महाकारणदेहातील अनुभवलेले शून्य नव्हे किंवा ज्या जाणीवेला शून्य जाणवते ती जाणीव पण नव्हे. ते ब्रह्म म्हणजे दिसणारे दृश्याचे विपरीत ज्ञान नव्हे किंवा ज्या अज्ञानातून - नेणीवेतून - हे विपरीत ज्ञान प्रगट होते, ती नेणीव पण ब्रह्म नव्हे. ते ब्रह्म म्हणजे जाणीवरहित जाणते केवलज्ञानरूप स्वरूप होय. ***(‘जेथे नाही दृश्यभान। जेथे जाणीव हे अज्ञान। विमळशुद्धस्वरूप ज्ञान। यासी म्हणिजे।।’, ‘येक ज्ञान येक अज्ञान। येक जाणावे विपरीत ज्ञान। हे त्रिपुटी होय क्षीण। तेची विज्ञान।।’ - श्रीसमर्थ)***

***जे निरंतर निर्मळ। ज्ञानघन केवळ।***
***चिदाकाश अखिळ। अगोचर ।।८।।***

तात्पर्यार्थ - निराभास ब्रह्म म्हणजे जे वेगळेपणाने पाहता येत नाही असे उपाधीवेगळे सर्वदा निर्मळ निरंजन आकाश - चिदाकाश, डोळ्यांस न दिसणारे सर्वत्र घनदाट पसरलेले केवळ ज्ञानरूप स्वस्वरूप. ***('उपाधीवेगळे आकाश। तया नाव चिदाकाश। तैसा निर्मळात्मा परेश। तो उपाधीवेगळा।।', 'आकाश अवकाश तो भकास। परब्रह्म ते निराभास। उपाधी नसता जे आकाश। तेची ब्रह्म।।' - श्रीसमर्थ)***

***जेथे शून्य दृश्याकार। अज्ञान निरसुनी अनिवार।***
***जे सूक्ष्माहुनी सूक्ष्म सपूर। निजज्ञान ।।९।।***

तात्पर्यार्थ - संसाराला शून्य पडल्यावर, म्हणजे दृश्य पदार्थांचे विपरीतज्ञान शून्य झाल्यावर राहिलेल्या अनिवार्य अज्ञानाचे ज्ञान झाल्यावर शून्य मेहेलमे अनुहात व दिपाचा दृश्याकार अनुभव घेतल्यावर जाणता जाणल्याने सर्वसाक्षी मन मुरते, जाणीव जाते, मग जे उरते ते सूक्ष्माहून सूक्ष्म पूर्ण जाणीवरहित जाणते निजत्व. ***('जे गगनाहुनी जुने। जे परमाणुहुनी साने। जयाचेनी सन्निधाने। विश्व चळे।।', 'पाठी श्रुतीसहित अशेष। जग हारपे जेथ निःशेष। ते निजज्ञानही चोख। जाणता मीची।।', 'तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तू देऊनी गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' - श्रीसमर्थ)***

***जे निष्कलंक ज्ञानाकाश। करी शुन्याकाशाचा ग्रास।***
***तो निजद्रष्टा स्वयंप्रकाश। परमात्मा तू ।।१०।।***

तात्पर्यार्थ - भुतांतरी जे ज्ञानघन स्वयंप्रकाश निरंजन परमात्मरूप आहे त्या ब्रह्मांशाला गगन किंवा ज्ञानाकाश म्हणतात. ज्याच्या प्रकाशाने मिथ्या कल्पनांचा नाश होऊन शुन्याकाशाचा ग्रास होतो तो निजद्रष्टा तूच आहेस. ***('पंचभुतांमध्ये वास। म्हणोनी बोलिजे आकाश। भुतांतरी जो ब्रह्मांश। तेची गगन।।', 'तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।'- श्रीसमर्थ)***

***तो तू निरालंब साक्षी। निर्लेपक सर्वपक्षी।***
***पारावार रहित निरीक्षी। देखणा तू होऊनी ।।११।।***

तात्पर्यार्थ - तू पाहणारा होऊन त्या एकट्या जाणत्या संपूर्ण अलिप्त सर्वव्यापक तुलाच पहा.

***जे ज्ञानाचे जिव्हार। आस्तिकांचे घर।***
***सुखाचे सागर। घनानंद तू ।।१२।।***

तात्पर्यार्थ - ज्याच्यावर आपले अस्तित्व अवलंबून आहे असा सुखाचा सागर आनंदरूप ज्ञानी परमात्मा तू आहेस.

***सर्वसाक्षीचे दीपन। प्रकाशाचे कोंदण।***
***जे आत्मानंदाचे निधान। ते कैवल्य तू ।।१३।।***

तात्पर्यार्थ - गगनाच्या कोंदणात कोंदलेल्या दिपाच्या स्वयंप्रकाशाचा अनुभव सर्वसाक्षी मनाला येऊन प्राप्त होणारा आत्मानंदाचा ठेवा - मोक्ष - तूच आहेस.

***जे सकल निरासे शुद्धबुद्ध। जेथे नुरे त्वंपद।***
***सरे तत्पद शुद्ध। असीपदेसी ।।१४।।***

तात्पर्यार्थ - गगनी स्वयंप्रकाश तारक स्वरूप अनुभवल्यावर मन वृत्तीसहित मुरते. संपूर्ण कल्पनेच्या निरासाने दृश्य पदार्थ वोसरल्यावर जे अत्यंत शुद्ध ज्ञानस्वरूप राहते, त्याठिकाणी मीतूपणा उरत नाही, त्वंपद तत्पद असिपद असा भेद उरत नाही. एक तो वस्तुरूपच होतो. ***('दृश्य पदार्थची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तु।।' - श्रीसमर्थ)***

***ऐसा तू परमात्मा। परी तुझा त्वा हारविला महिमा।***
***आता मिळुनी राहिजे निजधामा। कैसिया परी ।।१५।।***

तात्पर्यार्थ - खरे पाहिले तर जीव हाच परमात्मा - परब्रह्म - आहे. पण मीपणाच्या ठमठमाटामुळे विभक्त होऊन जीवपण प्राप्त झाले आहे. लाजीरवाणे जिणे प्राप्त झाले आहे. आता कसून अभ्यास कर व निजस्मरणी भक्त होऊन निजधामी चैतन्यी मिळून राहा. ***('विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।। निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत।।' - श्रीदासराममहाराज, 'तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***तो लक्ष्यांश अनुवादणे। परिसावा शुद्ध अंत:करणे।***
***नित्य जैसे अभ्यासणे। तैसे सांगू ।।१६।।***

तात्पर्यार्थ - हा उद्देश कसा साध्य करायचा हे शुद्ध अंत:करणाने ऐक. नित्य आत्मा जसा अभ्यासता येईल तसेच सांगू.

***जेणे स्वरूपी निश्चय बैसे। शुद्ध परमात्मा प्रकाशे।***
***सदा चित्त रमोनी समरसे। कैवल्यामाजी ।।१७।।***

तात्पर्यार्थ - परमात्म्याचे प्रकाशरूप सुंदर स्वरूप अनुभवल्यावर मन

वृत्तीसहित मुरते, बुद्धीचा स्वरूपाबद्दल निश्चय होतो. बुद्धी स्वरूपाचे ठिकाणी अनन्य होते. चित्तात समरसतेने सदा तो भरून राहतो. चित्ताला अखंड प्रसन्नता हा प्रसाद प्राप्त होतो. मोक्ष प्राप्त होतो.***(‘मन कृतं कृतं कर्म’ - योगवासिष्ठ, ‘मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।’, ‘बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्य त्यागे। मातेची भजे।।’, ‘मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादू जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।’, ‘देखे अखंडीत प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसारदुःखा।।’, ‘ज्ञानदेवा चित्ती हरीपाठ नेमा। मागिलिया जन्मा मुक्त झालो।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते शून्यखंडनं नाम**
**अष्टम प्रकरणं संपूर्णम् ।।८।।**

प्रकरण ९ वे

# निदिध्यासन

***तरी हे सांगितल्यापरी। ते स्वरूप निर्धारी।***
***मग ऐसाच अभ्यास करी। नित्यनेमेसी ।।१।।***

तात्पर्यार्थ - यासाठी मागे सांगितल्याप्रमाणे बुद्धीचा स्वरूपाबद्दल निश्चय - निर्धार - झाला की तो केवळ समाधीसुखी होतो. मग असाच नित्याचा नेमे अभ्यास कर, तो नित्यरूप सर्वथा ओळख, निर्धाराने सर्वकाळ असणाऱ्या स्वरूपाकार हो. ***('समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***पाहिजे एकांतस्थान। जेथे चंचळ न होय मन।***
***सकळ वृत्तीते आवरून। बैसावे तेथे ।।२।।***

तात्पर्यार्थ - जेथे मन चंचळ होऊन द्वैत जाणविणार नाही असे एकांतस्थान हवे. मनोवृत्तीचा निरोध साधला तरच एकांतस्थानी बैठक साधते.

***करून विषयाची निवृत्ती। चित्तासी प्रत्यगावृत्ती।***
***धरी दृश्यमात्री विरक्ती। त्यागबुद्धी ।।३।।***

तात्पर्यार्थ - विषयातून मन निघाले तरच चित्ताला त्याचा प्रत्यय येतो. याकरता या दृश्याची आशा विरक्तीने सांडली पाहिजे.***('विषयातून निघे मन। तेची जाणा उन्मन।।' - श्रीमामामहाराज, 'प्रत्यगवृत्ती येरझारी। तुझ्या दर्शनाची हरी।।' - संतवचन, 'म्हणे खेचर विसा झालासे पिसा। या दृश्याची आशा सांडी नाम्या।।' - संत विसोबा खेचर)***

***बैसोनी आसनी सावकाशे। अंतरामाजी प्रवेशे।***
***एकवटी इंद्रियद्वारी बैसे। मनोवृत्ती जे ।।४।।***

तात्पर्यार्थ - दिननीशी होणारे षडविकारात्मक आयास - सायास - थांबवून सावकाश भजन करत 'आस नुरे' या आसनावर बसावे म्हणजे इंद्रियांच्यामार्फत दृश्यावर उठणाऱ्या मनोवृत्ती उर्ध्वपंथी गमनाने अंतरात प्रवेशून चैतन्याकडे वळतील. ***('सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आसन ते आस न ते। अधिकची ते आसन ते।।', 'जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।। जरी पंधरा पळ साधेल पवन। उर्ध्वपंथी गमन साधे बापा।।'- श्रीमामामहाराज केळकर, 'भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***सांडुनी अभिमान स्थुळाचा। भाव धरी अंतराचा।***
***अभाव करूनी सर्वाचा। गगन पाही ।।५।।***

तात्पर्यार्थ - 'देह म्हणजे मी' हा अभिमान टाकून म्हणजे स्थूल देहाला विसरून अंतरी अनुसंधान ठेवून अंतर राखायचे. याचा अर्थ जगापासून अंतर राखून जगदंतर राखायचे. यायोगे भावाचा अभाव होऊन म्हणजे साधन नुरून अंतराकाशातील पवनाचे साह्याने गगनातील पवनाचा वेगळेपणाने अनुभव पाहाता येतो.***('आणिक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोची धन्य। समाधानी।।', 'जगदंतरी अनुसंधान। बरे पाहणे हेची ध्यान। ध्यान आणि ते ज्ञान। येकरूप।।', 'राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तद्नंतरे। ऐसी ही विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही।।', 'नाडीद्वारा धावे जीवन। जीवनामध्ये खेळे पवन। त्या पवनासरीसा जाण। आत्माही विवरे।।' - श्रीसमर्थ, 'बलिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनू सहजे गगना। मिळोची लागे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***स्थूल इंद्रियामधून। युक्तीने एकवटी मन।***
***अंतराकाशी नेऊन। स्थीर करी ।।६।।***

तात्पर्यार्थ - याकरता इंद्रियांमार्फत जीवाचे दृश्याशी जे तादात्म्य आहे ते मन युक्तीने साधनी एकाग्र करून अंतराकाशातील पवनाचे ठिकाणी एकवटावे.

***जे जे वृत्ती बाहेर धावे। तियेते परतोनी आणावे।***
***येणे अभ्यासे स्थिरावे। आपेआप ।।७।।***

तात्पर्यार्थ - या साधनाचे अभ्यासाने मन आपोआप सहज स्थिर होते. बाहेर धावणाऱ्या मनोवृत्ती अंतर्मुख होऊन चैतन्याकडे वळतात.***('विषय इंद्रिये जड ओळखणे। या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे। या नाव भक्ती।।' - संत शिवराम)***

***नातरी जिकडे मनाची राहाटी। न लागावे तयाचे पाठी।***
***माघारी घालोनिया दृष्टी। स्वस्वरूपेसी ठेविजे ।।८।।***

तात्पर्यार्थ - ज्या विषयांकडे मनाची ओढ आहे त्या विषयांच्या मागे आपण लागू नये. आपली दृष्टी जगावर न ठेवता जगदंतरी स्वस्वरूपी असावी.

***मन जो जो विषय धरी। तो तो विवेके विदारी।***
***तरी ते स्थिरावे अंतरी। सांडुनी कल्पना ।।९।।***

तात्पर्यार्थ - मनात जे जे विषय येतील त्या विषयांपासून विवेकाने मनाला परावृत्त करावे म्हणजे ते मिथ्या कल्पना सोडून अंतरी सत्यापाशी स्थिरावेल.

***तेथे हृदयाकाशी। मीपण स्फुरे जीवासी।***
***तेची विवेकेसी। पाहिजे जव ।।१०।।***

तात्पर्यार्थ - सर्वा जीवांचे हृदयदेशी 'मी अमूक आहे' असे जे अहर्निशी मीपणाचे स्फुरण आहे तेच जीवाचे जीवपण आहे. ते विवेकाने मन आवरून संसार शून्य करून पाहावे. ***('एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी। मी अमुका आहे ऐसी। जे बुद्धी स्फुरे अहर्निशी। ते वस्तु गा मी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तव ते निरालंबी स्फुरे। पुनरपी तेथेची मुरे।***
***तरी जीवदशा बारे। नास्तिक्यत्व पावे ।।११।।***

तात्पर्यार्थ - विवेकाने मन आवरून संसार शून्य करून पाहिले तर मन मीपणेवीण चैतन्यामध्ये स्थिर होते आणि तेथेच मुरून जाते. मन मुरले की मनातील मीपण - जीवपण - अज्ञान - पण नाहीसे होते.

***नदी उगमी स्थिरावे। तरी सिंधूपण का न पावे।***
***तैसे जीवाचे ब्रह्म का न व्हावे। या स्थिती राहता ।।१२।।***

तात्पर्यार्थ - नदीचे पाणी जर पुढे प्रवाहित न होता उगमापाशीच स्थिरावले तर तेथेच पाण्याचा समुद्र होईल. याप्रमाणे जीव जर जन्ममरणरहित उगमापाशीच स्थिर राहिला तर बिंदूबिंदूने बिंदूचाच सिंधू होईल. जीवाला ब्रह्मपणा प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. ***('उगमी जन्ममरण नाही स्वभावे।।'- श्रीसमर्थ)***

***म्हणुनी परतावे अभ्यंतरी। अभ्यास करावा ऐशियापरी।***
***मग कल्पना अभ्यंतरी। समरसोनी जाय ।।१३।।***

तात्पर्यार्थ - अशा प्रकारच्या अभ्यासाने बहिर्मुख असणारे मन उफराटे

होऊन अंतर्मुख झाले तर जाणता सत्य चिदानंद आत्माराम जाणल्यावर जाणीव जाते, तद्रूप होते, साऱ्या कल्पना सरतात किंवा साऱ्या कल्पना सरल्यावर, जाणीव विरल्यावर सत्यचिदानंद आत्माराम जाणवतो.

***सोडून स्थूळगती। ऐशी राहे अंतरस्थिती।***
***तोवरी अभ्यास निगुती। करावाची लागे ।।१४।।***

तात्पर्यार्थ - स्थूल दृश्याला, देहाला जाणणारी विसंगती - विषमगती - पालटून अंतरी सर्वत्र सदा असणारे सम अद्वयब्रह्म जाणणारी अंतरस्थिती, संगतीने (समगतीने) प्राप्त होईपर्यंत निगुतीने अभ्यास करावाच लागतो.

***तेथे जे जे दृश्य स्फुरे। ते ते सोडून होई माघारे।***
***ज्ञानस्वरूप निधरि। आपण होईजे ।।१५।।***

तात्पर्यार्थ - मनाला जो जो आकार दिसतो, दृश्य दिसते ते सारे त्यागले की तत्वाचा तत्वात निरास होऊन द्वैताचे पाहणे थांबते. ते मन अद्वैत ज्ञानस्वरूपाशी समरस होते, अद्वैत पाहते.

***देखणेची देखण्यावरी। परतोनी राहे जरी।***
***तरी दृश्याकारा उरी। कैसेनी होय ।।१६।।***

तात्पर्यार्थ - देखणा (द्रष्टा) जर द्रष्ट्यालाच (देखणाऱ्याला) परतून सतत पाहात असेल, 'पाहणे आपणासी आपण' हे ज्ञान जर होत असेल तर त्याला साकार दृश्य कसे बरे दिसेल? वेगळेपणाने दृश्य पाहणे हे अज्ञान कसे उरेल? ***('तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरिटी। येर भिन्नपण ते उठी। अज्ञानास्तव।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आपणा पहाता आकार उरेना। जेथे पहाणेपणा पहाणे आले।।' - श्रीदासराममहाराज)***

***साकारादी आघवे। शून्य होय स्वभावे।***
***तेथे आपण पाहावे। आत्मस्वरूप ।।१७।।***

तात्पर्यार्थ - भिन्नपणाने, वेगळेपणाने आकार अनुभवणे याला द्वैताचे देखणे, शुन्य अनुभवणे, अज्ञानाचे पाहणे म्हणतात. तेच स्वभावे निर्विकल्प अवस्थेत साकारादी आघवे शून्य झाल्यावर आपण आपल्याला पाहणे, आत्मस्वरूप पाहणे याला सत्यज्ञान म्हणतात. ***('भिन्नपणे अनुभविले। तयास शून्य ऐसे बोलिले। वस्तू लक्षिता अभिन्न जाले। पाहिजे आधी।।' - श्रीसमर्थ, 'शून्याचा हा खेळ विश्वाचा पसारा। अनुभव सारा शून्यामाजी।।', 'आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।।' - श्रीदासराममहाराज, 'तैसा सर्वत्र मीची मिया। घेपतसे धनंजया। परी दृश्यत्व हे वाया। अज्ञानवशे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जैसे वाढलिया नीर। नुरे काही आकार।***
***अंत:करणादी व्यवहार। तैसा होय ।।१८।।***

तात्पर्यार्थ - जसे पाण्याचा महापूर आला की काठावरील सारे दृश्य आकार बुडून सर्वत्र जीवनच अनुभवाला येते तसे स्वरूपाचा प्रेमपूर अंत:करणात अनुभवाला आला की दृश्य बुडून सर्वत्र स्वरूपाचा अनुभव येतो. द्रष्टा द्रष्ट्याला पाहतो त्यामुळे द्रष्टेपण नाहीसे होते, देखणा बुडतो.***('स्वरूपाचा पूर गगनासरिसा आला। देखणा बुडाला देखताची।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'प्रेम पुरामाजी बुडाले सर्वही। तेथे दास पाही कैचा उरे।।'- श्रीमामामहाराज, 'दृश्य जाऊनिया द्रष्टे। द्रष्ट्यासिची जै भेटे। तै एकलेपणेन घटे। द्रष्टेपणही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जैसे कुर्मे आकुंचन केले। कर चरण शीर अंतरी नेले।***
***मग आपणिया आपण उरले। अखंडीत ।।१९।।***

तात्पर्यार्थ - जसे कासव आपले डोके, हात, पाय इत्यादी अवयव आत अंगात ओढून घेते, इंद्रिये अंतर्मुख करून जगाचा तटका तोडते व अखंडीत आपले आपण एकटे उरते. ***(‘विठो तुझे माझे राज्य। नाही आणिकाचे काज।।’ - संतवचन)***

***जाणीव याची परी। प्रवेशता अंतरी।***
***तेथे येकली उरे उरी। आपणियाची ।।२०।।***

तात्पर्यार्थ - कासवाप्रमाणे बाहेरील साऱ्या दृश्याच्या जाणीवा नाहीशा करून - विपरीत ज्ञान नाहीसे करून - आपण काही जाणत नाही याची जाणीव अंतरी उरते तेव्हा अंत:करणात आपलीच एक जाणीव उरते.

***आपण एकी एकला। दुजा नाही देखिला।***
***ज्ञानमात्र संचला। आत्माराम ।।२१।।***

तात्पर्यार्थ - आपण जे कोणी एक आहोत त्या एकाला एकाचीच (आपली आपल्याला) सर्वत्र जाणीव होते. त्याला दुसरे काही जाणवतच नाही. ज्ञानरूपाने सर्वत्र आत्माराम भरून राहिल्याची जाणीव होते.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते अभ्यासयोगे निदिध्यासनं नाम नवम प्रकरणं संपूर्णम् ।।९।।**

प्रकरण १० वे

# दृश्याभासखंडण

***ऐसा उमज न होता। अज्ञान गडदामाजी पडता।***
***न कळे म्हणोनी भ्रमता। वेड लागे ।।१।।***

तात्पर्यार्थ - आत्मस्वरूप न उमजल्याने भवचक्रात फिरावे लागते. त्याला विनाशीकाळात विपरीत बुद्धीने विनाशी जगाचे विपरीत ज्ञान होते. अज्ञानाने होणाऱ्या भ्रमणाने भ्रांती होते. दु:खमूळ संसाराने माणूस भ्रमतो, त्याला खरे ज्ञान होत नाही. शेवटी तो वेडाच ठरतो.

***तो भ्रम आपणची वाहे। नाथिले अज्ञान धरूनी राहे।***
***वाया संदेही पाहे। न कळे म्हणोनी।।२।।***

तात्पर्यार्थ - आपला आपल्याला विसर पडल्याने, आत्मस्वरूप विसरल्याने आपण संसारात - भवचक्रात - भ्रमण करत आहोत. भ्रमणाने होणारे भ्रमरूप विश्वाचे विपरीत ज्ञान आपण सत्य मानतो व सत्य आत्मा न कळल्याने त्याबद्दल फुकटचा संशय येतो. आत्म्याशी परवत् वागणूक होते व पर्वताप्रमाणे पातक घडते. ***(‘वस्तू आपणापासी असता। गेली म्हणोनी होय दुश्चिता। आपले आपण विसरता। या नाव भ्रम।।’, ‘भ्रमरूप विश्व स्वभावे। तेथे काय म्हणोनी सांगावे। निर्गुण ब्रह्मावेगळे आघवे। भ्रमरूप।।’, - श्रीसमर्थ, ‘पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।’, ‘म्हणौनी संशयाहुनी थोर। आणीक नाही पाप घोर। हा विनाशाची वागूर। प्राणियासी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***उजेडीचा घरात आला। तव दृष्टी अंधार भरला।***
***डोळे असोनी अदेखणा झाला। आपणाशी तो ।।३।।***

तात्पर्यार्थ - बाहेरच्या लख्ख उजेडातून एखादा माणूस तुलनेने कमी प्रकाश असलेल्या घरात आला की सुरुवातीला काही काळ त्याला दिसत नाही. तो डोळे असूनही आंधळ्यासारखा वागतो. तसाच हा प्रकार आहे.

***का निशिचिया दोन प्रहरी। डोळिया गडद पडे भारी।***
***तैसा अज्ञान आंधारी। गुंतो नको ।।४।।***

तात्पर्यार्थ - मध्यरात्री जसे काळोखात डोळे असूनही अंधारच दिसतो, त्याप्रमाणे कल्पनेचा पडदा आला की सत्य राम दिसत नाही तर कल्पनाच भासमान होते. या मिथ्या कल्पनेत - अज्ञानाच्या अंधारात - गुंतू नको. ***('मना कल्पना कल्पिता कल्पकोटी। नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी। मनी कामना राम नाही जयाला। अती आदरे प्रिती नाही तयाला।।' - श्रीसमर्थ)***

***तेथे मनासी जे जे कल्पणे। ते ते सन्मूख देखणे।***
***दृश्या निरसोनी राहणे। स्वस्वरूपी निश्चलत्वे ।।५।।***

तात्पर्यार्थ - मनात येणाऱ्या कल्पनेमुळे दृश्य भासमान होते. कल्पनेच्या निरासाने दृश्यभान नाहीसे होते. निश्चळत्वाने स्वरूपाकार होऊन मोक्ष प्राप्त होतो.

***बोले आपण आपणाशी। अंतरी आपणा आपण उपदेशी।***
***पाहे तया विवेकासी। काही आकार असेना ।।६।।***

तात्पर्यार्थ - आपली आपल्याला वेगळेपणाने जाणीव होते म्हणजे आपण आपल्याशी बोलतो, आपण अबोलण्याचे बोलणे बोलतो. त्यामुळे अंतरी आपला बोध आपल्याला होतो. या साक्षात्काराने, उपदेशाने अहंकार

जातो, विवेकदीप उजळतो, शब्दाचा ग्रास होऊन त्याचे आकार पाहणे हे द्वैताचे देखणे थांबते. ***(‘जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।’ - श्रीसमर्थ, ‘दास म्हणे अबोलणे। हीच अनुभवाची खुणे।।’ - श्रीमामामहाराज)***

***जेथुनी उपजे विवेकमातू। पाहे तव अंतःकरणातू।***
***तेही धरूनी जाणीव हेतू। जाणते होय ।।७।।***

तात्पर्यार्थ - जिथून अंत:करणात मनाचा आवर हा विवेक निर्माण होतो तेव्हापासून अंत:करणातील मीपणाची जाणीव हा अविवेक नाहीसा होतो, अंत:करणातील हेतू मावळतो, मूळमाया चौथा देह हा विदेह होतो, तो जाणीवरहित जाणता होतो. ***(‘मनाचा आवर हाची गा विवेक। अनावर देख अविवेक।।’ - श्रीमामामहाराज, ‘मी अविवेकाची काजळी। फेडुनी विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे दिवाळी। निरंतर।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***देहासहित ब्रह्मांड शून्य। झालिया उरे परिपूर्ण।***
***काही न दिसे स्थानमान। कवणे ठायी ।।८।।***

तात्पर्यार्थ - कल्पनेच्या निरासाने साकार देहासहित ब्रह्मांडाची जाणीव नाहीशी होते व देहातीत परिपूर्ण वस्तूच जिकडेतिकडे जाणवते. दुसरे काहीच जाणवत नाही.

***साकार हा त्रिलोकू। नेणो काय झाला सकळिकू।***
***संचलो मी एकाएकू। चिदाकाश ।।९।।***

तात्पर्यार्थ - हे साकार असणारे सकळ त्रैलोक्य एकदम कुठे गेले हेच कळत नाही. फक्त एक निरूपाधीक वस्तूरूप मी - चिदाकाश - सर्वत्र भरून राहिले आहे असे जाणवते.

***अंतर बाह्य परिपूर्ण। शून्य झाले दृश्याचे भान।***
***असणे आपणिया आपण। एकत्वरहित ।।१०।।***

तात्पर्यार्थ - कल्पनेच्या निरासाने संपूर्ण अंतर्बाह्य असणारे दृश्याचे भान नाहीसे झाले व फक्त कल्पक आत्माच जाणवू लागला. भेद असेल तर एकपणाचे - एकत्वाचे - महत्व. अभेदच जर असेल तर एकटेपणाची कल्पना करायची काय गरज? एकटेपणाची कल्पना केली तर द्वैतच जाणविणार. ***('ते तू गुरुलिंगजी माझे। जे येकलेपणीच विरजे। जयालागी वोलांडीजे। अद्वैत बोधू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तेथे आंधारी गेली। मनबुद्धी मावळली।***
***आत्मप्रभा उजळली। चिदादित्याची ।।११।।***

तात्पर्यार्थ - जोवर मन बुद्धी आहे तोवर परमात्म्याचे ज्ञान होत नाही. अर्थात अज्ञानाचा अंधार जात नाही. मन, बुद्धी स्वरूपाचे ठिकाणी अर्पण झाली, मनबुद्धी मावळली की विश्वाचा आभास नाहीसा होतो, मावळतो व चैतन्याचा सूर्य उगवतो, आत्मप्रभा उजळते व अज्ञानाचा अंध:कार नाहीसा होतो. ***('तू मन बुद्धी साचेसी। जरी माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।', 'मावळवीत विश्वाभासू। नवल उदैला चंडांशू। अद्वयाब्जिनी विकासू। वंदू आता।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***येणे परी स्थूळाचा। प्रवृत्त मोडला जागृतीचा।***
***आता निरास लिंगदेहाचा। तैसाच किजे ।।१२।।***

तात्पर्यार्थ - ज्याप्रमाणे जागृती अवस्था ज्या देहाचे अनुषंगाने साधते त्या स्थूळ देहाचा निरास साधला, त्याचप्रमाणे आता लिंगदेहाचा निरास पण करावा.

***स्फुर्ती स्फुरे जेथुनी। ते पहिलेची असे अस्फुर्तीपणी।***
***मज देखता उमटोनी। मावळे स्फुर्ती ।।१३।।***

तात्पर्यार्थ - ज्या ठिकाणी वृत्ती, जाणीव स्फुरते ते प्रथमत: जाणीवरहित जाणते, वृत्तीरहित ज्ञानी असते. स्फुरलेल्या, उमटलेल्या जाणीवेत जर जाणता आला तर जाणीव, वृत्ती मावळते. ***('गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' - श्रीसमर्थ)***

***तू तये स्फुर्तीचा जाण। संकल्पविकल्पात्मकाचे जीवन।***
***निश्चयाचे कारण। तुची असे ।।१४।।***

तात्पर्यार्थ - ज्याठिकाणी वृत्ती स्फुरते ते वृत्तीरहित ज्ञान तू आहेस. हे वृत्तीरहित ज्ञान हेच संकल्पविकल्प करणाऱ्या मनाचे जीवन, निश्चय करणाऱ्या बुद्धीचे कारण आहे.

***अनुसंधान पूर्वीच असे। म्हणुनी ते उपजता तूज दिसे।***
***अहंता तुझेनी आंगे वसे। तेही तुची जाण ।।१५।।***

तात्पर्यार्थ - मिथ्या कल्पनांचा नाश झाल्यावर पूर्वीच असणाऱ्या विकल्परहित सत्य संकल्पाचे द्वैतानुसंधान चित्ताला जडते, ते तुला जाणवते. हे द्वैतानुसंधान ठेवण्याच्या चित्ताच्या प्रवृत्तीला अहंकार म्हणतात. अहंपणाने तुझ्या ठायी होणारी जाणीव तुलाच जाणवते.

***ऐसे पाचा भेदी अंत:करण। हे ही तुची स्फुरे जाण।***
***ते सांडिता काय तूजवीण। वेगळे पडे ।।१६।।***

तात्पर्यार्थ - याप्रमाणे जाणीव, मन, बुद्धी, चित्त, अहंकार हे अंत:करण

तुझ्या वृत्तीच्या स्फुरणाचा परिणाम आहे. वृत्तीरहित निवृत्ती अवस्थेत तुझ्याखेरीज काय बरे उरेल?

***जळे तरंग केवी सांडावा। आकाशे वायू केवी दवडावा।***
***तेवी तुझ्या स्फुर्तीभावा। कैसेनी दवडिजे ।।१७।।***

तात्पर्यार्थ - ज्याप्रमाणे जळातील तरंग शांत होतो, वारा गगनात विरतो त्याप्रमाणे आपल्या ठायी उठणारी वायुलहरी (स्फुर्ती) कसून प्रयत्नांनी शांत राहून शांत करावी.

***तरंग जळी विरे। वायू गगनी मुरे।***
***तैशी तुझी स्फुर्ती नुरे। तुजमाजी ।।१८।।***

तात्पर्यार्थ - तरंग जसा शांत होऊन पाण्यात विरतो म्हणजे तरंगाचे तरंगपण जाणवत नाही, वायु - वारा - गगनी विरतो म्हणजे वारे आकाशाहून वेगळे जाणवत नाही, त्याप्रमाणे जाणता जाणल्यावर जाणीव आपल्याच ठिकाणी तद्रूप होते. तो जाणीवरहित जाणता - ज्ञानी - होतो. त्याला वृत्तीरहित त्रिपुटीरहित ज्ञान होते.

***झाडिता आपला हात। आंगासी असे जडीत।***
***तैसी अंतःकरणस्फूर्ती मूर्तिमंत। कैशी सांडिशी ।।१९।।***

तात्पर्यार्थ - आपला हात झाडला तरी तो अंगापेक्षा वेगळा होत नाही. त्याप्रमाणे वृत्ती तद्रूप झाल्यावर, ज्ञानरूप झाल्यावर निवृत्ती अवस्थेत स्मरण राहते. त्याने संसरण शांत होऊन विश्रांती प्राप्त होते. ***('स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।' - श्रीनाथमहाराज, 'वृत्तीरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।' - श्रीसमर्थ)***

*सांडू पाहशी तव तेची स्फुर्ती। करू पाहसी तव तेची वृत्ती।*
*विचारू पाहसी तव तेची मती। मन चित्ते ।।२०।।*
तात्पर्यार्थ - जे विसरायचे म्हटले तरी आठवते ते अंत:करणरूपी - जाणीवरूपी - स्फुरण, जे काय करू पाहतो ती मनाची वृत्ती, तर विचाराने जे पाहतो ती बुद्धी. ***(‘नाठवितो स्वये द्यावी आठवण। हीच आहे खूण सद्गुरूची।।’ - संत निळोबाराय)***

*चिंतू पाहशी तव ते चित्त। मी म्हणता अहंकार होत।*
*उगाची असता स्वस्थ। स्वस्थता स्फुरे ।।२१।।*
तात्पर्यार्थ - जे पाहतो त्याचे चिंतन जे करते ते चित्त. हे सारे देहाकडून होते असे मानणे, देहाला कर्ता मानणे हा अहंकार. जर आपण ‘स्व’च्या ठिकाणी स्थित झालो तरी ‘मी अमूक आहे’ ही जाणीव - ही स्फुर्ती - होतच असते.

*जरी उगाची असता। तरी का आठवू स्फुरता।*
*संकल्प विकल्प करिता। कासयासी ।।२२।।*
तात्पर्यार्थ - जर आपण आत्मबोधाच्या वोवरा स्वस्थ राहिलो तर मनामध्ये विषयांची आठवण, दृश्याबद्दल संकल्प विकल्प कसे उठतील? ***(‘तरी जयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

*एक निश्चय धरिता। तरी का पुनः पुनः चिंतिता।*
*देहत्वे का आंगवता। मी म्हणोनी ।।२३।।*
तात्पर्यार्थ - एक आत्म्याबद्दल निश्चय जर झाला असता, तर पुन:पुन्हा विचार का करावा लागतो? आणि ‘देह म्हणजे मी’ हा अभिमान का

धरला जातो? ***(‘आत्माची कर्मकर्ता। हा ही निश्चयो नाही तत्वता। देहोची मी कर्मकर्ता। मानितो साच।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***म्हणोनी हे असंतची सरे। ऐसे वर्म आहे बा रे।***
***हे ज्ञान नसते तरी अहंकारे। केवी उठिजे ।।२४।।***

तात्पर्यार्थ - जे असत् विनाशी आहे ते कल्पनेच्या निरासाने सरल्यावर सर्वकाळ असणारे स्मरण - ज्ञान - जर नसते तर अहंकार तरी कुठून आला असता?

***आठव चित्ती जो राहे। ते ज्ञान नव्हे तरी काय।***
***ज्ञानेवीण स्थिरत्व आहे। बुद्धीस कोठे ।।२५।।***

तात्पर्यार्थ - मनामध्ये जी आठवण असते ती देहबुद्धीला - दुर्बुद्धीला - देहाची आठवण असते, ते खरे ज्ञान नव्हे. खरे ज्ञान जर झाले तर बुद्धीचा निश्चय झाला असता - बुद्धी स्थिर झाली असती.

***ते ज्ञान जरी अधिष्ठान। तरी संकल्पविकल्पात्मक मन।***
***तेची ज्ञान परिपूर्ण। या लागी स्फुरण असेना ।।२६।।***

तात्पर्यार्थ - संकल्प विकल्प करणाऱ्या मनाला द्वैताचे विपरीत ज्ञान होते. ते सत्य अद्वैत ज्ञान नव्हे. अद्वैत परिपूर्ण ज्ञानाचे ठिकाणी वृत्तीचे स्फुरण असत नाही.

***ते स्मरता न ये स्मरण। स्मरण जयाचे विस्मरण।***
***ते ज्ञान ना अज्ञान। ज्ञप्तीमात्र जे ।।२७।।***

तात्पर्यार्थ - जे आपण स्मरण करतो ते स्मरण करून त्याचे स्मरण कधीही प्राप्त होत नाही. जे आपल्या जाणीवेत येते ते आत्मरूपाचे ज्ञान

नव्हे. ज्ञानाने आत्मा सिद्ध होत नाही तर आत्म्यामुळे ज्ञान सिद्ध होते. आत्म्याचा विषय ज्ञान आहे. त्या ज्ञानाचा विषय आत्मा होऊ शकत नाही. म्हणजे आपले स्मरण म्हणजे त्याचे विस्मरणच. वृत्तीरूपे समान असणारे ज्ञान आणि अज्ञान म्हणजे त्याचे अज्ञानच. निवृत्तीरूपे विज्ञान म्हणजे वृत्तीरहित ज्ञान म्हणजे निवृत्ती अवस्थेतील स्मरण म्हणजे त्याचे स्मरण. *(‘नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी।। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।। नामरूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ। एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम।।’- श्रीनाथमहाराज, ‘ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।’, ‘ते नुमजताच उमजे। उमजोन काहीच नुमजे। ते वृत्तीवीण पाविजे। निवृत्तीपद।।’, ‘अज्ञानशक्ती निरसली। ज्ञानशक्ती मावळली। वृत्तीशुन्ये कैसी जाली। स्थिती पहा।।’ - श्रीसमर्थ, ‘स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।’ - श्रीनाथमहाराज, ‘ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तीदेवी ज्ञान। समाधी संजीवन हरीपाठ।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।’ - श्रीदासराममहाराज)*

*काही वृत्तीभास भासे। तो स्फुरताची तया दिसे।*
*परी स्वतः आपण असे। निराभास ।।२८।।*

तात्पर्यार्थ - जो काही वृत्तीने भास होतो, तो भास वृत्ती स्फुरताच त्याला दिसतो. जे भासते किंवा दिसते ते स्वरूप नव्हे. भास पाहणारे स्वरूप हे उपाधीरहित निराभास, निर्भ्रम असेच असते.

*तो निराभास म्हणावा कवण। तेची तया असे जाण।*
*जाणीवही जिरवून। आंगीचे आंगी ।।२९।।*

तात्पर्यार्थ - पण निराभास कुणाला म्हणायचे? कारण ते वृत्तीचे स्फुरण त्याचेपाशीच होते. ते जे वृत्तीचे स्फुरण आहे, त्या स्फुरणाने जाणता (जाणणारा) जाणला की जाणले ही वृत्ती तद्रूप होऊन म्हणजे जाणीव आंगीचे आंगी जिरवून जे जाणीवरहित जाणते, वृत्तीरहित ज्ञानी राहते त्या उपाधीरहित आकाशास, निरुपाधिक वस्तूस निराभास परब्रह्म म्हणावे.

***त्यालागी जाणीव ना नेणीव। भाव ना अभाव।***
***तेची ते स्वयमेव। स्वस्वरूप ।।३०।।***

तात्पर्यार्थ - सर्वकाळ असणाऱ्या अविनाशी स्वयमेव स्वरूपाला जन्ममरण असत नाही. त्यामुळे तेथे जाणीवनेणीव, भाव अभाव, ज्ञान, अज्ञान आदी भ्रमणाने भासणारी द्वंद्वे असत नाहीत.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते दृश्याभासखंडनं निदिध्यासनं नाम दशम प्रकरणं संपूर्णम् ।।१०।।**

प्रकरण ११ वे

# अज्ञानखंडण

***आपण आपणासी नेणे। ऐसे आपणची जाणे।***
***जाणपण हे नुमजणे। तेची पै ते ।।१।।***

तात्पर्यार्थ - आपण आपणाला जाणत नाही हे आपण जाणणे म्हणजे नेणीवेची जाणीव होणे होय. अज्ञानाचा अंध:कार दाखविणारा ज्ञानाचा प्रकाश हाच आत्मप्रकाश. ***('स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञानांध:कारा।।' - श्रीदासराममहाराज, 'आपला आपणपेया। विसरू जो धनंजया। तेची रूप यया। अज्ञानासी।।', 'तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देऊनी गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***नेणीवेच्या ग्रासे। जाणीव उरली दिसे।***
***तेची तेथे वसे ऐसे। केवी घडे ।।२।।***

तात्पर्यार्थ - नेणीव नाहीशी होऊन जाणीव उरल्यावर तेथे नेणीव - अज्ञान - कसे उरेल? ज्ञान आणि अज्ञान दोन्ही एकत्र कसे राहतील?

***जाणीवा नेणीवा। दोही विरहित भावा।***
***दोन्ही बीजा वोलावा। विस्तारीता तो ।।३।।***

तात्पर्यार्थ - वृत्तीरूपाने समान असणारी जाणीव नेणीव म्हणजे ज्ञान अज्ञान यांचे मुळाशी जाणीवनेणीवरहित - त्रिगुणरहित - निवृत्तीरूप विज्ञान असते. यापासून जाणीव नेणीव या दोन्ही बीजांना वृत्तीने ओलावा प्राप्त होतो व संसारवृक्ष विस्तारतो. ***('शुद्ध नेणीव तमोगुण। शुद्ध जाणीव सत्वगुण। जाणीव नेणीव रजोगुण। मिश्रित चालला।।'***

*- श्रीसमर्थ, 'संसार समस्त त्रिगुण।' - श्रीनाथमहाराज)*

***तो जाणीवा नेणीवा। नातुळे दोन्ही भावा।***
***आधीच असे तो जाणावा। स्वरूपानंद ।।४।।***

तात्पर्यार्थ - वृत्तीरूपाने समान असणाऱ्या ज्ञान अज्ञान म्हणजे जाणीव नेणीवेने स्वरूपानंद प्राप्त होत नाही. जाणीव नेणीवेने युक्त संसार हा असार दुःखमूळच आहे. तर तो स्वरूपानंद मुळाशी असणाऱ्या निवृत्तीरूपे विज्ञान अवस्थेत प्राप्त होतो. ***('वृत्तीरहित जे ज्ञान। तेची पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।' - श्रीसमर्थ, 'संसार दुःखमूळ चहुकडे इंगळ। विश्रांती नोहे कोठे। रात्रंदिवस तळमळ।।' - संतवचन)***

***काहीच न स्फुरता आदी। जे स्थळ असे अनादी।***
***जे ज्ञानाची फुंदी। ज्ञप्तीमात्र ।।५।।***

तात्पर्यार्थ - 'काहीच न स्फुरता' असे जे सर्वादी आहे म्हणजे जे कशातून स्फुरत नाही तर यातूनच सारे स्फुरते, ते चराचराचे मूळ - विश्वाचे मूळ - केवळ ज्ञानस्वरूप, ज्ञानाचे घर आहे. ते ज्ञानाचा कुरुठा आहे. ***('जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।' - श्रीसमर्थ, 'जे विश्वाचे मूळ। जे योगद्रूमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***जे निष्कलंक ज्ञानघनानंद। आपणची आपण स्वतःसिद्ध।***
***निजस्वरूप विशुद्ध। स्वसंवेद्य ।।६।।***

तात्पर्यार्थ - जे विश्वाचे मूळ - चराचराचे मूळ - म्हणजे मूर्तीमंत ज्ञान असे निरंजन स्वसंवेद्य केवळ आनंदाचे शुद्ध निर्मळ चैतन्यस्वरूप आहे, ते स्वतः सिद्ध आपणच आपण सर्वाठायी आहे. त्याशिवाय दुसरे काहीच नाही.

***जे जाणोचि जाणणे। म्हणून नाही तेथे नेणणे।***
***ते आपआपणा एकटे। जाणे ना नेणे ।।७।।***

तात्पर्यार्थ - त्याचेपाशी अखंडस्मरण - ज्ञान - आहे म्हणून तेथे नेणीव - अज्ञान - मुळीच नाही. सर्व विश्वात ते आपले आपण एकटे आहे. सर्व विश्वात सामान्यपणे सर्वत्र ते पसरले आहे. त्याचे ठिकाणी अखंड जाणीव असल्याने जाणीव नेणीव हे शब्द तेथे संभवत नाहीत. ***('अगा रात्री आणि दिवो। हा तवची द्वैतभावो। जव न रिगिजे गावो। गभस्तीचा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अर्थात तेथे त्रिगुणात्मक संसार नसून तिथे अखंड जीवन आहे. ***('अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।' - श्रीदासराममहाराज, 'संसार समस्त त्रिगुण' - श्रीनाथमहाराज, 'शुद्ध नेणीव तमोगुण। शुद्ध जाणीव सत्वगुण। जाणीव नेणीव रजोगुण। मिश्रित चालला।।' - श्रीसमर्थ)***

***हे परिपूर्ण एकले। म्हणोनी दिसावे हे खुंटले।***
***घनानंद कोंदाटले। स्वस्वरूप ।।८।।***

तात्पर्यार्थ - स्वरूप हे वेगळेपणाने पाहता येत नाही. ते केवळ आनंदाचे परीपूर्ण एकच स्वस्वरूप सर्वत्र कोंदाटले असल्याने पाहणे घडू शकत नाही. स्वरूपाकार होणे हेच स्वरूप दर्शन. ***('आकाश वेगळेपणे पाहावे। स्वरूपी स्वरूपची व्हावे। वस्तुचे पाहाणे स्वभावे। ऐसे असे।।', 'वस्तु आपणची होणे। ऐसे वस्तुचे पाहणे। निश्चयेसी भिन्नपणे। शून्यत्व लाभे।।' - श्रीसमर्थ)***

***दिसते ते दुसरे। तेही तेथे सरे।***
***मग देखणेची उरे। तेची तया केवी दिसे ।।९।।***

तात्पर्यार्थ - जे दिसते ते पाहणाऱ्यापेक्षा वेगळे दुसरे असते. पण तेथे

दुसरे काहीच नाही. येथे पाहणारा आत्माच सर्वत्र भरून राहिल्याने पाहणारा व पहायचा दृश्य पदार्थ असा भेद होत नसल्याने द्रष्टा (पाहणारा) द्रष्ट्याला (पाहणाऱ्याला) भेटत असल्याने, एकलेपणाने द्रष्टेपण राहात नाही. अर्थात पाहणे घडू शकत नाही. ***(‘दृश्य जाउनिया द्रष्टे। द्रष्ट्यासिची जै भेटे। तै एकलेपणेन घटे। द्रष्टेपणही।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘अखंड अद्वैती पहाणे आपणा। तयाते म्हणेना पहाणे कोणी।।’ - श्रीदासराममहाराज)***

***ते देखणेची देखणे। म्हणोनी तयासी ते पाहणे।***
***जे जाणवले ते निरसणे। उरे तेची ।।१०।।***

तात्पर्यार्थ - ‘पाहणे आपणासी आपण’ हे ज्ञान घडल्याने जाणता (जाणणारा) जाणला जातो. आपली जाणले ही वृत्ती तद्रूप होते म्हणजे जाणीवेचा निरास होतो, जाणीव जाते व तो जाणीवरहित जाणता उरतो. ***(‘जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।’ - श्रीसमर्थ)***

***दृश्य द्रष्टा दर्शन। या तिन्ही भावा विलक्षण।***
***एकलेची आपण। ज्ञप्तीमात्र ।।११।।***

तात्पर्यार्थ - दृश्य, द्रष्टा, दर्शन या त्रिपुटीतून जे ज्ञान होते ते पदार्थज्ञान, ते आकाराचे ज्ञान, ते द्वैताचे ज्ञान, ते विपरीत ज्ञान, ते संशयीत ज्ञान होय. वेगळेपणाने पहाणे घडले की हे ज्ञान होते. जे एकच एक आहे असे चराचराचे मूळ, केवळ ज्ञानरूप शुद्ध निर्मळस्वरूप वेगळेपणाने अनुभवता येत नाही. स्वरूपाकार होणे हेच स्वरूपदर्शन.

***दृश्य दर्शन हरपे। तेथे उरिजे स्वस्वरूपे।***
***अखंडीत आपआपे। निरामय ।।१२।।***

तात्पर्यार्थ - दृश्य पाहणे नाहीसे झाले की सहज दोषमुक्त अखंडीत स्वस्वरूप उरते. ***(‘दृश्य पदार्थाची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा तरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तु।।’- श्रीसमर्थ)***

***जाय लया सर्व दिसणे। तेथे खुंटले देखणे।***
***मग देखणे आपुलेया खुणे। सदोदीत ।।१३।।***

तात्पर्यार्थ - दृश्यातील आशा गेली की पाहणाराचा पहाणेपणा नाहीसा होतो व त्याला सदोदीत असणाऱ्या आत्मस्वरूपाच्या खुणा प्राप्त होतात. ***(‘खुंटलासे शब्द राहिला व्यवहार। झाला साक्षात्कार सदोदीत।।’- संतवचन)***

***ते आपणची आपण। अविनाश परिपूर्ण।***
***ऐसे ओळखावे परतोन। स्वस्वरूप ।।१४।।***

तात्पर्यार्थ - अंतर्मुख मनाला, श्वसनाला पिंडी परतुनी पाहिल्यावर प्राप्त होणारी खूण म्हणजे अविनाश, परिपूर्ण सर्वत्र भरलेल्या आपल्या स्वरूपाचाच अनुभव आहे. हे आत्मसुख जीवाने परत परत - वेळोवेळा - घ्यावे, ओळखावे. स्वरूपाचे सदा अनुसंधान ठेवावे. ***(‘हे खुण अनुभवाची पिंडी परतुनी पाहे। आपेआप प्रकाशले तेणे आनंदे राहे।।धृ।। पश्चिम दिशेसी जाता उजवा ठाकिला मेरू। अनुहात गगन गर्जे थोर उठला गजरु।। त्रिकुटी स्थिरावला मन पवन वारू। जिंकिले पंचप्राण केला मदनासी मारू।। आधारी नाभीमुळी तिन्ही एकची तंतू। सहस्त्रदळावरी स्थिर राहे निवांतू।। विघडले संद बंद षडचक्राची माळ। चंद्रावीण चांदणे दिसे मुक्ती कल्लोळ।। आशा मनषा दया क्षमा असती जया अंतरी। मुकुंदराज योगी सुखिया होय आधारी।।’ - संत मुकुंदराज)***

***नेणिवेच्या निरासे। कारण शरीर नासे।***
***जाणीवही समरसे। महाकारणी ।।१५।।***

तात्पर्यार्थ - दृश्याचे विपरीतज्ञान नाहीसे होऊन राहिलेल्या नेणीवेची - अज्ञानाची - जाणीव झाली की नेणीवेच्या - अज्ञानाच्या - निरासाने कारणदेहाचा निरास होतो व राहिलेली जाणीव महाकारणदेहात तद्रूप होते, समरस होते व तो जाणीवरहित जाणता होतो. ***('मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंधःकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।', 'येक ज्ञान येक अज्ञान। येक जाणावे विपरीत ज्ञान। हे त्रिपुटी होय क्षीण। तेची विज्ञान।।' - श्रीसमर्थ)***

***सुषुप्ती आणि तुर्या। प्राज्ञ प्रत्यगात्मा अभिमानीया।***
***विश्व तैजस गेलिया। जागृत्स्वप्न कैचे ।।१६।।***

तात्पर्यार्थ - विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा हे अनुक्रमे जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या या चार अवस्थांचे अभिमानी आहेत. जीवत्व विरल्यावर हे चारी अभिमानी नाहीसे झाल्यावर या चारही अवस्था आपोआपच नाहीशा होतात.***('जागृती स्वप्न, सुषुप्ती तुरीया। कारण ऐसिया जीवस्थिती।।' - श्रीदासराममहाराज)***

***एवं देहचतुष्ट्याचे निरासा। करूनी जाणिजे अविनाशा।***
***तव आपणची स्वयंप्रकाशा। ज्ञानघन ।।१७।।***

तात्पर्यार्थ - याप्रमाणे चत्वार देहांचे निरसन करून स्वयंप्रकाश अविनाश ज्ञानस्वरूप आपण आहोत हे अनुभवावे.

***सांडुनी आपले जाणिवेशी। जै स्वस्थ उगा राहासी।***
***तै काय आहे मग जाणशी। निःसंगपणे ।।१८।।***

तात्पर्यार्थ - जर आपली मीपणाची - अहंकाराची - जाणीव टाकून नि:संगपणाने उगेच निश्चळ राहशील तर सहज नि:संग अद्वैत निर्गुण स्वरूपाची जाणीव होईल. ***(‘न करी रे संग राही रे निश्चळ। लागो नेदी मळ अहंतेचा। या नाव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबड ते।।’ - श्रीतुकाराममहाराज)***

***जेव्हा जाणिवेते सोडिले। तेव्हा स्फुरणची खुंटले।***
***उठले ठायी लया गेले। तुजची माजी ।।१९।।***

तात्पर्यार्थ - जेव्हा महाकारणदेहात जाणता जाणल्यावर जाणीव जाते, आपली जाणले ही वृत्ती तद्रूप होते तेव्हा मीपणाचे - जीवपणाचे - स्फुरण खुंटते. जीवपणाची कल्पना नाहीशी होते. मन बुद्धी स्वरूपाचे ठिकाणी लय पावते. ***(‘जेथे ज्ञानची होते विज्ञान। जेथे मनची होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।’ - श्रीसमर्थ)***

***जाणीव शुन्यासहित। तुजमाजी सामावत।***
***तो तू आत्मा अपरिमीत। स्वयंभमूर्ती ।।२०।।***

तात्पर्यार्थ - महाकारणदेहात असणाऱ्या जाणीवेसह वेगळेपणाने जाणवणारे शून्य ज्याठिकाणी लय पावते तो तू स्वयंभू अनंत आत्मा आहेस.

***तेथे जाणीव नेणीव नाही। शब्द नि:शब्द काही।***
***रूप अरूप हेही। नेणीजे सोय ।।२१।।***

***देखते ना अदेखण। परकीय ना आपण।***
***स्मरण ना विस्मरण। स्मृतीमात्र जे ।।२२।।***

***वृत्ती ना निवृत्ती। अपूर्ण ना पूर्णस्थिती।***
***अभाव ना भाव प्रतिती। प्रतीती मात्र ।।२३।।***

तात्पर्यार्थ - अखंडस्मरणरूप निर्गुण अद्वैत आत्म्याचे ठिकाणी जाणीव नेणीव, शब्द नि:शब्द, रूप अरूप, पहाणे न पहाणे, आपला परका, स्मरण विस्मरण, पूर्ण अपूर्ण, भाव अभाव अशा प्रकारची द्वंद्वे, द्वैत असत नाही. तो द्वैत काही नाही असा स्मरणरूप एक म्हणजे एकच आहे. ***('एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ निर्गुण शोधून पाही।।' - श्रीचिमडमहाराज, , 'स्वयंब्रह्म जो आपणची झाला। देव मस्तकी वंदिती त्याला।। जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही।।' - श्रीकेशवस्वामी, 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।' - श्रीसमर्थ)***

***धरिता सोडिता न ये। नाही आहे म्हणणे राहे।***
***अनुभवी अनुभविता नये। ठायी नेणिजे ।।२४।।***

तात्पर्यार्थ - आत्म्यापेक्षा आपण वेगळे नसल्याने त्याला धरता किंवा सोडता येत नाही. तो नाही आहे असे म्हणायलासुद्धा तो आत असावा लागतो. त्यामुळे नाही आहे असे म्हणणे फक्त राहते. तो अनुभवी (अनुभवणारा) वेगळेपणाने अनुभवता येत नाही. देहरूप माणसाला त्याचा ठावठिकाणा पण समजत नाही. ***('ज्ञानदेव म्हणे अनुभवी तोची जाणे। संत ये खुणे पारुषले।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***
***किंवा*** धरिता 'सो' सांडिता 'हं' हे सोहं अस्तवले की मौन साधते. त्रिपुटीरहित ज्ञान होऊन तो अनन्य होतो. त्याचे दृश्याचे भान हरपते. ***('अनुभवे त्रिपुटी उपजे। अद्वैती द्वैतची लाजे। म्हणोनी बोलणे साजे। अनिर्वाच्य।।' - श्रीसमर्थ)***

*ऐसे हे अभ्यासणे। अंतरीचे अंतरी जाणणे।*
*निश्चळ स्वरूपी स्थिरावणे। कीजे मनाचे ।।२५।।*

तात्पर्यार्थ - मन:पूर्वक अभ्यासाने बहुतांच्या अंतरी जे आहे ते अंतरी जाणावे व मूळ निश्चळ स्वरूपाकार व्हावे.

*स्वस्वरूप जाणिजे। मग आलिंगोनी राहिजे।*
*स्वयेची चंचळपण किजे। कल्पना व्यापार ।।२६।।*

तात्पर्यार्थ - चंचळ मनाने निर्विकल्पाची कल्पना करावी व कल्पनारहित एकाग्र होऊन स्वस्वरूप जाणावे. स्वरूपाकार व्हावे. ***('निर्विकल्पासी कल्पिता। कल्पनेची नुरे वार्ता। नि:संगासी भेटो जाता। नि:संगची होइजे।।' - श्रीसमर्थ, 'जवळी असता जगज्जीवन। का धांडोळीसी वन। एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान रे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

*ऐसे करिता मन विरमे। विषयव्यापार शमे।*
*मग चित्त रमे। काही काही स्वस्वरूपी ।।२७।।*

तात्पर्यार्थ - असा अभ्यास केल्यावर मन मुरते. मन शांत होते. त्याचे विषयाचे व्यापार थंडावतात. मग एकाग्र मनाला हळूहळू स्वस्वरूपाचा बोध होतो.

*विसरे प्रकाशे स्वरूप। हारपे सापडे आपेआप।*
*ऐसा करिता साक्षेप। मग स्थिरावे ।।२८।।*

तात्पर्यार्थ - प्रकाशरूप आत्मस्वरूपाला विसरल्याने भवचक्रात फिरणाऱ्या आपणाला ते स्वरूप साधनाच्या वेळी सहजस्थितीत सापडेल. फक्त साधना संपली की हे जग आठवेल व ते स्वरूप विसरेल. त्रिकाल साधनाचे प्रयत्नाने ते स्वरूप स्थिरावेल. अष्टौप्रहर साधन साधेल.

*निवांत भोगी स्वरूप। डुल्लत आनंदे आपेआप।*
*मग तया सुखाचे माप। कवण करी ।।२९।।*

तात्पर्यार्थ - अशा प्रकारे साधनी मन घटलेला साधक जगाचा - दृश्याचा - तटका तोडून निवांत स्वरूपाचा अनुभव घेईल. सहज आनंदात डोलत राहील. मग त्या सुखाचे माप, पुण्याची गणना कोण करील?

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते अज्ञानखंडन नाम**
**एकादश प्रकरणं संपूर्णम् ।।११।।**

प्रकरण १२ वे

# स्वानुभवसुख वर्णन

***स्वेदकंपादि उठती। अष्ट सात्वीक भाव प्रगटती।***
***पावे साम्राज्य संपत्ती। रंक जैसा ।।१।।***

तात्पर्यार्थ - जीवाला परमप्राप्ती झाली, जीवाला परमअर्थाची - परमामृताची - प्राप्ती झाली की जीवाचे जन्म हे दारिद्र्य नाहीसे होते. तो उपजोनी करंटा परमार्थी राज्यधारी होतो. त्याला आत्मस्वरूपाचा आनंद - स्वरूपानंद - प्राप्त होतो. आनंदाने स्वेदकंपादी अष्टसात्वीक भाव त्याचे ठिकाणी प्रगट होतात.***(‘कंठी प्रेम दाटे नयनी नीर लोटे। हृदयी प्रगटे रामरूप।।’ - संतवचन)***

***चित्त चैतन्यी हारपे। उरिजे ज्ञप्तीस्वरूपे।***
***अखंडीत आपआपे। ब्रह्मानंद ।।२।।***

तात्पर्यार्थ - चित्त हारपून अवघे चैतन्य झाले म्हणजे चित्तात चैतन्य भरून राहिले की विश्वाचा आभास हे अज्ञान नाहीसे होऊन सत्य ज्ञान प्रगट होते, चित्ताला अखंडीत प्रसन्नता हा संपूर्ण प्रसाद प्राप्त होतो, अखंडीत सहजानंद - ब्रह्मानंद - प्राप्त होतो. ***(‘चित्तची हारपले अवघे चैतन्यची जाहले। पाहता पाहता अवघे विश्वची मावळले।।’ - श्रीनाथमहाराज, ‘देखे अखंडीत प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसारदु:खा।।’, ‘मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादू जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तया सुखाचेनी समरसे। पावे सुलीन दशे।***

*ते बोलावे कैसे। अनुभवी जाणती ।।३।।*

तात्पर्यार्थ - सहजस्थितीत जीवाला आत्मप्राप्ती झाल्यावर, जन्मोजन्मीचे दु:ख विसरून स्वसुखाने सुखरूप झालेला जीव त्या सुखाचे वर्णन करू शकत नाही. ज्याला अनुभव येईल त्यालाच ते समजणार.

*जैसे अमृत चाखे आपुले चवी। तैसे स्वसुख अनुभवी।*
*तेथे कोण आठवी। संसारासी ।।४।।*

तात्पर्यार्थ - दु:खरूप संसार विसरला तरच अमृत आत्म्याची आपली चव चाखता येते, स्वत:चे सुख - आत्मसुख अनुभवता येते.

*वोळे स्वानंदाचा घन। दाटे सुख परिपूर्ण।*
*तयामाजी विवेक सुजाण। हारपोनी जाय ।।५।।*

तात्पर्यार्थ - देहाचे खोटे कर्तेपण हारपून खऱ्या आत्मा या कर्त्याला ओळखणे या सुजाण विवेकाने परिपूर्ण सुखाची प्राप्ती होते, स्वानंदाचा घन बरसतो. ***('कर्त्यासी ओळखावे। तयासी विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदु:खी।।' - श्रीसमर्थ, 'मीपण सांडोनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होय।।' - श्रीदासराममहाराज)***

*अहंता स्वरूपी गळे। विषयतृष्णा मावळे।*
*इंद्रियांचे लळे। क्रियेवीण पूर्ण होती ।।६।।*

तात्पर्यार्थ - संसारक्रिया शून्य होऊन इंद्रिये निर्गुण भोजनाने आत्मतृप्त होतात. त्यांची विषयवासना नाहीशी होते. स्वरूप बोधाने अहंकार नाहीसा होतो.

*महासुखाचे अरुवारी। आलिंगी स्वानुभूती सुंदरी।*
*ज्ञानमात्र इयापरी। स्वस्वरूप भोगी ।।७।।*

तात्पर्यार्थ - तो ज्ञानरूप, सुंदर स्वानुभूतीने स्वस्वरूप भोगतो, महासुखात लोळतो.

***निरसिता नेणीव। स्वरूपी समरसे जाणीव।***
***मग एकछत्री राणीव। योगियासी ।।८।।***

तात्पर्यार्थ - नेणीवेची जाणीव होऊन म्हणजे अज्ञानाचे ज्ञान होऊन ते तुर्यारूप ज्ञान स्वरूपी विरते. तो स्वरूपाकार होतो. अशा स्वरूपाकार योग्याला एकछत्री अद्वैत साम्राज्य प्राप्त होते.

***सदा स्वानंदाचे सोहळे। विषय विजाती वितळे।***
***स्वरूप सुखाचेनी मेळे। इंद्रिया तृप्ती ।।९।।***

तात्पर्यार्थ - दु:ख देणारे विजातीय विषय वितळतात, लयाला जातात व सुख देणाऱ्या सजातीय स्वरूपाची भेट होते. त्यामुळे इंद्रिये स्वसुखाने तृप्त होतात. असे सदा स्वानंदाचे सोहळे होत राहतात.***('नाइकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***परमसुखाचेनी भरे। एकही स्फुर्ती न स्फुरे।***
***कार्यजाती विसरे। निमिष्यात ।।१०।।***

तात्पर्यार्थ - वृत्तीचे स्फुरण थांबून सोहंचे स्फुरण अस्तवले की त्या निमिषात मन वृत्तीसहित मुरते. म्हणजे कर्म समूळ संपते व निरुपाधीक आत्मा उरतो. आत्मसुखाचे परमसुखाने तो सुखी होतो. ***('तुका म्हणे मग नये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।' - श्रीतुकाराममहाराज, 'मन कृतंकृतं कर्म' - योगवासिष्ठ, 'मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करुनिया। पतिव्रता।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***करूनी यज्ञाचिया कोडी। उभविती स्वर्गाची गुढी।***
***ते सुख किजे कुर्वंडी। या ब्रह्मसुखासी ।।११।।***
तात्पर्यार्थ - कोट्यावधी यज्ञ करून सापेक्ष पुण्याने जे स्वर्गसुख प्राप्त होते ते सुख या ब्रह्मसुखावरून ओवाळून टाकावे इतके ते क्षुल्लक आहे.

***आनंद आनंदाशी घोटी। बोलता परेसी पडे मिठी।***
***मुक्याने सुखाच्या गोष्टी। केवी किजे ।।१२।।***
तात्पर्यार्थ - केवळ आनंदाचे असे चैतन्य आपल्याच आनंदाचे घोट घेते. या सुखाचे - आनंदाचे - वर्णन वाचेला करता येत नाही. या वाचेला कल्पीत सुखाचे वर्णन करता येते. या वाचेला कल्पनेच्या पलीकडील अकल्पीत सत्यस्वरूपाचे सुख वर्णन करता येत नाही. चारी वाचा कुंठीत झाल्यावर मुकावस्थेत या सुखाच्या गोष्टी कशा सांगता येणार? ***('ते सुख काय सांगू। वाचे बोलता नये।।' - श्रीनिवृत्तीनाथमहाराज)***

***खुंटले मनाचे जाणणे। ते सुख अनुवादावे कवणे।***
***हे अनुभवी तोची जाणे। इतरा टकमक ।।१३।।***
तात्पर्यार्थ - मनाचे जाणणे खुंटले की चारी वाचा कुंठीत होतात. मग होणाऱ्या हेतूरहित समाधानाचे, सुखाचे कोण वर्णन करेल? जो जाणीवरहित जाणता - अनुभवी - असेल त्यालाच हे समजणार. इतरांनी त्यांच्या तोंडाकडे नुसते पहात राहावे. ***('जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।' - श्रीसमर्थ)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते स्वानुभवसुखवर्णनं नाम द्वादश प्रकरणं संपूर्णम् ।।१२।।**

प्रकरण १३ वे

# मुक्तीरहस्य

***ऐसी पावोन योगखुण। स्वानंद भोगितो परिपूर्ण।***
***तया योगिया न घडे शीण। संसाराचा ।।१।।***

तात्पर्यार्थ - जीवपणाचा वियोग झाला की त्याला नवल स्वरूपाचा योग घडतो. स्वरूपाच्या अनुभव खुणा प्राप्त होऊन तो परिपूर्ण स्वरूपानंद भोगतो. अशा चैतन्यरूप योग्याला, भक्ताला संसाराची चिंता, शीण उरत नाही. त्याचे भाग्य उजळते.

***झाले ब्रह्म आपण। योगी सहज परिपूर्ण।***
***सदा स्वानंद निमग्न। ज्ञप्तिमात्र ।।२।।***

तात्पर्यार्थ - तो योगी सहजावस्थेत परिपूर्ण देवाचा देव ब्रह्मस्वरूप होतो. तो, केवळ ज्ञानस्वरूप आनंदाच्या चैतन्याशी निमग्न - तद्रूप - होतो.

***संकल्प आणि विकल्प। दोनी न दिसती अल्प।***
***सुख पावले अमूप। म्हणोनिया ।।३।।***

तात्पर्यार्थ - मन संकल्प विकल्परहित होऊन म्हणजे मन वृत्तीसहित मुरल्यावर त्या योग्याला अकल्पीत अद्वैती अमूप अखंडीत सुखाची प्राप्ती होते.

***साधन असाधन खुंटले। अकरणे करणे मोडले।***
***आपणची ते झाले। परब्रह्म ।।४।।***

तात्पर्यार्थ - आत्मसाक्षात्काराने स्वये ब्रह्म झाल्यावर साधन करणे किंवा न करणे हा विषय तेथे राहात नाही. त्यांचे अष्टौप्रहर साधन

सहजच होते. त्या देहीच विदेह झालेल्या संतांचे, मुक्तांचे 'करितेनवीण कर्म' हे 'करून काहीच न करणे' असे नैष्कर्म्यच असते. ***('देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मुक्त जाणे।।' - श्रीसमर्थ, 'स्वयंब्रह्म जो आपणची जाहला। देव मस्तकी वंदिती त्याला। ज्याच्या दृष्टीस सृष्टी नाही। देही असुनी पूर्ण विदेही।।' - संत श्रीकेशवस्वामी, 'अगा करितेनवीण कर्म। तेची ते निष्कर्म। हे जाणती सवर्म। गुरुगम्य जे।।', 'मुक्तांचे देह तैसे। हालत संस्कारवशे। ते देखोनी लोक पिसे। कर्ता म्हणती।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तुका म्हणे देही। संत जहाले विदेही।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***नाही धारणा ध्यान। नाही समाधी आसन।***
***चुबकळीत आनंदघन। आपणामाजी ।।५।।***

तात्पर्यार्थ - ध्येय साध्य झाल्यावर त्या योग्याला ध्यान धारणा, आसन, समाधी या योगसाधनेची गरज राहात नाही. तो सततच आपल्या आत्मानंदात डुंबत असतो.

***भुवनत्रयी क्रिडती। स्वइच्छा वर्तती।***
***अखंड स्फुरे ज्ञप्ती। म्हणोनिया ।।६।।***

तात्पर्यार्थ - केवळ आनंदाच्या चैतन्याचे अखंड स्मरण प्राप्त झाल्याने त्याला अवघेची त्रैलोक्य आनंदाचे वाटते. तो आनंद आपल्या इच्छेने वर्तनातून आपल्या लिलेने ते त्रैलोक्यात प्रगट करतात.

***विधीनिषेधाची कडसणी। न वर्ते जया अंत:करणी।***
***पापपुण्याची काहाणी। तेही नेणती ।।७।।***

तात्पर्यार्थ - ते मुक्त विदेही 'करून काहीच न करणे' असे नैष्कर्म

साधतात. ते सहज निर्हेतूक होणाऱ्या कर्माचे कर्ते असत नाहीत. म्हणून विधी निषेधाचे नियम त्यांना लागू होत नाहीत. ते भावे विश्वासाने निर्गुणी, अनन्य असल्याने त्यांना पापपुण्याचा स्पर्श देखील होत नाही. ***('भावे विश्वासाने सत्यस्थानी जाई। पापपुण्य नाही जये गावी।।'- श्रीमामामहाराज, 'तुका म्हणे आम्ही झालो अग्नीरूप। लागो नेदी पापपुण्य अंगा।।' - श्रीतुकाराममहाराज, 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।' - श्रीसमर्थ)***

***शुभाशूभ फळे। न बाधती कवणे वेळे।***
***ते सर्वांपासून सुटले। जीवन्मुक्त ।।८।।***

तात्पर्यार्थ - शुभाशूभ फळे देणारी काळवेळ योग्याला असत नाही. ते सर्वकाळी संकल्पापासून सुटलेले जीवन्मुक्त असतात. ***('श्वासोश्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिये पैल नाम आहे।। म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।' - श्रीदासराममहाराज, 'हरिचिया दासा हरी दाही दिशा। भावे जैसा तैसा हरी एक।।' - श्रीनाथमहाराज, 'सर्वांमाजी असे काळ। तोची म्हणती सर्वकाळ।। संत साधनी सर्वकाळ। जेथे नाही काळवेळ।। जेथे दिवस ना रात। दास नामी अखंडीत।।' - श्रीमामामहाराज, 'तुका म्हणे हरीच्या दासा। शुभ काळ सर्व दिशा।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***बंध मोक्षाची वार्ता। नायकती सर्वथा।***
***सहजची ध्याती शाश्वता। अखंडितासी ।।९।।***

तात्पर्यार्थ - बंध मोक्षाची वार्ता किंवा जन्ममृत्यूची वार्ता या देहाच्या गावात चालते. या गोष्टींच्या वार्ता परमार्थाच्या गावात किंवा आत्म्याच्या

गावात ऐकायला मिळत नाहीत. बंध मोक्षाच्या किंवा जन्ममृत्यूच्या पलीकडे आत्मा असतो, परमार्थ असतो. ते आत्मरूप सहजच खंडीत अशाश्वत जगाचा तटका तोडून अखंडीत शाश्वत परमेश्वराचा चटका अनुभवतात. ***(‘देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळिया। ना म्हणो नये धनंजया। जियापरी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।। जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।’ - श्रीदासराममहाराज, ‘अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्यूची। आणि पदवी सायोज्यतेची। सन्निधची लाभे।।’ - श्रीसमर्थ)***

***जे मनापासूनी सुटले। तया संशय नुरले।***
***करणीय अकरणीय गेले। सर्व कर्म ।।१०।।***

तात्पर्यार्थ - जे मनापासून सुटले म्हणजे ज्यांनी मनोलय साधला ते कर्मापासून सुटले. काय करणे योग्य, काय करणे अयोग्य हा संशय दूर झाला. संशयाची निवृत्ती होऊन भाव धरला गेला, आत्मज्ञान झाले. ***(‘मन कृतं कृतं कर्म’ - योगवासिष्ठ, ‘न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘संदेह अवघाचि फिटला। जनी म्हणे उदय झाला।।’ - संत जनाबाई)***

***ऐसे होउनी निभ्रांत। कळो न देती आपुला अंत।***
***लोकांमाजी दावीत। भक्तीरहस्य ।।११।।***

तात्पर्यार्थ - ज्याच्या दृष्टीस सृष्टी येत नाही अशा पूर्ण विदेही निभ्रांत योग्याच्या अंत:करणाचा अंत कोणाला लागत नाही. ते स्वरूपाकार, आदी अंत नसणारे अनंत असतात. असा अनंत पुरुषच लोकांना ‘जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।’ हे भक्तीतले रहस्य आचरून दाखवितो.

*('पाहु जाता तुमचा अंत। नलगे म्हणुनी तुम्ही अनंत।।' - श्रीचिमडमहाराज, 'नानाकारे जगाची प्रचिती। तेची मुख्यत्वे सोलीव भ्रांती। ते भ्रांतीची निजस्थिती। ऐक तुजप्रती सांगेन।।', 'जग देखणे परमभ्रम। जग न देखणे परब्रह्म। हे ज्ञानगुह्य निजवर्म। तू पुरुषोत्तम परमात्मा।।' - श्रीनाथमहाराज)*

*भक्ती ज्ञान वैराग्य पाही। करूनी दाविती आपुले देही।*
*जगास लाविती सोई। तारक ते ।।१२।।*

तात्पर्यार्थ - भक्ती, ज्ञान, वैराग्य यांचे साच भावे वर्तन देही करून कीर्तनातून याचेच प्रेमाने युक्तीने संत विवरण करतात, मार्गदर्शन करतात. अशा प्रकारे जगाला सन्मार्ग दाखवून अवनतीपासून तारतात.*('भक्तीज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।।' - श्रीनाथमहाराज)*

*भोगिती स्वरूप रहस्य। करिता सद्‌गुरूंचे दास्य।*
*परी भेद नाही समरस्य। जाणती जीवेश्वराचे ।।१३।।*

तात्पर्यार्थ - मनोलयाने सद्‌गुरूंचे दास झालेले, जीव ईश्वराचे ऐक्य जाणतात व स्वरूपाकार होतात - स्वरूप भोगतात, अनुभवतात. *('तुका म्हणे जीवी शिव। हाची येथीचा अनुभव।।' - श्रीतुकाराममहाराज, 'साधनी मन घटवी बारे साधनी मन घटवी। साधनी घटता ते बळ अद्‌भूत। दासाची पदवी।।' - श्रीमामामहाराज, 'जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञान अंधार निरसी। जीवत्मया शिवात्मयासी। ऐक्यता करी।।' - श्रीसमर्थ)*

***प्रेमे स्फुंदती नित्य। स्मरण विस्मरणेवीण नेमस्त।***
***क्षणक्षणा उच्चारीत। नाम गुरुंचे ।।१४।।***

तात्पर्यार्थ - अंतरी कळवळा धरून नित्याचे नेमाचे गुरुनाम वेळोवेळा उच्चारले असता स्मरण विस्मरणापैल नेमस्त अखंडस्मरण - विस्मरणेवीण स्मरण - प्राप्त होते. ***('अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।' - श्रीदासराममहाराज)***

***गुरु परमेश्वर ऐक्यता। तद्रूप जाणोनी भजता।***
***सन्मान देती संता। अती प्रितीने ।।१५।।***

तात्पर्यार्थ - गुरु व परमेश्वर यांचे सत्य स्वरूपाचे ठिकाणी ऐक्य अनुभवून स्वरूपाकार झालेला शिष्य मूळस्वभाव हे भजन करत राहतो व स्वरूपी मिळालेल्या साधुसंतांचा मोठ्या प्रेमाने सन्मानच करतो. ***('साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोनी येकची जाले। देहातीत वस्तू।।', 'देहची होऊन राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।', 'परब्रह्म हे सकळापरते। तयास पाहता आपणची ते। हे कळे अनुभवमते। सद्गुरू केलिया।।' - श्रीसमर्थ, 'आधी होता संत संग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहीना। मुळस्वभाव जाईना।।' - श्रीतुकाराममहाराज)***

***आणि विश्वामाजी ईश्वरू। एकची व्यापक सद्गुरू।***
***म्हणोनी सर्वाभुती आदरू। करिती ते ।।१६।।***

तात्पर्यार्थ - जो एक सद्गुरू तोच एक ईश्वर सर्व विश्वाला व्यापून राहिला आहे हे अनुभवून ते प्रत्येक प्राणीमात्राबरोबर मोठ्या आदराने वागतात.

*हृदय जयाचे कोमल। सदा शुचिष्मंत निर्मळ।*
*निरंतर आचारशील। पवित्रपणे ।।१७।।*

तात्पर्यार्थ - ज्याचे मन शुद्ध असते तो देहातीत वस्तुरूप पवित्र निर्मळ असतो. त्याचा आचार नेहमी पापाचा विचार नसलेला पवित्र सदाचारच असतो. ***('शुद्ध करा मन हारे देहातीत। ओळखा वस्तुते तुका म्हणे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'आधी राखावा आचार। मग पहावा विचार। आचार विचार पैलपार। पाविजेतो।।' - श्रीसमर्थ, 'रामनाम मुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।' - श्रीमामामहाराज)***

*न पाहाती मानापमान। निंदा स्तुती समाधान।*
*धैर्यपणे मन। नांदत जयाचे ।।१८।।*

तात्पर्यार्थ - कितीही मान होऊदे अथवा अपमान होऊदे, कितीही निंदा किंवा स्तुती होऊदे ते त्याची पर्वा करीत नाहीत. ते दोन्हीलाही समानच लेखतात. कोणत्याही परिस्थितीला ते धैर्याने तोंड देतात. परिस्थितीमुळे त्याची स्थिती बदलत नाही. त्यांच्या मनाची एकाग्रता न ढळता ते समाधानी राहतात. ***('जो निंदेते नेघे। स्तुती न श्लाघे। आकाशा न लगे। लेपु जैसा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

*सुख दुःख न गणी। समाधान लाभ हाणी।*
*उदार ते अंतःकरणी। न गुंतती कोठे ।।१९।।*

तात्पर्यार्थ - लाभाने सुखाची किंवा हानीने दुःखाची कोणतीही परिस्थिती येवो, त्यांचे आंतरीक समाधान ढळत नाही. त्यांचे अंतःकरण विशाल असते. ते संसारात चुकूनही गुंतत नाहीत. ***('सुखी संतोषा न यावे। दुःखी विषादा न भजावे। आणि लाभालाभ न धरावे। मनामाजी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***सदा विवेकी चित्तवृत्ती। पडो न देती विस्मृती।***
***सावधान अहोराती। आत्मस्वरूपी ।।२०।।***

तात्पर्यार्थ - विवेकाने आवरलेल्या एकाग्र मनाला - सुजाण चित्ताला - कर्त्याची ओळख होते. चित्तवृत्तीच्या निरोधाने खरा योग साधतो. ते अहर्निशी आत्मस्वरूपाचे ठिकाणी सावध राहून अखंड स्मरणाने स्वरूपाकार होतात.***(‘कर्त्यासी वोळखावे। तयासी विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदु:खी।।’ - श्रीसमर्थ, ‘जेथे एक अग्र होय तुझे मन। जाणावे सुजाण चित्त तेची।।’ - श्रीदासराममहाराज)***

***का धरी पिशाच्यलिला। तरी होय जगावेगळा।***
***लोका न दाखवी डोळा। शहाणपणा ।।२१।।***

तात्पर्यार्थ - ते जगाचे अनुसंधान न ठेवताना जगदंतरी अनुसंधान ठेवतात, बहुतांची अंतरे राखतात, साहजिकच त्यांचे जगाबरोबरचे वागणे, बोलणे जगापेक्षा वेगळे असते. ते लोकांना पिशाच्चवत वाटते. त्यामुळे लोकांच्या चर्मदृष्टीला त्यांचे अंतरी असणारे शहाणपण - जागते ज्ञान - दिसत नाही. ***(‘जगात पिशाच्च अंतरी शहाणा। सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘जगदंतरी अनुसंधान बरे पाहणे हेच ध्यान’, ‘राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे।।’, ‘सदा स्वरूपानुसंधान। हेची साधुचे मुख्य लक्षण। जनी असोन आपण। जनावेगळा।।’ , ‘जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोची साधु।।’ - श्रीसमर्थ)***

***इत्यादी आचार दाविती। फळापेक्षा न भाविती।***
***लोकांसी देख लाविती। वर्तती असे ।।२२।।***

तात्पर्यार्थ - लोकांनी त्यांच्याप्रमाणे आचरण करावे असे फलाशेरहित कर्म ते आचरून दाखवितात.

***विश्वा साक्षी योगीराणा। जाणे सर्वांतरीच्या खुणा।***
***परी तो वाटे जना। वेडिया ऐसा ।।२३।।***

तात्पर्यार्थ - अहंकार नाहीसा करून सर्व विषयवासना टाकून जगद्‌रूप होऊन जगात वावरणारा योगीराज, साक्षीरूपाने सर्व विश्व पाहणारा असल्याने, तो सर्वांचे अंतरंग जाणणारा असतो. अर्थात तो विश्वाचे बहिरंग जाणणारा असत नाही. त्यामुळे तो बाह्यत: लोकांना वेडाच वाटतो. ***('तो अहंकाराते दंडुनी। सकळ कामू सांडुनी। विचरे विश्व होऊनी। विश्वाचीमाजी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***असे तरी लोकांमाजी। परी कर्म क्रिया सर्व त्यजी।***
***राहे सहजासहजी। निष्कर्मपणे ।।२४।।***

तात्पर्यार्थ - तो लोकांमध्ये राहात असला तरी त्याचे वर्तन लोकांपेक्षा वेगळे असते. तो अकर्मात कर्म साधून मीपणेवीण - करितेनवीण - कर्म साधतो. तो सहज, सहजी नैष्कर्म्य साधतो. ***('अकर्मात साधी कर्म। मीपण रहिताचे वर्म।।' - श्रीमामामहाराज, 'अगा करितेनवीण कर्म। तेची ते निष्कर्म। हे जाणती सवर्म। गुरुगम्य जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***आपण एक सर्वेश्वरू। कोणा सांगे व्यवहारू।***
***क्रिया कर्म न सांगे करू। नाथिलेची ।।२५।।***

तात्पर्यार्थ - आपण एक सर्वात्मक सर्वेश्वर आहोत असे अनुभवाला आल्यावर त्याठिकाणी लटिका व्यवहार उरत नाही किंवा क्रिया कर्मही उरत नाही. आणि आपण एक सर्वात्मक सर्वेश्वर आहोत म्हटल्यावर कोणाला व्यवहार किंवा क्रियाकर्म सांगण्याची / शिकवण्याची काय गरज? लटक्या व्यवहाराचा शेवट झाल्याशिवाय किंवा कर्मजात

गेल्याशिवाय एक आत्म्याची - सर्वेश्वराची - प्रचिती येत नाही. ***(‘लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण।।’, ‘मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।’ - संतवचन)***

***उग्र खलता दावितसे। तेणे लोक हासतसे।***
***हेही तया नाही पिसे। अद्वैतपणे ।।२६।।***

तात्पर्यार्थ - ते योगी काही जगावेगळे हट्ट करतात म्हणून लोक त्यांना हसतात. पण ते सर्वत्र अद्वैत अनुभवत असल्याने ते कोणावरही लोकांना अज्ञानी - वेडे- समजून रागावत नाहीत. ***(‘जीभ दाताने चावली। कोणे बत्तीशी पाडली।।’ - संत मुक्ताबाई, ‘जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।’- श्रीसमर्थ)***

***ऐशिया स्थिती राहावे। स्वरूप जाणोनी भोगावे।***
***जन उद्धरावे की त्यजावे। न स्मरे तो ।।२७।।***

तात्पर्यार्थ - आपुलीया सुखस्वार्था सदा स्वरूपानुसंधानाने ते स्वरूप जाणण्याच्या अवस्थेत असतात. जगाचा उद्धार करावा किंवा न करावा असा काहीच त्यांचा हेतू असत नाही. तो सहजच त्यांचे हातून होतो. ***(‘मेघवृष्टीने करावा उपदेश। परी गुरूने न करावा शिष्य।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘सदा स्वरूपानुसंधान। हेची साधुंचे मुख्य लक्षण। जनी असोन आपण। जनावेगळा।।’ - श्रीसमर्थ)***

***विश्व आपण भोगो न भोगो। परी स्वरूप तया सांगो।***
***हे काही न दे लागो। आपणाकडे ।।२८।।***

तात्पर्यार्थ - विश्वाची जाणीव होणे किंवा नेणीव होणे हे दोन्ही आपल्या सदा सर्वकाळ असणाऱ्या स्वरूपामुळे होते. पण स्वरूपाचे ठिकाणी ही जाणीव नेणीव असत नाही. स्वरूपाचे ठिकाणी आपली अखंड जाणीव - स्मरण - असते. विश्व असो वा नसो स्वरूप हे सर्वकाळ असते. ***('स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनी असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'स्वयं ब्रह्म जो आपणची झाला। देव मस्तकी वंदिती त्याला। जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही।।' - संत केशवस्वामी)***

***विश्वाचा दाहो न लागे अंगा। तो द्वंद्वातीत पै गा।***
***एकदेशीया जगा। न पाहे योगी ।।२९।।***

तात्पर्यार्थ - अद्वैती समरस झालेले द्वंद्वातीत देहातील योगी नामरूपात्मक साकार जगाचा तटका तोडतात. साकार नाशिवंत एकदेशी दृश्य जग ते पाहात नाहीत. जगाचा चटका ते अनुभवत नाहीत तर ते पूर्ण परब्रह्माच्या तेजाचा चटका अनुभवतात. ***('जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।।' - श्रीदासराममहाराज)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते मुक्तीरहस्य निरुपणं नाम त्रयोदशप्रकरणं संपूर्णम् ।।१३।।**

प्रकरण १४ वे

# साक्षात्कार

***तू संशय न धरी। मुक्त वर्तती दोही परी।***
***परी तू अभ्यास करी। सांगितला ऐसा ।।१।।***

तात्पर्यार्थ - मुक्तांचे देह हे संस्कारवशात कर्म करतात. ते त्या कर्माचे कर्ते असत नाहीत. 'करून काहीच न करणे' अशा पद्धतीचे त्यांचे विदेही कर्म असते. म्हणून तू मुक्तांच्या कोणत्याही कर्माबद्दल संशय धरू नको. सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे अभ्यासाने जर भाव धरला तर संशयाची निवृत्ती होऊन आत्मज्ञान होणार व या मुक्तांच्या वर्तनाबद्दल संशय येणार नाही. जीवन्मुक्तांची लक्षणे जीवन्मुक्तांनाच कळणार. ***('देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मूक्त जाणे।।' - श्रीसमर्थ, 'मुक्ताचे देह तैसे। हालत संस्कारवशे। ते देखोनी लोक पिसे। कर्ता म्हणती।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***तैसा सहजची असशी। परी आले पाहिजे प्रत्ययासी।***
***मग तू ज्ञानीच होशी। जैसा तैसा ।।२।।***

तात्पर्यार्थ - आपल्याला जसे परमेश्वराने ठेवले आहे तसे स्वस्थानी रहाणे म्हणजे आपली सहजस्थिती. या आपल्या सहजस्थितीला ब्रह्माची नित्यता आहे. या नित्य सहजस्थितीला अध्यात्म म्हणतात. ही सहजस्थिती प्रत्ययाला आली की तू मूळस्वरूपाच्या ज्ञानाने ज्ञानी, योगी होशील. ***('ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जैशी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तू पाहे संचिताचे।।' - श्रीनाथमहाराज)***

***पाहे पा शेंदाडे पिकली। ती काय देठीहून सोडविली।***
***तैशी दशा जरी झाली। तरी राहिले ध्यानी ।।३।।***

तात्पर्यार्थ - ज्याप्रमाणे शेंदाड पिकले की ते कडूपण जाऊन गोड होते. ते देठापासून आपोआपच सुटते त्याप्रमाणे जीवाला स्वरूप ध्यानाने आत्मज्ञानाची अवस्था प्राप्त होऊन आत्मज्ञान झाले की त्याला सुख होते. तो संसारदु:खापासून सुटतो, मुक्त होतो.

***तववरी सांगितलिया रिती। स्वरूप घ्याइजे अती प्रिती।***
***तरीच साधे परमप्राप्ती। सत्य जाण ।।४।।***

तात्पर्यार्थ - मात्र ही आत्मज्ञानाची अवस्था प्राप्त होईपर्यंत पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्वरूपध्यान अत्यंत प्रेमाने करावे. तरच सत्य स्वरूप जाणून स्वरूपाकार होणे ही परमप्राप्ती होणार आहे. ***('सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेची शुद्ध कल्पना।।' - श्रीसमर्थ)***

***नित्य करावा ऐसा नेम। पडो न द्यावा संसार भ्रम।***
***धरावा स्वरूपाचा काम। साधनपंथ ।।५।।***

तात्पर्यार्थ - स्वरूपाकार व्हावे ही मोक्षाची इच्छा धरून साधन पंथाचे मार्गक्रमण करावे व संसारापासून सुटून सत्य नित्याचा अनुभव नेमाने घ्यावा.

***हे नित्य श्रवण करावे। मनन निदिध्यासे अनुभवावे।***
***आळस करून न दवडावे। आयुष्य वृथा ।।६।।***

तात्पर्यार्थ - आळस न करता आयुष्य साधनीभूत करून नित्याचे एक नाम नेमाने श्रवण करावे व आयुष्याचा नाश थांबवावा, निदिध्यासे

मनन (मन न होणे) अनुभवावे. ***(‘जेथे नाही नित्य श्रवण। ते जाणावे विलक्षण। तेथ साधके येक क्षण। क्रमू नये सर्वथा।।’ - श्रीसमर्थ)***

***ये विषयी जो आळसी। तया परमप्राप्ती न होय कल्पांतेसी।***
***तो सद्‌गुरूचा उपदेशी। म्हणोची नये ।।७।।***

तात्पर्यार्थ - जो आळसाने नित्य नाम श्रवण न करता आयुष्य वाया घालवतो, त्याची विषयांची कल्पना, वासना सरत नाही, त्याला वस्तूची ओळख - परमप्राप्ती - कधीही होत नाही. त्याला गुरुपदेश होऊन सुद्धा मोक्षाची प्राप्ती होत नाही. त्याला गुरूपदेश झाला असे म्हणू नये. ***(‘निद्रा आळस दुश्चितपण। हेची मुर्खाचे लक्षण। येणेकरिता निरुपण। उमजेचिना।।’ - श्रीसमर्थ, ‘जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवची यया साधना। भजावे लागे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रियदमन। ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी टाकावे।।’ - श्रीसमर्थ)***

***आता असो बहू बोलणे। श्रीगुरूसी धरी जीवे प्राणे।***
***नाही सार तयाविणे। अन्य काही ।।८।।***

तात्पर्यार्थ - आता आपले बहू बोलणे थांबवून जीवाने असार संसार त्यागून सर्वात श्रेष्ठ सारभूत असे प्राणाला विसावा देणारे प्राणेश्वर सद्‌गुरू प्राणोपासना करून अनुभवावे.

***तयाचे वचन राही। करू नको येर काही।***
***तरी अनायासे स्वरूप पाही। पावशी तू ।।९।।***

तात्पर्यार्थ - इतर काही न करता म्हणजे देहाचा, मनाचा लय साधनी

साधून, निश्वासी प्रमाण आले असता, श्रवण होणाऱ्या गुरू - श्रेष्ठ - वचनाने सारे सायास - षड्विकारात्मक आयास - नाहीसे होऊन, साक्षात्काराने स्वरूपाकार होशील, विश्वाचे मूळ - उगम - प्राप्त होईल, परमप्राप्ती होईल. ***(‘निश्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक।।’ - श्रीदासराममहाराज, ‘काहीच न करूनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।’ - श्रीसमर्थ, ‘सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***वृद्धी पावे गुरुकृपा। ऐशिया स्थिती राहे पा।***
***गुरू कष्टी होय बापा। ऐसा न वर्ते ।।१०।।***

तात्पर्यार्थ - त्यांनी सांगितलेल्या साधनाच्या अवस्थेत - नामस्मरणाच्या स्थितीत - रहा म्हणजे श्रीगुरूंची पूर्ण कृपा होईल. श्रीगुरूला कष्ट होतील असे विस्मरणी कधीही राहू नका.

***गुरू महिमा अपारू। गुरू तो परात्परू।***
***तूज न कळे म्हणोनी परिहारू। देऊन सांगो ।।११।।***

तात्पर्यार्थ - गुरू हे सर्वात श्रेष्ठ परब्रह्म असून त्यांचे वर्णन शब्दात करता येत नाही हेच त्यांचे वर्णन. तरीही तुला त्यांचा महिमा कळावा, तुझे समाधान व्हावे म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अंतरनिष्ठांना त्याचे आकलन होईल. ***(‘म्हणोनी सद्गुरू वर्णवेना। हे गे हेची माझी वर्णना। अंतरस्थितीचिया खुणा। अंतरनिष्ठ जाणती।।’ - श्रीसमर्थ)***

***आता तन मन धन। करी सद्गुरूसी समर्पण।***
***नाही तयावीण। अन्य दैवत जगी ।।१२।।***

तात्पर्यार्थ - सद्गुरूशिवाय या जगात दुसरे दैवत नाही. म्हणून त्यांचा दास होऊन त्यांचे चरणी तन, मन आणि सर्वश्रेष्ठ प्राण (श्वास) हे धन अर्पण करावे. ***('येर तनुमनु प्राणी। जे निरंतर माझेयाची वाहणी। ते देहाचा निर्वाणी। मीची होती।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तुझा दास मी होऊनी तवपदी केले जेव्हा अर्पण। तनु मन धन आणि ते मीपण।।' - श्रीचिमडमहाराज)***

***गुरु तत्पद शिव। शिष्य त्वंपद जीव।***
***म्हणोनी तयाचे चरणी भाव। धरी ऐक्यतेचा ।।१३।।***

तात्पर्यार्थ - तत्पद म्हणजे शिव - परमात्मा - गुरु तर त्वंपद म्हणजे जीवात्मा शिष्य होय. त्वं पदाने - जीवाने -शिष्याने तत्पदाशी (परमात्म्याशी, गुरुशी) नमन या मुख्यभावाने ऐक्य साधणे म्हणजे असीपद.

***गुरु तत्पद सागरू। शिष्य त्वंपद तरंगाकारू।***
***दोन्ही हारपोनी ब्रह्म निर्विकारू। आपण होइजे ।।१४।।***

तात्पर्यार्थ - तत्पद परमात्मा हा गुरू सागरागत आहे तर त्वंपद हा शिष्य या सागरावरील तरंग आहे. ही कल्पनेची उपाधी नाहीशी झाली की तत् व त्वं ही दोन्ही पदे एक होऊन आपण निर्विकार जीवन - ब्रह्म - होणार.

***गुरूभये प्रेम वाहासी। तरी अवश्य स्वरूप पावसी।***
***कीटकभये आळिसी। कैसे जाले ।।१५।।***

तात्पर्यार्थ - श्रीसद्गुरूंविषयी असणाऱ्या आदरयुक्त भीतीने जर अविनाश स्वरूपाचे - गुरुरूपाचे - प्रेम निर्माण झाले तर स्वरूपाकार - गुरुरूप -

होशील. ज्याप्रमाणे भ्रमरभयाने अळीस भ्रमराचा अध्यास तयार होतो व अळीचा भ्रमर होतो त्याप्रमाणेच हे आहे.

***अळीसी कीटकता। गुरु देईल सायुज्यता।***
***मग सुखिया होसी तत्वता। स्वरूपी रमशी ।।१६।।***

तात्पर्यार्थ - ज्याप्रमाणे अळीचा अध्यासाने भ्रमर होतो त्याप्रमाणे गुरु काळवेळ नाही अशा सर्वकाळी शिष्याला निदिध्यासाने आपणासारखे स्वरूपाकार करतात, सुखरूप करतात. सायुज्यमुक्ती देतात. ***('आपणासारखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तया लागी।।', 'अळीस भ्रमराचा अध्यास। तेणे भ्रमरपणा येई तीस।।' - संतवचन)***

***तत्वतः स्वरूपी भेद नाही। परी ते ध्यानैकगम्य पाही।***
***मग अनुभवे सुखिया होई। तरशी भवभय ।।१७।।***

तात्पर्यार्थ - जीव हा तत्वतः स्वरूपाकार ब्रह्मच आहे. पण मीपणाच्या जाणीवेने वेगळे जीवपण प्राप्त झाले आहे. एक स्वरूपाच्या ध्यानाने ध्यान धरणारा ध्याता जीव ध्यानी येणाऱ्या एक स्वरूपाकार होतो. एकाग्र ध्यानाने स्वरूप पाहणे हे गम्य साध्य होते. जीव व स्वरूपातील भेद नाहीसा होतो. त्याचे संसारभय नाहीसे होते. आत्म्याचे अनुभवाने तो सुखरूप सुखिया होतो.

***हे शास्त्र गौप्य करावे। कवणा स्फुट न सांगावे।***
***तुझे तुवा अनुभवावे। गुरुगम्य हे ।।१८।।***

तात्पर्यार्थ - अध्यात्मशास्त्रात अंतरंगाचे महत्व. ते वाक्‌चातुर्याने शब्दाने सांगून समजणारे नाही. श्रीगुरूनी त्यांच्या हृदयातील हे ज्ञान आपल्या हृदयात प्रगट केले तरच हा आपला अनुभव आपल्याला प्राप्त होईल.

'पाहणे आपणासी आपण' हे गुरुगम्य समर्थ ज्ञान प्राप्त होईल. ***('तैसे अध्यात्मशास्त्री इये। अंतरंगची अधिकारीये। परी लोकु वाक्‌चातुर्ये। होईल सुखिया।।', 'हृदया हृदय येक जाले। ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडिता केले। आपणाऐसे अर्जुना।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***पशुजना श्रवणी घालिशी। तरी काय सिद्धी होय तयासी।***
***सद्‌भाव देखोनि कृपा करिसी। तरी निर्वाहक पाहिजे।।१९।।***

तात्पर्यार्थ - ज्याच्या अंत:करणात भक्ती नाही, जे भक्तीने कोणताही नित्यनेम सांभाळत नाहीत अशा नर होऊन पशू झालेल्या अश्रद्ध, तपोहीन, पशूवत जनांना हे शास्त्र सांगून काहीही निष्पन्न होणार नाही. शिष्याचा सद्‌भाव पाहून त्याचा अधिकार ओळखून त्याला हा यथायोग्य उपदेश करावा. ***('नर होऊनी पशू झाले। तुका म्हणे वाया गेले।।' - श्रीतुकाराममहाराज, 'भक्तीवीण पशू कशासी वाढला। सटवीने नेला कैसा नाही।।' - श्रीनाथमहाराज, 'ज्ञानावीण ते पशू जाणावे। वचन भगवंताचे।।' - श्रीसमर्थ, 'तरी तुवा हे जे पार्था। गीताशास्त्र लाधले आस्था। ते तपोहीना सर्वथा। सांगावे ना हो।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

***ऐशी गुरुमार्गीची परवडी। तैशी असावी गुरुपदाची गोडी।***
***तरी प्रकाश होता अर्धघडी। न लागे बापा ।।२०।।***

तात्पर्यार्थ - तशी गुरुपदाची गोडी जर मनाला लागली तर असे जन्ममरणरहित अवस्थेत गुरुमार्गाकडे विशेष लक्ष दिले जाते. गुरुमार्गाची परवड होत नाही. तर अर्धघडीत पितप्रभेचा लखलखाट अनुभवाला येऊन हे गुरुगम्य ज्ञान प्राप्त होते. गुरुपदाची जोडी होते. ***('मन जडले***

*गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।। पित प्रभा लखलखाट। तोची माझा उन्मनीघाट।।' - संत मुकुंदराज)*

***गुरुसंप्रदायाची वाट। न धरिता करिशील प्रगट।***
***तरी गूज घेऊनी चावट। होतील बहू ।।२१।।***

तात्पर्यार्थ - आपल्या गुरु - श्रेष्ठ - सांप्रदायातच हे ज्ञान प्रगट करावे. इतरत्र हे बोलू नये. इतरत्र जर आपण हे गुह्य बोललो तर अज्ञानी अश्रद्ध चावट लोक ज्ञान न झाल्याने अज्ञानाने या अंतरीच्या गौप्याची चेष्टा करतील, निंदा करतील.

***यालागी हृदयी गुप्त राख। स्वये परमामृत चाख।***
***सर्व योगियांचा तिलक। होशील तू ।।२२।।***

तात्पर्यार्थ - यासाठी हृदयात गुप्त असणारा राम अनुभवून सर्वसुखाचा आराम प्राप्त कर, स्वतः हे परमामृत चाख व सर्वश्रेष्ठ योगी हो, चैतन्यरूप हो.

***परमामृत ग्रंथ प्रमाण। केले परमार्थाचे कथन।***
***जयासी पाहिजे गुरुखूण। तेणे हाची पाहावा ।।२३।।***

तात्पर्यार्थ - परमार्थाचे कथन करणारा परमामृत हा प्रमाण ग्रंथ आहे. ज्यांना या श्रेष्ठ अनुभवाच्या खुणा प्राप्त करावयाच्या असतील त्यांनी हेच परमामृत चाखावे, पहावे.

***हेची गुरुबीज कथन। म्हणोनी करावे जतन।***
***सेउनी सद्गुरूंचे चरण। सुखिया होइजे ।।२४।।***

तात्पर्यार्थ - स्वरूप पाहणे हे विश्वाचे बीज उमगवणारा ग्रंथ म्हणून

यातील गुरुबीजाला जपा. जपून सद्‌गुरूचरणाचा अनुभव हृदयी घेऊन सुखी व्हा. ***(‘स्वरूप पाहणे बीज उमगणे। अबोल बोलणे सदा वाचे।।’- श्रीमामामहाराज)***

***म्हणे मुकुंदराज योगिया। ह्याबुद्धी जो अनुभविया।***
***तो पाहे परतोनिया। आपुले स्वरूप ।।२५।।***

तात्पर्यार्थ - अंतर्मुख होऊन निश्चळ बुद्धीने उलट मार्गाने समाधीसुखी आपले स्वरूप पाहा, जो अनुभवी आहे त्याचा अनुभव घ्या असे योगीराज श्रीमुकुंदराजमहाराज सांगत आहेत. ***(‘समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते साक्षात्कार नाम**
**चतुर्दश प्रकरणं संपूर्णम् ।।१४।।**

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | नासदीय सूक्तावरील ओवीबद्ध टीका |
| २ | श्रीदासरामगाथा (अभंग गाथा) |
| ३ | श्रीरामदासबोध (ओवीबद्ध) |
| ४ | संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला(ओवीबद्ध टीका) |
| ६ | श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह |
| ७ | ग्रंथत्रयी (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग |
| ९ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन |
| १० | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (३६५ वचने) |
| ११ | श्रीगुरुमहिमा |
| १२ | श्रीदासरामगाथा पुरवणी |
| १३ | संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| १४ | श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना |
| १५ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | श्रीगुरुलिंगगीता (२२८ पदे) |
| १८ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे |

| क्रमांक | विषय |
|---|---|
| २० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) |
| २१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी |
| २२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन |
| २३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) |
| २४ | समर्थ रामदासकृत करुणाष्टके(श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |
| २५ | श्रीगुरुलिंगगीता(६६ पदे व अर्थ) |
| २६ | श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह) |
| २७ | ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | परमार्थ प्रश्नोत्तरी |
| ३१ | श्रीदासराम चिंतनिका (श्रीदासराममहाराजलिखित लेख संग्रह) |
| ३२ | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ (श्रीदादांचे १६ अभंगांचे विवरण) |
| ३३ | अक्षरे चैतन्याची भाग-१ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | अक्षरे चैतन्याची भाग-२ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | ज्ञानगंगा (श्रीदासराममहाराजंची प्रवचने) |
| ३६ | अक्षरधारा (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | श्रीरामपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३९ | श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र (श्रीदासराम लिखित) |

